म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक ध्यों. भी. मराठे | सन |
|---|---|---|
| ग्रंथालय क्रमांक | पुस्तकाचें नांव विलास तरंगोष्टी | |
| | ६२९ | |


९०

नाटक

०१२५१९६

# सवाई माधवराव यांचा मृत्यु.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

( स्थळ—शनिवार वाडा. केशवशास्त्री जप करीत प्रवेश करतो. )

के०:—राज्यें मंत्रानें मिळतात; एक पाऊल अविचारानें टाकावें कीं, सगळी इमारत ढांसळली !—बळवंतराव पटवर्धन व विष्णु नरहर यांच्या फितुरीच्या वेळेला आनंदवल्लीस आनंदीबाईनें जर माझी सल्ला ऐकली असती,—जाऊं द्या,—गतं न शोचयेत्. परवां शिवनेरीस बाजीराव-साहेबांची आणि नागनाथ किल्लेदारांची पायधरणी काय थोडी केली ? आनंदीबाईच्या तालमींत वाढलेल्या ह्या शास्त्र्याचें त्या पोरांनीं ऐकूनच घेतलें नाहीं.—आतां घ्या आपल्या उतावळेपणाचें प्रायश्चित्त. आजच्या दरबारांत हत्तीच्या पायीं तुडवून ठार करण्याचा हुकूम नागनाथाला होणार !—ह्या फितुरींतून आपण तर शिताफीनें निसटलों !—इतकेंच नव्हे तर काल नागनाथाला पकडलें त्या वेळीं, आज नागनाथाची चौकशी चालली असतांना, आणि उद्यां नागनाथ हत्तीच्या पायांखालीं तुडवून मारला जाईल तेव्हांही, माझ्या फितुरीच्या मंत्राला केव्हांच खळ नाहीं !—

आनंदीबाईचे हेतु अखेरीस माझ्या मंत्रानें तडीस जातील व पेशव्याचें पद बाजीरावांना माझ्यामुळें मिळेल.—माझ्या मंत्राचा पगडा ह्या शनिवार वाड्यावर बसूं द्या, माणसांनीं भरलेला हा वाडा पिशाच्चांनीं वजबजल्या-सारखा दिसेल ! [ आईसाहेब व यशोदा प्रवेश करतात. ] मंत्र, जादू, तोडगा हीं पुरुषांपेक्षां बायकांवर लवकर लागू पडतात.—मंत्र एकसारखा जपला पाहिजे.

य०:—बाबा विजयदुर्गाला एकदम निघून गेले, हें मला खरें देखील वाटत नाहीं.—तिकडचा निरोप सुद्धां त्यांनीं घेतला नाहीं !

आ०:—मला देखील सांगायाचें झालें नाहीं. हें नागनाथ प्रकरण सुरू झाल्यापासून माझ्याशीं अगदीं तुटकपणानें वागायचें, आणि आज तर बाई कमालच झाली !—काय शास्त्रीबोवा, तुम्हांला तरी सांगून जायाचें झालें का ?

के०:—बाबासाहेब पहांटे येथून निघाले त्या वेळीं माझी चुकून धूळभेट झाली,—

आ०:—असें लपून छपून पळून जावयाचें तरी कोठें झालें ?

के०:—दुसरीकडे कोठें जाणार ? काल मध्यरात्रीनंतर बाबासाहेबांना हुकूम झाला कीं,—

य०:—कोणाचा हुकूम ?

के०:—दुसऱ्या कोणाचा ?—ह्या राज्याचे चालक,—पेशवाईचे मालक,—

आ०:—कायग यशोदे, महाराजांनीं रात्रीं अपरात्रीं हुकूम,—

य०:—आई, तिकडचा अजून कांहीं हुकूम झाला नाहीं.—मला पक्कें माहीत आहे.

आ०:—तर मग कोणाचा हुकूम झाला ?

के०:—कोणाचा म्हणजे ? नानांचा हुकूम झाला.

आ०:—सर्व कांहीं चमत्कारिकच आहे !

य०:—बरें काय हुकूम झाला ?

के०:—सूर्योदय होण्यापूर्वी विजयदुर्गाकडे तुम्हीं चालतें झालें पाहिजे. तुमच्याकडून खाजगी कारभार काढून घेण्यांत आला आहे. पूर्वीप्रमाणें विजयदुर्गची मामलत तुम्हीं करावयाची कीं, दुसरीकडे कोठें जावयाचें याचा हुकूम मागाहून येईल.—श्रीमंत सरकार गादीवर आहेत खरे,—श्रीमंतांच्या आर्धांगी आपण—आपण आम्हां सर्व नोकरांचे मालक—हीही गोष्ट खरी—बाबासाहेब मानलेले कां होईनात पण आपले वडील—श्रीमंतांचे श्वशुर—खाजगी कारभारी होते,—हेंही खरें,—पण त्याचा काय उपयोग ? नानांचा हुकूम झाला.—सर्व जग नानांचा शब्द झेलतें आहे !—नानांनीं वटारून पाहण्याबरोबर सर्व पृथ्वी कांपते आहे !—बाबासाहेबांनीं हुकूम अक्षरश: पाळूं नये, तर करावें तरी काय ?

आ०:—असें आहे खरें !

य०:—मी स्वारीपाशीं जाऊन हट्ट धरून बसतें, बाबांना परत बोलावून खाजगी कारभार पुन्हा त्यांनाच दिला पाहिजे म्हणून.

आ०:—नानांच्या विरुद्ध हट्ट धरून कसें चालेल मुली ?—ह्या नागनाथाचा नाद तुम्ही सोडा म्हणून मीं तिकडे किती सांगितलें, पण कांहीं नाहीं ! आनंदीबाईच्या त्या पोराला घेऊन आम्हांला काय करावयाचें आहे ?

क० के०:—मी झालों तरी आईसाहेबांना हीच विनंती करीत आलों बिघ.—नानांच्याच तंत्रानें वागलें पाहिजे.—नागनाथाच्या फितुरीची

कुजबुज बाहेर व्हावयाला लागण्याबरोबर आईसाहेबांच्या आज्ञेवरून मींच होऊन नाहींका नानांना सर्व हकीकत इत्थंभूत सांगितली ?

आ०:—नानांना परस्पर बातमी लागल्यावर आपण कशाला वाईटपणा घ्यावा ?–शास्त्रीबोवा,तुम्हीं त्या वेळीं तसें केलें म्हणून बरेंच बचावलें!

के०:—शीर सलामत तर पगडी पचीस !–हें नागनाथ प्रकरण विझून जाऊं द्या, मग वहिनीसाहेबांनीं हट्ट धरिला तर बाबासाहेब पुन्हां खाजगी कारभारी व्हावयाला काय उशीर ?

य०:—कांहीं नको इतका वेळ वाट पहायला. मीं आजच्या आज नानांचा हुकूम फिरवून बाबांना अर्ध्या वाटेवरून परत आणवितें.–ही बघ आई स्वारी देखील इकडेच येत आहे.

[ सवाई माधवराव व हुजऱ्या येतात ].

आ०:—मुली, उतावीळपणानें कांहीं बोलूं नकोस हो.

मा०:—आणखी नानांना सांग, नागनाथाला देहांत शिक्षा करण्याचें कांहीं कारण नसल्यामुळें आजच्या दरबारांत त्याचें काम पुढें आणूं नका. –कसली मसलत ?–हं समजलों, आईसाहेबांचें मनांत नागनाथाला मरणाचीच शिक्षा–तूं जा–बाबासाहेबांचें मत तुम्हांलाही पसंत नाहीं ?–मायलेकींपुढें आमचें काय चालणार ?–अरे गेलास काय ?–इकडे ये–तसें नको–नानांच्या म्हणण्याप्रमाणें कां होईना,–नानांना म्हणावें, नागनाथाला हत्तीच्या पायीं बांधण्याचा हुकूम द्यावयाचा, तेव्हां दरबारच्या वेळीं त्याला हजर ठेवा. [ हुजऱ्या जातो ] कसलें कारस्थान चाललें आहे ?–आमच्या विरुद्ध कांहीं फितुरी करण्याचा बेत नाहींना ?

के०:—ह्यः ! ह्यः !—ह्या पायांच्या विरुद्ध !–छे ! छे !–सरक प्रत्यक्ष धर्मावतार !—ह्यः ! ह्यः !

य०:—बाबांना पुन्हा मामलतीवर हांकून दिलें, ते निघूनही गेले,—आणि इकडून कांहीं विचारपूसही झाली नाहींना ?

मा०:—एकदम निघून गेले म्हणजे !—मी तर त्यांना विजयदुर्गचे सुभेदार करणार होतों.

य०:—काय मेलें बोलण्या बोलण्यांतही मेळ नाहीं !—खाजगींतून काढीत नाहीं म्हणून एकदां म्हणायचें आणि आतां सुभेदारीच्या गोष्टी !

मा०:—तुम्हां बायकांना ह्या राज्यकारभाराच्या गोष्टी समजत नाहींत.

य०:—असें म्हटलें म्हणजे कांहीं समजूत व्हावयाची नाहीं.

आ०:—हेंग काय, असें बोलूं नये, कितीदां तुला सांगितलें !

य०:—माझ्या माहेरचीं माणसें जर जवळ देखील नको असतील —हो—नकोच आहेत—अगदीं उघड दिसतें आहे.—नाहींतर बाबांना असें चोरट्यासारखें पळून कां जावें लागलें असतें ?—आम्हीं मुळीं एथलीं कोणीच नव्हेत. चल आई जाऊं—तुझी देखील मी आतां विजयदुर्गाकडे रवानगी करून देतें.—चलग—

आ०:—किती बोलतेस ?

य०:—मला सगळें समजतें हो.—वाढलेलें अन्न खावें आणि दिलेलें लुगडें नेसावें. आजपासून माझ्या तोंडून एक ब्र देखील निघावयाचा नाहीं.—चल जाऊं—आम्ही नकोशाच झालों आहोंत.

[ यशोदा व आई जातात ].

मा०:—हें कपटनाटक आमच्या नेहमींच्याच ओळखीचें आहे !—पण कायहो शास्त्रीबोवा, आज रागाचा भरपल्ला दिसतो ! इतकें बस्तान बिघडायला झालें तरी काय ?

के०:—आज बाबासाहेबांना एकाएकीं नानांनीं—

मा०:—नानांनीं तसें करावयाचें कारण नव्हतें.–पण असें होतें, रोज दरबारांत नानांनीं कांहीं तरी बोलावें, बाजीरावाच्या तर्फेचा मीं हट्ट चालूच ठेवावा, बाबासाहेबांनीं नागनाथाचा पक्ष घेऊन नानांचीं उणीपार्णी काढावींत,–मला ह्या सगळ्याचा कंटाळा आला होता, तेव्हां म्हटलें जाऊं द्या कांहीं दिवस त्यांना विजयदुर्गला.–स्वारी जरा रागारागानें तडक निघून गेली—

के०:—वहिनीसाहेबांचे वडील ते !–जमदग्नीचा अवतार !–बरें जायाचें तर निमूटपणें जावें–मला मुद्दाम म्हणून बोलावून नेलें, आणि वहिनीसाहेबांना सांगायाला निरोप सांगितला !

मा०:—काय निरोप ?

के०:—मीं वहिनीसाहेबांच्यापाशीं एक चकारही काढला नाहीं !–हो, उगीच आगींत तेल मी कशाला ओतूं ?–सरकारची मजवर मर्जी आहे, गरिबाची सरकारला वारंवार आठवण होते, वहिनीसाहेबांच्या माहेरच्या आश्रितांपैकीं मी एक म्हणून महाराज मजशीं बोलतात चालतात,–पुष्कळ झालें मजसारख्या गरीब भिक्षुकाला.–फडणीसांच्या विरुद्ध बाबासाहेबांचा निरोप वहिनीसाहेबांना सांगून वहिनीसाहेबांनीं सरकारावर धुसपुसावें, महाराजांनीं त्यांच्यावर उलट रागवावें;–हा उपद्याप करून मला करावयाचें तरी काय ?

मा०:—पण असा निरोप तरी कोणता होता ?

के०:—निरोपांत म्हणजे तसा कांहीं अर्थ नाहीं. पण वहिनीसाहेबांचें वय अजून लहान आणि रागावल्या म्हणजे बाबासाहेबांचाही राग त्यांच्या पुढें कांहीं नाहीं !

मा०:—पण निरोप मजपाशीं सांगाल कीं नाहीं ?

के०:—सरकारचा स्वभाव धिमा, शांत, आईसाहेबांचाही तसाच आहे.—नानांच्याप्रमाणें त्याही मोठ्या मुत्सद्दी आहेत.—ह्या पायांपाशीं मला कांहींच चोरून ठेवावयाचें नाहीं.—बाजीरावसाहेबांचा व महाराजांचा पत्र-व्यवहार नागनाथ आणि बाबासाहेब यांच्या मार्फत चालतो, ह्या संबंधाची खडानखडा बातमी आईसाहेबांनीं आपण होऊन नानांना केव्हां, कशी, कां सांगितली,—हा सर्व पाढा ह्या पायांपाशीं मीं वाचलाच आहे.

मा०:—आईसाहेबांच्या त्या नसत्या कारभाराची हकीकत नको आहे मला.—बाबासाहेबांनीं तिला निरोप सांगायाला सांगितला आहे तो सांगा अगोदर.

के०:—त्यांच्या तापट आणि मानी स्वभावाला अनुसरूनच निरोप आहे.—ते म्हणाले, श्रीमंतांप्रमाणें मी कांहीं नानांच्या ताटाखालचें मांजर होऊन राहणार नाहीं.—ज्यांना गादीची हांव असेल त्यांनीं पाहिजे तर नानाचीं थुंकी झेलून राहावें, वेसणीच्या बैलाला वळवितात त्याप्रमाणें नाना वळवितील तिकडे पेशव्यांनीं पाहिजे तर वळावें.—मला खाजगी कारभार नको, सुभेदारी नको, मामलत नको, स्वतंत्रपणानें आपल्या शेतवाडीवर जाऊन राहीन.—रागांतले शब्द, खरे कांहीं नव्हेत.—उद्यां सुभेदारीचा हुकूम झाल्यावर येतील कामावर आपोआप.—सरकारला निरोप ऐकून वाईट वाटलें कीं काय ? मी सांगणार नव्हतों—

मा०:—वाईट नाहीं वाटलें.—ती फार रागावली, उगीच नाहीं.—तुम्ही शास्त्रीबोवा असें करा,—माहेरचे पडलां,—त्यांची कांहीं तरी समजूत काढा.मी ह्या वेळीं तिकडे गेलों तर—नको माझ्या हातून भलतेंच होईल. जा तुम्ही.

के०:—आज्ञा सरकार. [ स्वगत ] हा मंत्र बिंबला आहे; बरा टिकला पाहिजे. [ जातो. ]

मा०:—मी पंत प्रधान कीं नाना पंत प्रधान ?—बाबासाहेब म्हणतात नाना पंत प्रधान.—तेंच खरें.—माझ्या हुकुमानें नागनाथानें बाजीरावांना पत्रें पोंचविलीं, माझ्या हुकुमानें बाबासाहेबांनीं तीं पत्रें लिहिलीं, आणि माझ्याच मावससासूनें—ह्या आईसाहेबांनीं—आपल्या जांवयाच्या व नवऱ्याच्या कागाळ्या नानांच्या कानावर घातल्यामुळें, हा माधव पेशव्यांच्या गादीवर असतांना, नागनाथ आज हत्तीच्या पायांखालीं चिरडला जाणार !—बाबा-साहेब, तुमच्याप्रमाणें मला जर लहानशी वतनवाडी माझी स्वतःची असती—जातोस कोठें माधवा—शनवार वाड्याबाहेर काडीवरही तुझी सत्ता नाहीं.—बाहुल्याप्रमाणें नटून गादीवर स्वस्थ बसावें, एवढाच तुझा अधि-कार.—किती दिवस मी नानांच्या ओंजळीनें पाणी पिणार ? वेसणीच्या बैलाप्रमाणें मला—पेशव्याला, नाना पाहिजे तिकडे वळवितात हं !—काय करावें, नानांना पाहिलें कीं मला त्यांची भीतिच वाटते !—असें कां व्हावें ?—थोरले बाजीरावसाहेबांनीं निजामावर पहिली स्वारी केली, त्या वेळीं त्यांचें वय माझ्या इतकेंच होतें; पानिपतच्या लढाईंत पडलेले विश्वासराव, दिगंतीं कीर्ति संपादन केलेले रावसाहेब, माझे बाबा, सर्वांनीं लहानपणींच राज्यकारभाराचा बोजा आपल्या शिरावर घेतला.—ठीक—ठीक—असें करणार—आजच्या दरबारांत नानाची एकादी तरी गोष्ट खोडून काढणार.

[ पडदा. ]

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—रस्ता.

[ गोमाजीपंत आणि खंड्या व दगड्या येतात. ]

खं०:—दगड्या, ह्येच त्ये तात्या.

द०:—खंड्या तूं ठोक अगोदर, लई थोर गिरस्थ दिसतात, आमासनी नाहीं शबूद बी उमटायचा नाहीं.

गो०:—अरे, काय म्हणता काय ? असे पुढें या.

द०:—मर्दावाणी हो आगाडी–ठोक पहिला.

गो०:—पुढें या, ठोकायचें काय म्हणतां ?

खं०:—एकदम ठोकुया मुजरा. ( पुढें जाऊन ) तात्या राम राम.

द०:—तात्या राम राम.–खंड्या ह्ये का त्ये तात्या ?–लई साव दिस्त्याती ! रातचा वाण दिवसाचा वाण न्यारा न्यारा असतुया जणु !

गो०:—अरे तुम्हांला पाहिजे काय ? तुम्हीं मला ओळखलें नाहीं, पण मी तुम्हांला ओळखतों.

खं०:—दगड्या, त्येच हे तात्यांना अक्शी !

द०:—तुम्हांसनी गोमाजी हाटकत्याती व्हय गोमाजी हटकत्याती ?

गो०:—अरे, मला कोण गोम्या बोलावतो आहे–मीच—

खं०:—तसं नव्ह तात्या, दगड्या म्हणतुया ह्येला हाटकायचा तवा ‘ दगड्या दगड्या ’ बोरडाव व्हयना ? आमासनी हाटकायच तवा—

द०:—खंड्या, खंड्या, बोरडाव व्हयना ? तवा तात्यासनी हटका-

याला बयान खंड्याला दगड्याला सांगितलया, ध्येनांत घ्या तात्या, तवा हाटकाव कसं म्हणतुया, तात्यासनी " गोम गोम " हटकाव—

गो०:—हो माझेंच नांव गोमाजीपंत.—तुम्ही आवडी नायकिणीच्या देवडीवर—

द०:—ह्येच ह्येच आक्शी तात्या, बोलान आतां.—गवासनी सोडना मुस्कटाची.—बयाचा हुकूम हाय—

खं०:—तात्यासनी आमच्या धनिनीचा मुजरा हाय,—

गो०:—बरें तिचा निरोप काय आहे तो सांग अगोदर.

द०:—बत्ती पेटवूनश्यानी रात आल्यावर शास्तर बोलणारा बामण येणार हाय.

गो०:—शास्त्रीबोवा येणार आहेत, मग—

द०:—तवा, कुंपणाच् रुपय घेउनश्यानी लई बेगीन हाकटल हाय.

खं०:—कुंपणाच्च नव्ह. दुसर कसलं अस्त्याति ते रुपय.—काय वेड्याविंद्यावाणी बोलतूया, कुंपणाला काट अस्त्याती काट, रगूत येत हाय काट लागून श्यानी.

गो०:—अरे ते कुंपणाचे नव्हेत कंपनीचे.—नमुना दाखवायला आणतों म्हणावें.—बरें जा तुम्ही.

खं० व द०:—राम राम राम तात्या. [ जातात. ]

गो०:—ह्या केशवशास्त्र्यानें पैशाचा अगदीं तगादा लाविला आहे. मॅलेटसाहेबाला भेटून आज रात्रीं आवडीच्या माडीवर शास्त्रीबोवांची गांठ घेतलीच पाहिजे.

( जाते. )

## प्रवेश तिसरा.

( स्थळ शनिवार वाड्यांतील दरबारचा दिवाणखाना. )

( जाधवराव, मेहेंदळे, रास्ते, नाना वगैरे बसले असतां भालदार चोपदारांचें ललकारणें होऊन माधवराव गादीवर बसून मुजरे झाल्यावर )

मा०:—नागनाथासंबंधानें काय करावें हेंच मला समजत नाहीं. नाना, तुम्ही म्हणालां तसें नाहीं केलें तर ?–नका करूं असा माझा हट्ट नाहीं, पण—

ना०:—सरकार, या कामांत पणबीण काय कामाचें ? सरकारचा हुकूम झाला आहे, सर्व कांहीं झालें आहे. घरांत भेद करून मराठ्यांच्या साम्राज्यास कीड लावणाऱ्यास पेशवे कोणती शिक्षा देत असतात, हें नागनाथाच्यासमोर ह्या दरबरांत जाहीर करावयाचें एवढेंच काय तें उरलें आहे.

मा०:—हो, तसें कांहीं केलें पाहिजे खरें; पण असें म्हणतों, आमचा दरारा सर्वांना आहेच, मग ह्या गरीब किल्लेदारास मारून अधिक काय फायदा ?–शिवाय मी आतां येतां येतां नागनाथाला दरबारांत मजपुढें आणूं नका, म्हणून शास्त्रीबोवाकडून सांगून पाठविलें आहे.

ना०:—छे, तसें कांहीं नाहीं होतां कामा.–( चोपदारास ) नागनाथ देवडीवर असेल त्याला आतांच्या आतां येऊन यावयाला सांग.–सरकार, सापाच्या पिल्लाला जागच्या जागीं ठेंचलें पाहिजे.–ह्या नागनाथाची कींव करून काय उपयोग ?

मा०:—पण मी असें म्हणतों—

ना०:—सरकारच्या मनाविरुद्ध मी वागत आहें हें खरें; पण ह्या गादीची कीर्ति व दरारा सर्व हिंदुस्तानांत कायम रहावा, एवढ्याचकरतां माझी खटपट आहे.

मा०:—गादीच्या कीर्तीबरोबर माझा स्वत:चा दरारा नको का! वाढावयाला ?

ना०:—ही पेशव्यांची गादी, आणि खुद्द सरकार स्वारी, ह्यांमध्यें मला तर भेद दिसत नाहीं; म्हणूनच आम्ही राघोबा दादा व त्यांचे वंशज ह्यांच्याशीं द्वेष संपादिला.–सरकार, ह्या राघोबाच्या खुळेपणानें आमच्या साम्राज्यावर कोण कोणतीं संकटें ओढवलीं आहेत, व पुढेंही येण्याचा संभव आहे, ह्याचा मी विचार करूं लागलों म्हणजे माझ्या पायांची आग मस्तकाला जाते, आणि ह्या आनंदीबाईच्या पोरांना इतक्या दिवस जिवंत ठेवण्याचें पाप मीं कसें केलें, असें वाटून अंगावर शाहारे उभे रहातात !–पेशव्यांचें घराणें व भानूंचें घराणें ह्यांच्या पूर्वी आणाशपथा झाल्या आहेत, त्या जर झाल्या नसत्या तर ह्या दिवट्या बाजीरावाला, खर्ड्याच्या लढाईत आम्ही गुंतलों असतां लोकांत सरकारची नालस्ती करण्याला,त्या राक्षसी आनंदीच्या गर्भांतून बाहेर जिवंतच येऊं दिलें नसतें.

मा०:—आणि त्या आणाशपथा नसत्या तर ह्या पोरक्या माधवाला पेशव्यांच्या गादीवरही बसविण्यांत आलें नसतें !

ना०:—नागनाथ व बाजीराव ह्यांच्यामुळें सरकारच्या तोंडचे हे शब्द ऐकण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे. याहून अधिक कडक शिक्षा राघोबाचा पक्ष मला काय करूं शकणार ?–रास्ते, टिपूच्या कारस्थानांत इंग्रज व निजाम ह्या दोघांनाही चकवावयास न सांपडतां अपयश माझ्या पदरीं आलें असतें, तरी देखील आजच्या सारखें वाईट वाटलें नसतें !–

हैदराला चिथावून मद्रासच्या बाजूला इंग्रजांच्या उरावर कायमचें दडपण ठेवण्याचे माझे बेत सिद्धीस गेले नसते, तरी देखील सरकार, आतांच्या सारख्या माझ्या जिवाला वेदना झाल्या नसत्या !—जाधवराव, खर्ड्यांच्या लढाईंत आमचा पराभव होऊन निजामाच्या हातांत आमचें पुणें शहर पडलें असतें तरी देखील आतांच्या सारखे कष्ट माझ्या आत्म्याला झाले नसते !—सरकार, मी निजामाला भीत नाहीं, अहमदशहा अबदालीच्या वंशजांना त्यांच्याच देशांत जाऊन मराठ्यांच्या भाल्यांत पानिपतच्या लढाईचा सूड उगविण्याची केवढी शक्ति आहे हें दाखविण्याची राव-साहेबांची प्रतिज्ञा शेवटास नेण्याची मला उमेद आहे, कलकत्त्याचे व मुंबईचे टोपीवाले मध्येंच टुरटुर करतील तर फिरंग्यांच्या वसई किल्ल्याची जी दशा झाली तीच तुमच्या मुंबईची करूं म्हणून त्यांना बजावण्याची मला घमेंड आहे, पण ह्या बाजीचे घरास कोलीत लावण्याचे दिवटे खेळ पाहिले म्हणजे माझे हातपाय लटपटतात, सरकारचा मला असलेला मुख्य आधार नाहींसा होऊन माझे बेत ढांसळून पडतात, आणि मन वैतागून जाऊन विष खाऊन तरी मरून जावें किंवा संन्यास घ्यावा, असें होऊन जातें !—नागनाथाची व बाजीरावाची सरकारला जर इतकी आवड असली तर मला फडणविशीचे जागेवरून दूर करा.—असें नाहीं तसें मराठ्याचें साम्राज्य लयास जाऊन जलचरांची पोळी पिकणार खरी,—मग ह्या गादीशीं नाना निमकहराम झाला असें निदान सरकारच्या तोंडून मला ऐकण्याचा प्रसंग नको.

**मा०:**—नागनाथाला शिक्षा करूं नका असें नाहीं हो मी म्हणत. —नाना, तुमच्या विचाराविरुद्ध मी कधींतरी जाईन का ? अलीकडे आईसाहेब म्हणतात त्याप्रमाणें माझी तबेतच बिघडल्यासारखी झाली आहे ! काय बोलावें आणि काय नाहीं हेंच समजत नाहींसें झालें आहे.—

नाना, तुमच्या शिवाय मला आहे तरी कोण ?—माझ्या हातून जर कांहीं चूक झाली तर तुम्ही मला शिकवावयाला नको काय ?—जाधवराव, नागनाथाला आणीतोंपर्यंत तुमच्या कामाला सुरुवात करा.

जा०:—खर्ड्याच्या लढाईचे पूर्वी इंग्रजांकडून जी यादी आली होती, तीच यादी पुन्हां जोरानें आतां आली आहे.

मा०:—नाना, पूर्वी कसली यादी आली होती ?

रा०:—कंपनीसरकार व पेशवे सरकार ह्यांची दोस्ती कशी प्रेमाची आहे, हें टिपूच्या लढाईच्या वेळीं सर्व टोपीवाल्यांना व पगडीवाल्यांना दिसून आलेंच आहे; तथापि ह्या दोस्तीसंबंधानें कोणाही पगडीवाल्यांच्या मनांत शंका येऊं नये म्हणून निजामाशीं आम्ही तहनाम्यानें बांधलेले होतों तरी ह्या स्वारीच्या वेळीं पेशवे सरकाराचे विरुद्ध आम्ही काडी-इतकेही गेलों नाहीं.

मे०:—हे आमच्या विरुद्ध गेले असते म्हणून काय झालें होतें ? रिकामी प्रतिष्ठा मिरविण्याची ह्यांना हौस मोठी !

मा०:—तसें नव्हे मेहेंदळे.—इंग्रज जर निजामाला मिळाले असते तर खर्ड्याची रणभूमि इतकी मऊ न सांपडून कोपरानें खणण्याची तुम्हांला संधीही मिळाली नसती !—बरें रास्ते, त्या वेळीं इंग्रजांची काय मागणी होती ?

रा०:—ह्या दोस्तीबद्दल इतर टोपीवाल्यांनाही संशय येऊं नये म्हणून पेशवे सरकारच्या मुलखांत इंग्रजांना व्यापार करण्याची परवानगी असावी अशी मॅलेटसाहेबांनीं त्या वेळीं विनंती केली होती. निजामावरील स्वारीचा निकाल लागल्यावर सर्व सरदारांची सल्ला घेऊन काय तें उत्तर देऊं, असा जाधवरावांनीं त्या वेळीं जबाब दिला होता.

मा०:—बरें जाधवराव, आतां पुन्हां इंग्रज काय म्हणतात.

जा०:—खर्ड्यांच्या लढाईत सरकारला यश आलें ह्याबद्दल कंपनी सरकारला फार आनंद होत आहे. ह्या जयामुळें दिल्लीच्या बादशहाच्या सत्तेच्या ऐवजीं मराठ्यांची सत्ता सर्व हिंदुस्थानांत कायमची स्थापन झाली असल्यामुळें ह्या गादीची दोस्ती अधिक दृढ व्हावी अशी इंग्रजांची इच्छा आहे. पूर्वीं मोंगलांच्या आलमगीर बादशहानें बादशाही मुलखांत व्यापाराची परवानगी दिलीच आहे; बादशाही अंमल सरकारच्या हातांत आला आहे; तेव्हां सरकारांनींही ती पूर्वींचीच परवानगी पुढें चालविली पाहिजे, अशी ह्या यादींत मॅलेटनें आग्रहाची विनंती केली आहे.

मा०:—आमच्या दरबाराशीं इंग्रजांचें असेलेलें काम नानांनीं तुमच्यावर सोंपविलें आहे. आणि ह्या कामांतील हुषारीबद्दल नाना नेहमीं आमच्याजवळ तुमची तारीफ करीत असतात.—इंग्रजांच्या ह्या बोलण्याबद्दल तुमची काय सल्ला आहे ?

जा०:—इंग्रजांना आपल्या राज्यांत व्यापाराची परवानगी देऊं नये, अशी ह्या पायांपाशीं माझी विनंती आहे.

मा०:—निजाम, आम्ही, इंग्रज मिळून जसे टिपूवर उठलों, त्याप्रमाणें खर्ड्यांच्या अपमानामुळें धुसपुसणारा निजाम, हिंदूंना भ्रष्ट करण्याला टपलेला टिपू, आणि बादशाही अंमलापासून चालत आलेले हक्क बुडाविल्या मुळें रागावलेले इंग्रज, हे जर एक झाले तर—

ना०:—तर काय व्हावयाचें ?—आम्ही काय झोंपा घेतच पडलों आहों ! सरकारच्या गादीचें वैभव पाहून इतर लोक मनांतल्या मनांत झुरतील, आणि आमच्या नाशाकरितां आपआपसांतील वैरभाव टाकून आमच्या विरुद्ध जूट करतील, हें समजण्याइतकी, सरकारच्या पायाच्या

प्रतापानें, सरकारच्या पदरच्या मुत्सद्यांत अक्कल आहे.—खर्ड्यांच्या स्वारीच्या पूर्वी इंग्रजांनीं पाठविलेल्या यादीचें धोरण काय, हें मी ओळखून होतों, आणि खर्ड्यांच्या ज्या मैदानावर उभे राहून आम्हीं निजामाच्या सैन्यास धूळ चारली, त्याच मैदानावर, परशुरामभाऊंची तरवार विसांवा घेण्यास म्यानांत शिरण्यापूर्वी, भोसल्यांचे बाण पुन्हा भात्यांत जाऊन स्वस्थ पडण्याचे अगोदर, शिंद्यांच्या जिवबादादांचा तोफखाना शांत होऊं लागला नव्हता तेव्हांच, ह्या नानानें पुढच्या लढाईचा पाया रचला आहे.—निजामापासून आमच्या मनगटाच्या जोरावर आम्हीं कमावलेलें वैभव आम्हांपासून हिसकावून घेण्याचा जर कोणी प्रयत्न करील तर त्याच्याशीं झुंजण्याची जय्यत तयारी राखण्याकरितां खर्ड्यांच्या लढाईनें मिळविलेली संपत्ति कवडीनकवडी आम्ही लष्कराकडे खर्च करूं, अशा सर्व सरदारांनीं त्या वेळीं शपथा घेतल्या आहेत.—इंग्रज, टिपू, व निजाम एक झाले तर काय होईल म्हणून सरकारांनीं आतां भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं.

मा०:—इंग्रजांना भिण्याचें कारण नाहीं, आणि जबरदस्तीनें ते परवानगी मागत असले, तर आम्ही साफ देणार नाहीं.—पण त्यांनीं पुण्यास व्यापार केला तर त्यांत आमचें काय नुकसान आहे?—परवां मॅलेटनें नजरनजराणे पाठविले होते, त्यांतल्या त्या विलायती चिजा फारच मोहक होत्या! मला वाटतें त्यांनीं जर आमच्या शहरांत पेढ्या घातल्या तर आमच्या शहराला शोभाच येईल.

ना०:—हा व्यापारी कावा सरकारच्या ध्यानांत आला नाहीं.—राघोबाला खाकेंत मारून आपली तरवार व बंदूक हे जलचर त्या वेळीं पुण्यांत घुसडूं पाहात होते; तो डाव साधला नाहीं म्हणून आतां तराजूचा शिरकाव आमच्या राज्यांत करूं पाहात आहेत!—बादशाहानें ह्यांना व्यापाराची परवानगी दिली, बादशाहीचें ह्यांनीं कोणचें कल्याण केलें?—

कलकत्त्यास शिरून मणेऱ्याचें दुकान चालवितां चालवितां बंगाल वशांत टाकिला कीं नाहीं ?–हें ह्यांचें व्यापारी कसब !

मा०:—त्यांत तुमचें काय नुकसान झालें ? तुम्हीं मोंगलांचे प्रांत घेतले नाहीं काय ? त्यांना मिळाला तो प्रांत मोंगलाचाच त्यांनीं घेतला, तुमचा तर नाहीं ?

ना०:—आमचें काय नुकसान झालें ?–बंगाल्यांत जर ह्यांना पाय पसरावयाला मिळाले नसते तर गोदर्द गोरा सैन्य घेऊन इष्टुर फांकड्याच्या मदतीस कलकत्त्याहून कोठून आला असता ? मुंबईच्या टोपीवाल्यांकडे धांव घेण्याची राघोबांची काय प्राज्ञा होती ?–हे व्यापारी कसले ? दक्षिणेंत मद्रासला व्यापार करतां करतां अर्काट तोंडांत टाकला व म्हैसूरच्या वाघाचा कोंडमारा केला !–ह्यांच्या सुरतेच्या दुकानांतून अशाच तरवारी, बंदुका ह्या बाजूलाही बाहेर पडल्या असत्या, पण भवानीच्या कृपेमुळें शिवाजीमहाराजांचा ह्या देशांत अवतार होऊन सुरतेच्या तरवारींना वखारीच्या वखारींत गंजत, कुजत पडावें लागलें.–सरकार, हें इंग्रजांच्या व्यापाराचें पिलूं आमच्या घरांत साफ नको.–शिवाजीमहाराजांनीं जर महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापलें नसतें, सरकार, आपल्या वडिलांनीं जर दिल्लीचें तक्त फोडून आमचें साम्राज्य हिंदुस्थानभर पसरलें नसतें, तर मी खात्रीनें सांगतों, आज दिल्लीचा बादशहा पेशव्यांच्या सरदारांच्या ताब्यांतील कैदी न होतां, दिल्लीच्या तक्तावर इंग्रजांचा तराजू झळकूं लागला असता !–जाधवराव, मॅलेटसाहेबाला कळवा–

मा०:—इतक्यांत कांहीं कळवावयाचें नाहीं.–प्रत्येक गोष्टींत आमची आज्ञा व्हावयाच्यापूर्वी तुम्ही हुकूम सोडतां, हें मला नाहीं पसंत.–

आणखी कांहीं दिवसांनीं नीट विचार करून आम्ही काय तें उत्तर देऊं. —नागनाथाच्या प्रकरणांत मी तुमच्या बोलण्याप्रमाणें वागलों आहें, ह्या कामीं नाना—

हु०:—नागनाथाला आणलें आहे.

मा०:—आंत घेऊन ये.

[ बिड्या घातलेला नागनाथ, पहारेकरी व केशवशास्त्री येतात. ]

मा०:—नाना, नागनाथाला तुम्हांला काय करावयाची ती शिक्षा करा, माझी पूर्ण मंजूरी आहे.

ना०:—नागनाथ, कारभारी मंडळींत व सरकारांत वितुष्ट पडावें, ह्या हेतूनें तूं बाजीरावास मदत केलीस, व पेशव्यांच्या कुळास कलंक लावणाऱ्या राघोबाच्या व कृत्या आनंदीच्या पोराचीं पत्रें हुकुमाविरुद्ध पुण्यास पोंचवलींस ?

नाग०:—पेशव्यांच्या खऱ्या बीजाच्या बाजीरावाचे हुकूम मीं मानले त्यांत पेशव्यांच्या विरुद्ध मीं फितुरी केली असें होत नाहीं.—असें असतें तर श्रीमंतांनीं उलट उत्तरें स्वदस्तुरचीं मजकडे कां पाठविलीं असतीं ?

ना०:—घरभेद करणाऱ्या राघोबाला देहांत प्रायश्चित्ताची रामशास्त्र्यांनीं जी शिक्षा सांगितली तीच तुला—

नाग०:—भानूंच्या कुळांतले पुरुष जर गादीवर असतील तर मला शिक्षा योग्य आहे.—मी भानूंच्या विरुद्ध फितुरी केली; पेशव्यांच्या विरुद्ध नाहीं.

मा०:—नानांच्या विरुद्ध तुझी फितुरी आहे असें जर मला कळलें

असतें तर एक शब्दही तुझा मीं ऐकिला नसता. गोड गोड शब्दांनीं तूं मला फसविलेंस खास. नाना आणि मी कांहीं दोन नाहीं.

नाग०:—बाजीरावसाहेबांची व सरकारची मैत्री मीं जमवून दिली; व हें मीं सरकारच्या संमतीनेंच केलें.—आज मी हत्तीच्या पायाखालीं चिरडला गेलों तर सरकारचे हुकूम ऐकणारास देहांत शिक्षा होते असा सरकारचा दुर्लौकिक दुनियेभर होईल. लोक म्हणतील सरकार शनवार वाड्यांत कैदी असून खरे पेशवे नाना—

मा०:—न्या, ह्याला, एकदम एथून न्या.—कोतवालाला आमचा हुकूम सांगा, आजच्या आज नागनाथ हत्तीच्या पायांखालीं चिरडून मेला पाहिजे, व आम्ही आणि नाना एकच आहों हें जगाला समजलें पाहिजे.

नाग०:—( पहारेकरी नेत असतां ) बाजीराव नेहमीं म्हणतात पेशव्यांच्या कुळांतला पुरुष आज गादीवर नाहीं, तेंच अखेरीस खरें ठरलें.—नानाच्या वशिल्याचा—कोणाचा तरी उचलून आणलेला—

के०:—चोर पाहिजे तें बरळतो आहे !—सरकार, ह्याची प्रथम जीभ कापून मग हत्तीच्या पायाला बांधून त्याची रस्त्यांतून धिंड काढावी. ( पडद्यांत—नानाचा वशिला—कोणाचा तरी ) अजून टकळी चालली आहे.—सरकारचा नाहीं हुकूम झाला तरी मी आपण होऊन त्याची जीभ कापतों.—ऐकिलें सरकार, कशा शिव्या देतो आहे चोर !

मा०:—त्याचें आयुष्य आतां घटका अर्धी घटका,—मेलेल्यावर हात टाकण्यांत काय पुरुषार्थ आहे ?—दरबारचें काम आतां पुरे.

[ भालदार चोपदारांचें ललकारणें व पडदा ]

## प्रवेश चवथा.

स्थळ—शनिवार वाडा.

[ केशवशास्त्री व सदोबा येतात. ]

स०:—शास्त्रीबोवा, आतां आपला दम निघत नाहीं.

के०:—वा, पाटीलबोवा, आतां कुठें तुमच्या खऱ्या कामाला सुरुवात झाली, अशा वेळीं मर्द आपला धीर सोडतो काय ?—तुमच्या बायकोला बाजीरावानें घरांतून बाहेर काढिली.—तुम्हांला खरा खरा सूड घ्यायचा आहेना ?

स०:—आवडी नायकीण होऊन बसलेल्या माझ्याच बायकोची हांजी हांजी करून सूड उगविण्याचा मला कंटाळा आला आहे; मला पुरे आतां हा पेशा.

के०:—ह्या पेशांतच काय ती खरी खुबी आहे. बाजीरावाचें आणि नागनाथाचें कारस्थान तर हाणून पाडलेंत ! बाजीरावानें तुमची बायको घरांतून बाहेर काढिली—तुम्ही बाजीरावाच्या गळ्यांतला ताईत नागनाथ दुनियेंतून बाहेर काढलात, हा काय कमी सूड झाला !

स०:—नागनाथ मेला, पण बाजीराव जिवंत आहेना ?

के०:—त्यालाही मजपाशीं युक्ति आहे.

स०:—तुमच्या आजपर्यंतच्या पहिल्या युक्तीनें निलाजरा व बेशरम म्हणून माझें नांव जगजाहीर झालें, आतां नवीन युक्तीनें—

के०:—गुणी जनांत तुमचें नांव निघेल !

स०:—आवडी गाण्याला लागली म्हणजे सांथ करायाला मला सांगणार वाटतें !—तंबोरा किंवा तबला हातीं आला तर आणखी कांहीं दिवस दम धरूं.—मला रागदारीचें गावयाला आलें नाहीं तरी—

के०:—पोवाडे वगैरे बरे म्हणतां येतात.

स०:—पोवाड्यांत सगळी लढाईच असते, ते नाहीं मला म्हणतां यावयाचे.

के०:—( स्वगत ) बायको गमावणारा खरा पाटील आतां बोलला.

स०:—हें पहा शास्त्रीबोवा, आपण लावण्या—

के०:—त्या तुमच्या बायकोच्या तोंडून आम्ही रोज ऐकतों तेवढ्या पुरे.—तुम्ही मर्द आहां, हातांत थोडकींच कांकणें घातलीं आहेत.—पोवाडे म्हटले पाहिजेत पोवाडे.—मी शिकवीन तुम्हांला. ती पहा सरकारस्वारी वहिनीसाहेबांच्या महालाकडे जात आहे.—मला आतां सरकारचें दर्शन घेतलें पाहिजे.—जा तुम्ही—रात्रीं मी हजर आहें, जा. ( सदोबा जातो. ) आज खासगी कारभार कोणाला द्यावा, हें ठरवायचें आहे.—आपण अगोदर आईसाहेबांना महालांत गांठलें पाहिजे.

( जातो. )

—————

[library stamp]

## प्रवेश पांचवा.

**स्थळ—यशोदेचा महाल.**

[ केशवशास्त्री प्रवेश करतो. ]

के०:—स्वारी तर येऊन पोंचली आणि येथें अद्याप कोणीच नाहीं! —स्वारी एकटीच इकडे कशी आली?—नाना वाड्यांत आलेल्याची वर्दी नाहीं वाटतें अजून सरकारला पोंचली.—बरोबर आहे,नाना प्रथम—त्या मावशीकडे —आईसाहेबांकडे गेले असावेत.—बाबासाहेबांकडून नानांनीं काढून घेतलेला खासगी कारभार आपल्या हातांत घेण्याची आईसाहेबांची जारीनें खटपट सुरू आहे!—बाबासाहेबांचें आणि नानांचें वांकडें होतें तेव्हां आमचें बस्तान बरेंच होतें.—आतां आईसाहेब नानांच्या वाड्याकडे हेलपाटे घालूं लागल्या—हेंही ठीक आहे.—( माधवराव येतो ) सरकारची काय आज्ञा आहे?

मा०:—आईसाहेब ह्या महालांत नाहींत? कोठें गेल्या आहेत?

के०:—नानांच्या वाड्याकडे गेल्या असतील.

मा०:—कशाला? नागनाथासंबंधानें आमच्या चुगल्या सांगायला गेल्या आहेत?

मा०:—नेहमींच जातात.—बाबासाहेब येथून गेल्यापासून अधिक हेलपाटे.—आमची एक पुराणी म्हण आहे, स्वतःच्या मुलापेक्षांही जांवयाची काळजी सासूला अधिक—तेव्हां नानांचें आणि सरकारस्वारीचें पुन्हा ऐक्य—

मा०:—आईसाहेबांच्या खटपटीची आम्हांला जरूरी नाहीं.

के०:—ह्या कामीं नानांची देखील भिस्त आईसाहेबांवरच फार.—तशा हुशार आहेत. मुत्सद्द्यांनीं देखील तोंडांत बोटें घालावीं!—नानाच्या मनांत खासगी कारभार—

मा०:—नानांची आईसाहेबांना एवढी पर्वा कशाला?—नाना आतां आले म्हणजे साफ सांगणार आहें, खासगी कारभारांत तुम्ही ढवळाढवळ बिलकुल करूं नका म्हणून.

के०:—हो, खरें पाहिलें तर आईसाहेबांना नानांची एवढी काय प्रतिष्ठा!—पण त्यांचा तो आपला पहिल्यापासून नानांकडे ओढा!—बाबा-साहेबांना झालें तरी ह्याच गोष्टीची मोठी चीड होती.—नाना आणि आईसाहेब इकडे येत आहेत.—नाना सरकारला भेटून परत जात होते, त्यांना आईसाहेबांनीं परत बोलावून आणलें वाटतें!

मा०:—नाना मजकडे आले नव्हते.

के०:—वाड्यांत तर नाना केव्हांचे आले आहेत!—सरकारला अद्याप वर्दी नाहीं!—मग आईसाहेब नानांच्याकडे आज गेल्या नाहींत.—प्रथम त्यांच्याशीं एकांत करून नाना सरकारच्या दर्शनास आले असावेत.

[ नाना व आईसाहेब येतात. ]

ना०:—सरकारचा हुकूम मला येण्याविषयीं झाला होता—आज्ञा व्हावी.

मा०:—एवढ्याचकरितां मीं बोलाविलें होतें, कीं खासगी कार-भाराचा आतांच्या आतां निकाल लावून टाकावा.

ना०:—त्याच संबंधानें आईसाहेबांची सल्ला काय आहे ती विचारून विनंती करण्याकरितां—

मा०:—मला हें काम बिलकूल लांबणीवर टाकायचें नाहीं—

ना०:—बाबासाहेबांना पुन्हा बोलावून त्यांच्या हातांत वाड्यांतली व्यवस्था असावी ह्या गोष्टीला मी केव्हांही रुकार देणार नाहीं. असें करण्यांत श्रीमंतांच्या देहाचें संरक्षण व्हावें ह्यापेक्षां माझा दुसरा कोणचाच हेतु नाहीं.

मा०:—नाना, स्वताच्या देहाचें कसें संरक्षण करावें हें सुद्धां मला आतां दुसऱ्यांनीं शिकविलें पाहिजे हं !—मी म्हणतों बाबासाहेबांकडे खासगींतील अमुक काम नको म्हणण्याचा काय अधिकार तुम्हांला !—मला वाटतें—मी सांगतों—माझा असा हुकूम आहे कीं—खासगी व्यवस्थेंत आपण कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करतां कामा नये.

ना०:—आज इतकीं वर्षें ह्या गादीची सर्व हिंदुस्थानभर चलती व्हावी म्हणून मनोभावें मीं आपली सेवा केली आहे. आपण रागावलां ह्याचा विषाद मला मुळींच नाहीं. मी वारंवार हेंच सांगतों कीं, आणि सांगणार कीं बाबासाहेबांच्या हातीं खासगी व्यवस्था ठेवल्यानें केव्हां तरी पुन्हा गोता येणारच.

आ०:—नानांचें म्हणणें बरोबर आहे. तिकडचा स्वभाव अलीकडे कांहीं चमत्कारिक झाला आहेसें मला देखील वाटतें. जरा स्पष्ट बोलतें—मला मुलीच्या कल्याणाकडे लक्ष दिलें पाहिजे.

ना०:—आपण पाहिजे तशी खासगी व्यवस्था करा. माझें एवढेंच सांगणें कीं बाजीरावाचा नेहमीं पक्ष घेणाऱ्या बाबासाहेबांवर विसंबून राहूं नका.—ज्याला म्हणून गादीच्या हिताची कळकळ आहे तो असेंच सांगणार.—आईसाहेबांचें मत मजप्रमाणें आहे; यांना सर्व गोष्टी कळताहेत.—सांगा पाहिजे तर त्यांच्याकडे व्यवस्था. माझी ना नाहीं.

मा०:—आईसाहेबांचा बाबासाहेबांच्या विरुद्ध असा हट्ट !—कांहींच बोलतां येत नाहीं !—आईसाहेब पाहूं देत व्यवस्था—मी तुम्हां सर्वांचे बाहेर नाहीं.—आतां ह्याउपर तरी खासगी संबंधाचा कज्जा मजकडे येतां कामा नये.

के०:—[ स्वगत ] कसा चटदिशीं वळला पहा; हा वहिनीसाहेबांचा प्रभाव असावा :

ना०:—सरकारच्या कानावर पुन्हां खासगी प्रकरण यावयाचें नाहीं.—मी आतां जाऊन आईसाहेबांच्या हवालीं खासगीचा शिक्कामोर्तब करितों. [ नाना व आईसाहेब जातात. ]

मा०:—कां शास्त्रीबोवा, हें प्रकरण बरें उलगडलें नाहीं ?

के०:—सरकारची कर्तृत्वशक्ति काय सांगावी !—सरकार इतकें निक्षून बोलतील असें माझ्या स्वप्नीं सुद्धां आलें नव्हतें.—नाना एकदम किती थंड पडले !—प्रभुतेज तें प्रभुतेज ! लहान आणि थोर हा भेद त्यांत नाहीं.—शरभाचें पोर कां असेना, मत्त केसरीला भरारीसरसें उचलून नेतें !—राजा म्हणजे विष्णूचा अंश, हा प्रत्यय मला पूर्वी कधींच आला नव्हता.

मा०:—नानांचा खासगी कारभारांत हात असूं नये हें बाबासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणेंच झालें नव्हे ?

के०:—बाबासाहेब काय, आईसाहेब काय, एकच.—आईसाहेबांवर नानांचा पहिल्यापासून विश्वास आणि आईसाहेबांचाही त्यांच्यावर तसाच लोभ आहे.—शिवाय पंत प्रधान पेशव्यांनीं मनावर घेतल्यावर, उद्यां नानांना फडणविशीचीं वस्त्रें काढून ठेवावीं नाहीं का लागणार ?--कोणालाही शिरजोर होऊं न देणें हेंच राजांचें कर्तव्यकर्म मी समजतों.—

ताटाखालचीं मांजरें जर ताटांतल्या जिनसांवर निःशंकपणें यथेच्छ हात मारूं लागलीं तर पानावर बसलेला यजमान कसचा ?

मा०:—बरें तें असूं द्या. मी काय म्हणत होतों--

के०:—[ स्वगत ] दुसरा विषय. आज नाना आख्यान एवढेंच पुरे.

मा०:—बाबासाहेबांना ही व्यवस्था पसंत पडेलच नाहीं ?

के०:—तें कांहीं सांगतां येत नाहीं.—जरा आईसाहेबांसंबंधानें—नाहीं ह्यांत कांहीं वावगें नाहीं पसंत न पडायला.

मा०:—तुम्ही आतां असें करा, बाबासाहेबांना पत्र लिहून त्यांचें मत काय आहे तें पहा; समजलां,—जा आतां.

के०:—आज्ञा सरकार. [ जातो. ]

मा०:—अधिकार आणि त्याची लालसा, महत्त्वाकांक्षा; प्रचंड रणसंग्राम ह्या इच्छेनें माजतात, बायकोचें नवऱ्यावरचें प्रेम ह्या लोभानें करपून जातें, सहोदरपणाचें नातें ह्या उत्कट विकारापुढें दुर्बल ठरतें, चुलत्यानें शपथपूर्वक अंगिकारिलेलें पितृप्रेम फिकें पडतें, आणाशपथा घेऊन दाखविलेली स्वामिनिष्ठा खोटी होते !—गादीच्या यशाकरितां आपण रात्रंदिवस खपतों म्हणून नाना बाह्यतः म्हणोत, अगर कांहीं अंशीं त्यांचें म्हणणें खरेंही असेल; पण खासगी कामांत हात नको म्हणतांना कपाळाला आंठ्या काय चढल्या—डोळे काय वटारले—पायांची आग मस्तकाला जावी त्याप्रमाणें शरीरांत रागाचा वारा काय शिरला !—नाना, डोळे वटारले म्हणजे भिणारा लहानपणचा माधव मी आतां नव्हे.—नागनाथ माझ्या इच्छेविरुद्ध मारला जात आहे, माझे सासरे बाबासाहेब यांना माझ्या इच्छेविरुद्ध पुण्यांतून हांकून दिलें आहे, नाना, ह्या गोष्टी मी

कधींही विसरणार नाहीं.—माझ्या विरुद्ध आणि बाबासाहेबांच्या विरुद्ध बागून आईसाहेब जर तुम्हांला मिळाल्या नसत्या—जाऊं द्या—कसेंही असो, आज प्रथम माझ्या अधिकाराचा चांगला उपयोग केला. ह्या सर्वांचें यश कोणाला—( यशोदा येते ) यश देणारी दिव्य देवता इथल्या इथें असून यश कोणाला, म्हणून मी आपला विचार करतों आहें !—( जवळ जाऊन ) मी आतां येऊन सर्व तुला सांगणार होतों, पण आईसाहेबांना म्हणजे स्वतःला अधिकार मिळायचा होताना ?—मग आम्ही येऊन सांगेतोंपर्यंत दम कुठला निघायला ?—नाना आले होते आणि काय काय बोलणें झालें—आतां आम्ही कांहीं एक सांगणार नाहीं.

य०:—हो, मला सांगायचें नाहीं असें व्हायचेंच नाहीं.—होय, सांगायचेंना काय झालें तें ?

मा०:—व्हावयाचें काय ? नाना म्हणाले, तुझ्या माहेरच्या माणसाकडे मुळींच अधिकार नको.

य०:—होय कांहीं तरी मस्करीनें बोलायचें झालें !—मला सगळें खडान्‌खडा ठाऊक आहे, काय काय झालें तें.—मावशीकडे—आईकडेस खासगीची व्यवस्था द्यायचें ठरलें, होयना ?

मा०:—दररोज जरा राग आला कीं मर्जी सुप्रसन्न करून घेण्यास अम्हांला मनधरणी करतां करतां पुरेसें होतें. आज म्हटलें सगळा वचपा काढावा, पण आमच्या आधीं बातमी काढून पार !—होय, कोणीं सांगितलें ?

य०:—मी इथेंच आड उभी होतें.

मा०:—वा ! मग इतक्या वेळ पुढें कां नाहीं आलीस ?

य०:—आपण कसल्याशा विचारांत—

**मा०:**—कसले विचार ! पहा कसे चोरासारखे ते भिकार विचार पार पळून गेले !—तुझ्या त्या प्रेमाच्या गोड हास्यापुढें त्रासदायक म्हणून जें कांहीं आहे तें नाहींसेंच होतें !—तुझा मंजुळ आवाज ऐकला म्हणजे त्या कठोर विचारांचा कानांत घुमत असलेला कर्कश आवाज एकदम बंद पडतो !—तुझ्या ह्या कोमल हाताचा स्पर्श झाला म्हणजे क्षुब्ध झालेल्या विकारांच्या हृदयांत उसळणाऱ्या लाटा जागच्या जागीं थंड होतात !—आणि ( यशोदा सप्रेम पहाते. ) ओ हो—ह्या गरगरीत सतेज नेत्रांतून निघणाऱ्या प्रेमाच्या ह्या प्रवाहांत सदा सर्वदा असेंच पोंहत असावेंसें मला वाटतें.—मागत होतां तो अधिकार मिळाला हो आईसाहेबांना !—खरें, तुला सर्व समजलें होतें नव्हे का ?

**य०:**—पण हें प्रेमाचें गोड वाक्य केव्हां ऐकिनसें झालें होतें.—मला कांहीं सांगायाचें नव्हतें ना ?

**मा०:**—अग, अर्धांगी तूं—तुजपासून मी काय लपवून ठेवणार ?—खरेंच आम्ही आमच्या सुभेदारांना सुभ्यावर जायाला हुकूम देतों तेव्हां ते आम्हांपुढें मोठ्या किंमतीचा नजराणा ठेवतात, तेव्हां ह्या अधिकाराबद्दल—किती गोड हास्य—काय नजणारा द्यायचा विचार ?

**य०:**—प्रेम—निष्कपट प्रेम—याशिवाय ह्या गरीब दासीजवळ आपणाला द्यायला काय आहे ?—त्या प्रेमाची खूण म्हणून मीं माझ्या हातांनीं कशिदा काढलेला हा शेला आणला आहे. ( शेला पुढें करिते. माधवराव घेतो. ) ही वेलबुट्टी आजच मीं संपविली; हिच्यामध्यें एक चित्र काढून मग मी पांघरायाला देणार. आपल्या आवडीचें कोणचें चित्र काढूं ?

**मा०:**—आजपर्यंत पेशव्यांनीं इतकी मौल्यवान् चीज पैदा केली नसेल !—कसलें चित्र काढायचें मनांत आहे आपल्या ?



मा०— अगदीं तुझ्या सारखी, तूंच. [ पृ० २९.

य०:—एक बाई उभी असून—

मा०:—अगदीं तुझ्यासारखी,—तूंच.

य०:—आणि तिच्या हातांत सोन्याच्या पिंजऱ्यांत असलेला राघू असून त्याला ती—

मा०:—( दचकून ) छे, पिंजऱ्यांत अडकलेला, कैदेंत पडलेला राघू ? आणि हें चित्र माझ्या अंगावरच्या शेल्यावर !—मग मी तुझ्या महालांत असतांना तेवढ्याच वेळीं काय तो हा शेला अंगावर घेईन.

य०:—तर मग टोपीवाल्याचा वकील आपल्यापुढें हात जोडून उभा आहे, किंवा निजाम अल्ली आपणांस शरण आला आहे—अशा प्रकारचें चित्र.

मा०:—बिलकूल नको; प्रेमाच्या शेल्यावर ह्या राज्यकारभारांतल्या रुक्ष गोष्टी काय करावयाच्या ?

य०:—मग कोणचें चित्र काढूं ? आज्ञा होईल—तसें करतें.

मा०:—सिंहासनावर तूं आणि मी एके ठिकाणीं बसलों आहों असें काढलेंस तर—

य०:—माझ्याही मनांत पहिल्यांदा तसेंच आलें होतें, पण—

मा०:—पण काय ?—माझ्या मांडीवर बसलेली यशोदा काढ म्हणजे झालें.

य०:—मग असला शेला थोर माणसां देखत अंगावर घ्यायाला—

मा०:—त्याला काय हरकत आहे ? रामसीतेचें कसें चित्र काढतात ?—आमच्या बायकांच्या अंगांत लाज लाज जी काय भरली आहे—

य०:—पण मीं अगोदर तसलें चित्र काढायाचेंच नाहीं असें ठरविलें.

मा०:—वा !–तें कां ?

य०:—हैदरच्या शेवटच्या युद्धाहून थोरले मामंजींची स्वारी जेव्हां परत आली तेव्हां रमासासुबाईनीं असलेंच चित्र काढलेला शेला तयार केला होता;–पण पतीनें अंगावर घेतलेला तो शेला पाहण्याची त्यांची हौस दैवानें कांहीं पुरी केली नाहीं.

मा०:—असें जर आहे तर अलवत तसलेंच चित्र काढ.–माझ्या काकांनीं जीं जीं कामें अर्धवट करून ठेविलीं आहेत, तीं शेवटास नेण्याचा माझा निश्चय आहे.–छे, रमाकाकूंनीं जो धडा घालून दिला तो खुशाल गिरवावा. त्यांची योग्यताच तशी आहे,–रमाकाकूंच्या पतिप्रेमाची बरोबरी कोठें तरी सांपडेल का ? काका धन्य म्हणून त्यांना तसली बायको मिळाली. जगाला कित्ता घालून देण्यासारखें दोघांचेंही वर्तन.–माझ्या काकूंचें काकांवर जितकें प्रेम होतें तितकें तुझें माझ्यावर—

य०:—त्यांच्याहून जास्त, कांकणभर चढच—

मा०:—हें बोलणें सोपें आहे; पण तुझ्या बोलण्याचा अर्थ तुला कळला का ?–रमाकाकू सती—

य०:—महाराज माझी परीक्षा पहावी; आपला तो खंजीर माझ्या छातींत खुपसावा–आपल्या हातांतला जिन्नस, मोठ्या आनंदानें माझ्या हृदयांत त्याला जागा देईन. तसें करतांना आपल्या कोमल हातांना श्रम होतील एवढ्याचबद्दल मला वाईट वाटेल, आणि अखेरीस हें मनोहर रूप पुरतेपणीं पाहूं द्या, एवढीच काय ती प्रार्थना मी करीन.

मा०:—पुरे ! पुरे !–वेडी कुठली ?—तुझ्या प्रेमाबद्दल संशय मला येईल तरी का ?–हा पहा तुझा अपुराच शेला मी आंगावर घेतों.—

( यशोदेला जवळ घेऊन दोघांच्या सभोंवतीं शेला घेतो. ) ह्या तुझ्या प्रेमचिन्हांत अशींच गुरफटून आम्ही निरंतर राहूं या.—शशिमंडल,तारांगण आणि दीपसमुदाय ह्यांच्या ठिकाणीं रात्रीपुरतें सूर्य नारायणानें ठेवलेल्या निष्कलंक तेजाला साक्षी ठेऊन मी शपथ वाहतों कीं, मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. [ पडद्यांत नौबद वाजते. ] चला. ह्या शेल्यावर चित्र कसें कसें काढावयाचें तें सर्व शिकवतों.

[ जातात. ]

## अंक पहिला समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

*स्थळ—आवडी नायकिणीचें घर.*

[ खंड्या, दगड्या व सदोबा येतात. ]

खं०:—राम राम धनीसाव.

द०:—राम राम धनीसाव.

स०:—इतका वेळ कायरे करीत होता ?—इतकी रात्र झाली; घरीं याबची तुम्हांला आठवणच होत नाहीं ! कुठें गेला होतां बोला.—मी झालों तरी घरचा मालकच आहें.

खं०:—धनीसाहेब इथल्ल कारभारी हायती पण—

द०:—बयाच्या पुढं धनीसावबी चाकूर, समद चाकूर.—धनीसा आमच मालक, बयाच नव्ह.

खं०:—अस झालया धनीसाव, बाईसाहेबांचा हुकूम झाला, ए दगड्या, ए खंड्या, नागनाथ किल्लेदार हत्तीच्या पायांत चिरडून मरतुया.

द०:—कसा मरतुया पाहुन या म्हणूनश्यानी.—आमचा बा घरांत घोंगड्यावरच मेला, खंड्याची आईबी अक्शी घोंगड्यावर मेली, समदी माणसं घोंगड्यावरच मरायचीं; हत्तीच्या पायांत मरायच ह्या किल्ले-



यशोदाबाई, सवाई माधवराव यांचें कुटुंब.

दारानं कसलं स्वांग काढलाय पावं म्हणूनश्यानी मारली धाव नी काय ? काय धनीसाव, घोंगड्यावर ठेवल्याबिगर पराण जात नाहीं म्हणत्याती, आणि ह्या किल्लेदारानं फसविलं कीं समद्यासनीं ! घोंगडं नाहीं बिंगड नाहीं, तसाच धुळींत प्राण सोडला नवका त्या लेकानं ?–लई वंगाळ बघा, खंड्याबी आपलं घोंगडं देईना, ह्यो दगड्याबी देईना–

खं०:—संमद लोक रडूं लागलं–

द०:—मीबी रडूं लागलों.–आतां म्हटलं अगोदर रडावं का त्येचा पराण चालला त्येला घोंगडं द्यावं ?–आन् काय धनीसाव, रडतां रडतां क्यवा पराण गेला मला ठावबी नाहीं.

खं०:—संमद लोक बोलत्याती सरींमंताचं पुण्यांत कायबी नाहीं म्हणूनश्यानी किल्लेदाराचा पराण गेला.–ह्ये कसं धनीसाव ?

द०:—असं कसं वेड्यावाणी विचारतुयास ?–आमचं धनीसाव एथल्ले घरधनी हायती, पण बया कुठं वळखंती हाय घरधन्याला ?– अर तसंच हाय सरींमंतांच.–व्हयना धनीसाव ?

स०:—कायरे खंड्या, पेशवेसरकारचें पुण्यांत कांहीं चालत नाहीं तसें माझें देखील माझ्या घरांत कांहीं चालत नाहीं असें लोक म्हणतात कीं काय ?–असें असेल तर मी साफ तिला सांगणार, घरच्या घरांतला अपमान पुरवला पण बाहेर लोकांना ही बातमी एकवार कळली, कळूं दे, पण फिरून जर समजली तर– [ आवडी येते. ]

दग०:—हमी कशापायी दुनयेला सांगतुया, धनीसाव हामावाणी चाकूर हायती म्हणूनश्यानी–

आ०:—कायरे, कसला चारगटपणा लावला आहे ?–आपणाला

कितींदा सांगितलें आहे, ह्या नोकरांना असें दिवाणखान्यांत जमवून चघळपणा करूं नये म्हणून.

स०:—मीं कशाला ह्यांच्याशीं चघळपणा करतों आहें, तेच होऊन माझ्याशीं करतात.—मीं आतां ह्यांना बजावलें, तूं आलीस म्हणजे तुला सांगेन म्हणून.—हो, सांगायला सोडतों कीं काय ?

आ०:—जा, देवडीवर जाऊन बसा; शास्त्रीबोवा आले म्हणजे वरदी द्या.[ खंड्या, दगड्या, जातात. आवडी बसते सदोबा उभा असतो. ] तो पोवाडा म्हणणारा गोंधळी आणलात,—कां—वाकडें तोंड केलेंत ? शास्त्री-बोवा आल्यावर काय म्हणतील ?

स०:—पण मी म्हणतों, माझा जर दरबारांत शिरकाव करून घ्यावयाचा तर शिवनेरीस बाजीरावसाहेबांपुढें तुझें गाणें झालें त्या वेळीं लावण्या म्हणतांना मीं साथ केली होती; तसें शनवार वाड्यांत केलें तर नाहीं का व्हायचें ?

आ०:—मी तुम्हांला पुण्यास येऊंच देणार नव्हतें तें एवढ्याचसाठीं. माझ्या खेटराची देखील सर नाहीं आणि साथ करणार म्हणे !

स०:—मी चुकलों—

आ०:—तर मग जा, अगोदर जा, त्या गोंधळ्याला घेऊन या.—जा—माझ्या डोळ्यांसमोर नको—जा कसे.

स०:—तुझ्या डोळ्यांसमोर नको तर तूं डोळे मीट कशी.—तुझे डोळे मिटले म्हणजे मी आपोआप दिसेनासा होईन.—जाऊं ?—मीट डोळे म्हणजे माझें काम झालें. [ जातो. ]

[ केशवशास्त्री येऊन आवडीच्या मागें उभा राहतो. ]

आ०:—गेली एकदांची व्याद.—हे नकोत घरांत म्हणून शास्त्रीबोवांनीं कितींदा सांगितलें !—वेडीं माणसें देखील केव्हां केव्हां असें टोंचून बोलतात,—म्हणे माझे डोळे मिटले—[ केशवशास्त्री डोळे झांकतो. ] काय मेला चावटपणा हा ! मला नाहीं असलें खपायचें, साफ सांगतें. लंगडें तें लंगडें आणि गांवदरीला चरेना !—कोण चोंवडेपणा हा !—सोडा डोळे—[ केशवशास्त्री डोळे सोडतो ]. कायग बाई कोण मेली थट्टा ही !—माझे डोळे दुखायाला लागले हो !

के०:—नाजूक कीं नाहीं !—एकदां पुष्कळसें पाणी त्यांतून जाऊं दे !—तुझ्यावर खूप रागवावयाचें म्हणून बेत करून आलों आहें.—आपल्या जादुगिरी डोळ्यांतलें पाणी पाहिलें म्हणजे आमचा राग चट सारा नाहींसा होईल, म्हणून हे पाणीदार डोळे जोरानें दाबून धरिले; म्हटलें, ती विषारी चमक एकदां खळ खळ वाहून जाऊं दे.—वा !—तूंच उलट आमच्यावर रागावलीस ?—खुशाल अशीच रागावून उभी रहा.—मदनाच्या कैफांत असल्याप्रमाणें रागानें आरक्त झालेले हे आपले डोळे, तांबडे लाल झालेले हे गालाचे गुलाब, विलासास उत्तेजन देणारा हा हनूचा,—हा अधराचा,—हा नासिकेचा—उद्दामपणा—असाच राग येऊं दे !

आ०:—कसें पण बोलायाला येतें आहे ! लोकांच्या डोळ्यांत बोटें खुपसावींत, मोत्यांसारखीं टिपें गळत आहेत म्हणून म्हणावें !—गालगुचे घ्यावे, गुलाबाचा काय रंग खुलला आहे म्हणून तारीफ करावी ! हीं बोलणीं पुरुषांना म्हणूनच खपतात.

के०:—आणि असलें रागावून फुगणें बायकांना म्हणूनच खुलतें !—छे !—पुष्कळ वेळ झाला रागावून !—इतका राग बरा नाहीं का ?—आमची एक प्रार्थना आहे, ऐकायाची असली तर—

आ०:—न ऐकायाला काय झालें ?–काय हुकूम आहे ?

के०:—दुसरें कांहीं नाहीं. आमचा एक चोरीला जिन्नस गेला आहे, तेवढा परत—

आ०:—परत म्हणजे ?— मी काय चोर ?

के०:—चोर नाहीं म्हणत. आपल्या अंगावर आतांच बघितल्या-सारखा वाटतो,—

आ०:—चोरीचा जिन्नस माझ्या अंगावर येईल कसा ?–( जवळ जाऊन लडीवाळपणानें ) हुडकून काढावा तेवढा जिन्नस.–माझे एवढे शास्त्रीबोवा असतांना मला कोणच्या जिन्नसाची चोरी करावी लागली तें तरी समजूं दे !

के०:—( निरखून पाहून) आतां इतक्यांत कोठें तरी लपवून ठेविला खास.–माझ्या डोळ्यांत केव्हां धूळ टाकलीस मला समजलें देखील नाहीं !

आ०:—[ रागावून दूर होऊन ] काय मेली थट्टा आरंभिली आहे !–मी ऐकून घ्यायाला लागलें म्हणून होय ?–कोणचा जिन्नस आज मीं चोरला ?—नाहींतर माझ्याशीं गांठ आहे.

के०:—आतां मला तो दिसूं लागला.

आ०:—ह्या दागिन्यांत एक तरी चोरीचा—

के०:—एखाद्या उर्मट चोराप्रमाणें उघड अंगावर वापरण्यास आपणाला शरमही—

आ०:—कोणचा तो ?–कोणचा ?–दाखवा,–आतां कां ?

के०:—तो–डोळ्यांत सांठवून कोंडून ठेवलेला–तो–नाजूक गालांच्या आडून भयंकर ज्वाळा प्रगट करणारा–तो–ऐटीनें व नखऱ्यानें नाकाच्या



के०—आमच्यापासून चोरून घेतलेला राग तेवढा आमचा आम्हांला परत द्या. [ पृ० ३७

शेंड्यावर थयथया नाचणारा—तो—इतर सर्व दागिन्यांवर ताण करून तुझ्या सौंदर्याला विलक्षण पुष्टि देणारा—आमच्यापासून चोरून घेतलेला राग तेवढा आमचा आम्हांला परत द्या.

आ०:—शिकस्त झाली बाई !

के०:—मी अगदीं रागावून येथें आलों; पण कां रागावलों हें एकदां सुद्धां आम्हांला विचारावयाचें नाहीं ना ?

आ०:—नवसानें मुद्दाम बोलावून आणलेल्या रागाचें कारण तरी काय बाई ?—आतां विचारतें हो, सांगायचें ना गडे काय तें ?

के०:—त्या गोम्या कारकुंड्याकडून पैसे कां अद्याप जमा झाले नाहींत; तें सांग अगोदर ?

आ०:—ते कोठें देत नाहींत म्हणतात.—मॅलेटसाहेबाकडून अगोदर त्यांच्या हातीं पडले पाहिजेत ना ?

के०:—गोमाजीपंत तुझ्यापुढें लाळ घोटत हंसत हंसत बोलतो, म्हणून तूंही त्याच्या तर्फेनेंच बोलायला लागलीस ! अग हा पैशाचा मोठा लोभी आहे.—फडांत हातीं कांहीं लागेना म्हणून आतां बेटावर इंग्रजांची धरली आहे त्यानें कांस !—त्याची गांठ पडली म्हणजे अशी ताणपट्टी काढतों,—

[ दगड्या येतो. ]

द०:—बेटावरचा बामण आला हाय.

आ०:—येऊं दे त्यांना आंत. [ दग० जातो. ]

आ०:—पहा आले की नाहीं वेळेवर ! [ गोमाजीपंत येतो. ]

के०:—या सरदार, या बसा.

गो०:—हं ! हं ! मी कसला सरदार !—मी आपला गरीब कारकून ! आपल्यासारख्यांच्या आश्रयानें पोटाला मिळवितों झालें !

के०:—आज नाहीं तर उद्यां व्हाल सरदार !—बाजीरावसाहेबांचीं पत्रें मॅलेटला दाखविलींच असतील ?—पैशाची काय तजवीज ?

गो०:—'तजवीज होईल आस्ते आस्ते.—मॅलेटचें म्हणणें असें पडतें आहे,—मी आपला त्यांचा निरोप आपणाला कळवितों,—दादासाहेबांच्या नादीं लागून कंपनीसरकारानें क्रोडों रुपये खर्च केले, आपणांला माहीत आहे, बाजीरावसाहेबांना कळतेंच आहे, त्यांत कांहीं कंपनीसरकारला फायदा झाला नाहीं.

के०:—त्या गोष्टीचा आतां काय संबंध ?—अहो आनंदवल्लीस आनंदीबाईसाहेब मरतांना कंपनीसरकारच्या गुमास्त्याच्या पदरांत मीं माझ्या हातानें लाखों रुपयांचें सोनें व जवाहीर ओतलें आहे.—हें द्रव्य पुढें बाजीरावसाहेबांना उपयोगीं पडावें म्हणून आनंदीबाईसाहेबांनीं कंपनीसरकारापाशीं ठेव ठेविली आहे.—आणि तुमच्या गुमास्त्याची त्याप्रमाणें चिठीही आहे.—ह्या ठेवींतले पैसे व जवाहीर बाजीरावसाहेब मागत आहेत.—मॅलेट कांहीं त्यांच्यावर उपकार नाहीं करीत !

गो०:—पण हें नागनाथाचें कारस्थान,—आणखी बाजीरावसाहेब उगीच पैसे उधळून टाकतील,—तेव्हां सध्यां ती ठेव तशीच असूं दे.—पुढें प्रसंगीं खात्रीनें देऊं.—आणि विश्वास वाटत नसला तर पुन्हां कागद लिहून द्यायाला मॅलेटसाहेब तयार आहेत !

के०:—पुन्हां कागद लिहून देणार !—बंगाल्यांत कंपनीसरकारच्या

एका गुमास्त्यानें कागद लिहून देऊन तीस लाख रुपयांला एका मारवाड्याला फसविलें !–तसेंच पुण्यास तुम्ही करणार काय ?–जा.–मॅलेटला माझा निरोप सांगा, नागनाथ मेला तरी नागनाथाचें कारस्थान बंद पडलें नाहीं.–दरबारची बातमी तुमच्या बेटावर गेलीच असेल !

गो०:—हो ! हो !–नाना विरुद्ध असले तरी श्रीमंत व्यापाराला कंपनीसरकारला परवानगी देणार म्हणून बातमी आहे.

के०:—बाजीरावसाहेबांचे लोक गप्प बसले नाहींत, हें मॅलेटला मीं सांगायाला नको.–बजावून तुम्हीं त्याला माझा निरोप सांगा, ठरलेल्या मुदतींत जवाहीर व रक्कम येथें जर दाखल झालीं नाहींत तर सर्व पुढचें कारस्थान बंद पडेल इतकेंच नव्हे, तर बाजीरावसाहेब व मॅलेट ह्यांमध्यें झालेला पत्रव्यवहार मुदत टळल्यावर एक प्रहराचे आंत नानांच्या हातांत पडलाच म्हणून समजा;—आणि—

गो०:—माझें जरा ऐकून घ्यावयाचें होतें,—

के०:—मला नाहीं ऐकून घेण्याची जरूरी !—बाजीरावसाहेब गादीवर आल्यावर तुम्ही सरदार अशानेंच का होणार ?

गो०:—एक विनंति—

के०:—मॅलेटला एकदां भेटून या,–माझा निरोप बरोबर कळवा,—कोण आहेरे ?–जवाहीर माझ्या पदरांत टाका,—मग काय ती विनंति ऐकेन.–दगड्या, दगड्या, कंदील घेऊन ये.

[ दगड्या कंदील घेऊन येतो. ]

द०:—हात कुठं रात पडलीया, कंदील कशापाई सरकार ?

के०:—त्यांना कंदील दाखीव.—जा तुम्ही आतां.—मग काय तें बोलणें.—जिन्यांत बाहेर रस्त्यापर्यंत कंदील दाखीव.

[ द. व गोमाजी जातात. ]

के०:—ह्याच्याशीं असेंच वागलें पाहिजे.—आवडे, चल मला तें पत्रांचें दप्तर पाहूं दे.—बाजीरावसाहेबांना एक पत्र लिहूं.—आणि असें पहा, तीं बाबासाहेबांच्या हातचीं पत्रें आहेत तीं—नीट एकदां पाहिलीं पाहिजेत,—चल,विश्वकर्म्याचें काम केल्याशिवाय भागायाचें नाहीं.

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—रस्ता.

[ श्यामभट व तेलंगी प्रवेश करितात. ]

श्या०:—ए तेलंग्या, चल पाय उचल झपझप, उशीर झाला.

ते०:—पळत पळत आमाला कुठं नेती तूं ? मोठा दक्षणा ?—मग पळती.

श्या०:—अरे आहे, चल लवकर.

ते०:—हे गांवांत—तुझा पुण्यांत—मोठा नाहीं. आनंदवल्लीची महाराजानं दिला मोठा दक्षणा !—तुझ्या महाराजांचा भाऊच ती. केवढा श्राद्ध झाली !—भाजीचा भोपळी असतोना, असली पिंड !—उचलायला मला दोन रुपया दिला !—तवा पळाली हा तेलंगभट.



बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस.

श्या०:—आज कांहीं श्राद्ध नाहीं.

ते०:—आनंदवल्लीचा बाजीराव पुण्याची दिवाण होणार.–आमचा समस्त तेलंग बोलती,–होणार.–मग रोज श्राद्ध करणार ती. बाजीराव दिवाण पंडित गोड संभाषण करती.–आयायी! केवढी पिंड!—बारा महिने पितरांना पुरावी असला पिंड!–शास्त्रांत ही पिंड सांगितली आहे.—आलीका, ती महाराज दिवाण झाली का?

श्या०:—फिसकटलें तें!—परवां काय पाहिलेस?—नागनाथाला मारला ना?–आतां नानाचा पुन्हा करडा अंमल; उशीर झाला कीं पर्वतीवर दक्षणा नाहीं मिळावयाची!

ते०:—घाशीरामाची यजमान नाना!–अयायी!–आमी नाहीं पर्वतीवर यावयाची.

श्या०:—अय्या, आज श्रीमंताकडचें आहे.

ते०:—तुझी महाराज काय करती तेथें?

श्या०:—नागनाथाची आणि तुझ्या बाजीरावाची इडापिडा टळली म्हणून वहिनीसाहेबांनीं आज पर्वतीला महापूजा बांधण्याचें ठरविलें आहे. सरकार आतां दर्शनाला यावयाचें असून आज दीपोत्सव आहे.–चल, उचल पाय झप झप, श्रीमंत पोंचण्याच्या पूर्वी हजर झालों तर कांहीं दक्षणा तरी मिळेल.

ते०:—मी तुला विचारती–थांबतीस–थांबतीस–मी विचारती–बाजीरावाची पीडा टळली–मेली काय बाजीराव?–त्याची पिंड आमी नाहीं उचलायची!–त्याचा बापाची पिंड खांद्यावर घेतली—आज दोन साल खांदा दुखती!–एक तेलंग नाहीं बाजीरावमहाराजाची पिंड उचलणार.

श्या०:—चल लवकर, नाहींतर वटवटींत दक्षणा बुडवशील!

(जातात.)

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—शनिवार वाडा.

[ केशवशास्त्री हातांत पत्र घेऊन येतो. ]

के०:—( स्वगत ) कोण म्हणेल या पत्राला बनावट !—प्रत्यक्ष बाबासाहेबांनीं जर पत्र लिहिलें तर तें एक वेळ त्यांच्या हातचें नव्हे असें ठरेल !—शाबास, शास्त्रीबोवा, शाबास !—राघोबादादांच्या पत्रांत ' ध ' चा ' मा ' बनावट करून नारायणरावाला मारणाऱ्या आनंदीबाईचें शिष्यत्व तुम्हीं पतकरलें, आतां त्याचें सार्थक्य होणार !—एक शब्द त्या वेळीं बनावट लिहिला—ह्या पत्राप्रमाणें जर सर्व बनावट असतें, बाजीरावसाहेबांच्या ऐवजीं हा माधव कैदी होऊन पडला असता !—आतां पूर्वींची चूक दुरुस्त झाली !—( पत्राला उद्देशून ) देवांनीं सागर मंथून काढलेलें हालाहल विष देखील इतकें तीक्ष्ण नसेल ! ज्याचा ताप अफाट समुद्रच सोसूं शकतो, तो वडवानलही इतका प्रखर नसेल ! आईसाहेब व नाना ह्यांच्याविषयीं माधवाच्या मनांत असलेला आदर ही चिठी जाळून खाक करील !—वा ! ठीक जुळतें ! नाना आणि गंगाबाई यांच्याविरुद्ध आनंदीबाईनें पिकविलेल्या आफवेचा प्रभाव आतां दाखवितां येईल !—परवां नागनाथानें ' नानाच्या वशिल्याचा ' हे झोंबणारे शब्द उच्चारिले, पण गोळी लागली नाहीं; माझें हें कारस्थान साधल्यावर आनंदीबाईनें वापरून वापरून प्रचारांत आणलेले ते शब्द विषारी बाणाप्रमाणें माधवाच्या हृदयाचा भेद केल्यावांचून राहणार नाहींत.—ही चिठी म्हणजे नानांच्या वाड्याला लागणारी मूर्तिमंत आग, शनवार धाड्याला चाटून जाणारा

प्रत्यक्ष विजेचा लोळ,–माधवाच्या शरीरांतील सर्व रक्त तापविणारे रस-रसलेले हे निखारे संधी साधून माधवाच्या डोक्यावर मी ठेवणार !—मग बाजीरावसाहेबांस पेशव्यांच्या गादीवर बसण्यास उशीर न लागून दिवाणाचीं वस्त्रें माझ्या अंगावर पडलींच म्हणून समजावें. ( माधवराव व यशोदा येतात. ) मी जाळें कल्पनेनें पसरतों तों सावजें आंत अडकून पडण्यास कशीं धडपडत येत आहेत पहा !

मा०:—मला महापूजेची जरूरी नाहीं आणि धाकट्या पूजेची जरूरी नाहीं.–माझ्या इच्छेविरुद्ध नागनाथ मारला गेला म्हणून मीं दीपोत्सव करावा हा कोठला न्याय ?

य०:—महाराज, माझी चूक झाली, आपली आज्ञा न घेतां मीं पर्वतीला नवस केला—

मा०:—तुझ्या नवऱ्याचें कांहीं चालूं नये म्हणून तूं पर्वतीला नवस केलास ?

य०:—तसा नवस मी कसा करीन महाराज ! मी पदर पसरतें, भीक मागतें.–बाबासाहेब आणि नागनाथ यांच्या संबंधाचा तंटा थोडक्यावर मिटला म्हणून मीं पूजेचा नवस केला.–सर्व तयारी झाली आहे.–दोघे मिळून पूजेला येणार म्हणून सर्वांना कळविलेंही आहे.–तेव्हां कसेंही करून पर्वतीपर्यंत येण्याची मर्जी व्हावी,–ह्या दासीच्या विनंतीला मान द्यावा. पुन्हा मी अशी चूक करणार नाहीं.–आपली आज्ञा न घेतां देवदर्शन घ्यावयाचें मनांत सुद्धां मी आणणार नाहीं.

मा०:—ज्यांनीं नवस केला असेल त्यांनीं तो फेडावा.—परमेश्वराची पूजा करतांना देवाच्या मूर्तीच्या जागीं मला नागनाथ दिसूं लागेल !–मग कायग तूं, ती काकी,मावशी कीं आई आणि नाना देवावर गंधफूल अक्षता

मला वाहूं तरी द्याल काय ?—कायहो शास्त्रीबोवा, दुःख झालें म्हणून नवस फेडण्याचा प्रकार पुराणांतरीं कोठें सांपडतो का ?

के०:—ह्ये ! ह्ये ! ह्ये !—तें सर्व सरकार मानण्यावर आहे.—आई-साहेबांचा व नानांचा नवस करण्यासंबंधानें आग्रह !—ह्ये ! ह्ये ! ह्ये !

मा०:—नानांना नागनाथ नको होता, तेव्हां त्यांनीं नवस केला,—चालेल.—पण बाबासाहेबांना नानांनीं हांकून लावलें असतां आईसाहेबांनीं आणि हिनें नवस करावयाचा—आश्चर्य आहे !—मी असें विचारतों, अनिष्ट घडून आलें म्हणून परमेश्वराची स्तुति—

के०:—सरकार, रामायणांत एक उदाहरण आहे.—पण तें कांहीं येथें बरोबर लागू पडत नाहीं.—नागनाथाला मारणें, बाबासाहेबांना हांकून देणें,—बाबासाहेबांना हांकून दिल्याबद्दल वहिनीसाहेबांना, आईसाहेबांना वाईट वाटल्यावांचून कसें होईल !

मा०:—रामायणांतलें कोणचें उदाहरण म्हणत होतां ?

के०:—तें असें—तें लागू पडत नाहीं सरकार.—उगीच मला कांहीं तरी आठवलें झालें !—तें असें—

य०:—आम्ही दोघीजणी मिळून महाराजांना पदर पसरून विनंति करण्याकरितां मी आईला घेऊन येतें.

[ जाते. ]

मा०:—पुराणांतली कोणची गोष्ट सांगत होता ?

के०:—आतां इथें इतक्यांत आईसाहेब येतील, नाना येतील.—सर्वांचा आग्रह पडेलच; तेव्हां पर्वतीकडे सरकारची स्वारी होईलच.—

देवपूजा आहे, पुण्यमार्ग आहे.—सुख आणि दुःख, कशाकरितां कां असेना——कांहीं झालें तरी हा धर्ममार्ग आहे.

मा०:—पाप-पुण्य माझें मला कळतें.—काय मी म्हणत होतों—खरें बाबासाहेबांचें उत्तर आलें काय ?

के०:—आज उद्यां इतक्यांत यावयाला पाहिजे. लवकर लिहिलें असतें म्हणजे पूर्वींच येऊन पोचलें असतें—बाबासाहेब अजून वैतागून चडफडत असतील !

मा०:—आणि इकडे आईसाहेब दीपोत्सव करीत आहेत !

के०:—त्यांना खासगी कारभार मिळाला, चालायचेंच.—बायकांची धर्म-कृत्याकडे साहजिकच प्रवृत्ति असते. शास्त्रें वाचा,—पुराणें पढा,—धर्माची भिस्त बायकांवरच.—रामायणांत बायकांसंबंधानें—

मा०:—मगाशीं कसलें उदाहरण सांगणार होतां, सांगा तें पाहूं.

के०:—तें बरोबर लागू पडत नाहीं,—म्हणजे असें,—रामांनीं वालीला मारलें, त्या वेळीं वालीचा भाऊ सुग्रीव आणि वालीची बायको तारा ह्या दोघांनीं देवानें खैर केली म्हणून परमेश्वराची पूजा-अर्चा केली.—सरकारला रामकथा सर्व माहीत आहे !—ह्ये !ह्ये !उदाहरण बरोबर नाहीं लागू पडत.—आईसाहेब आणि नाना ह्यांचा महापूजेबद्दल आग्रह असण्याला आणखीही कारणें आहेत.—वा ! नाना, आईसाहेब, वहिनीसाहेब, सर्व दरबारच भरला म्हणावयाचा. ( आ.—ना.—य.—येतात. ) माझी तर सरकारच्या ह्या पायांशीं पुन्हापुन्हां विनंति आहे, हें धर्मकृत्य आहे आणि सरकारच्या हातूनच झालें पाहिजे,—मोठ्या पुण्याईची गोष्ट आहे.

ना०:—सरकारला विनंति करावयाला आलों आहें.—पर्वतीवर सर्व

तयारी आहे, पालखींतून कीं अंबारींतून कशी स्वारी होणार—आज्ञा होईल त्याप्रमाणें—

मा०:—माझा कसला हुकूम ! तुम्हीं पाहिजे तर मला पालखींतून न्याल, अंबारींतून न्याल, मी बसलों आहें अशाचा असाच उचलून न्याल !

य०:—मीं नवस केला, मी एकटी अपराधी आहें. त्या दिवशीं मोठ्या प्रेमानें सांगणें झालें आईला खाजगी कारभार दिला म्हणून, आनंदाच्या त्या भरांत मी नवस बोलून गेलें.—मी पदरीं पडून पवित्र झालें, तेव्हां मजकरितां एवढा माझा अपराध विसरून जाऊन माझा नवस पुरा करावा.

आ०:—आज महाराजांनीं जाऊन जर जोडप्यानें पूजा केली नाहीं, तर लोकांत ह्या गोष्टीची चर्चा होईल.—नागनाथाच्या मरणानें आधींच भलत्यासलत्या कुतर्कांच्या अफवा लोकांत उठल्या आहेत. आणि सरकारनीं आज असें केल्यावर सरदारांच्याही मनांत भलतेंसलतें येईल.

मा०:—सरदारांच्या मनांत भलतेंसलतें काय येणार ?—नागनाथ मरावा असा मीं पर्वतीला नवस केला होता म्हणून सरदारांना सांगत सुटूं कीं काय ?

ना०:—( स्वगत ) नागनाथ जीवंत असतांना त्याची मला इतकी भीति वाटली नव्हती !

आ०:—महाराजांपाशीं आम्हां सर्वांची विनंति आहे, नाना आणि सरकार ह्यांमध्यें झालेलें रागाचें बोलणें दोघेही विसरून गेले आणि शनवार वाड्यांत श्रीमंत सरकारस्वारी, सर्व मुत्सद्दी, व सरदार एका विचारानें, सलोख्यानें व एका सल्लामसलतीनें वागत आहेत, असें सर्व

जगाला जाहीर झाल्यावांचून नागनाथ प्रकरणामुळें दरबारच्या छापेची जी घडी थोडकीशी बिघडली आहे, ती पुनः बसणार नाहीं; व चोहोंकडे बाजीरावासंबंधानें अनुकूळ निघणारे उद्गार बंद पडणार नाहींत.

ना०:—महापूजा, दीपोत्सव, मिरवणूक, ह्या सर्वांत इतर कारणांबरोबर राजकाज असतेंच. बाहेरचे थाटमाट ह्यांनीं सामान्य लोकांचीं मनें दिपून जाऊन पडद्याआड काय चाललें असतें, ह्याकडे त्यांचें लक्षच जात नाहीं.—निजाम, टिपू, इंग्रज ह्यांचे वकील पुण्यास आहेत, सरकारस्वारी पर्वतीला गेली नाहीं तर माझ्यावरील सरकारचा विश्वास उडत चालला आहे म्हणून ते आपआपल्या सरकारास लिहून कळवतील. माझी सरकारच्या पायांपाशीं एवढीच विनंति आहे, बाजीरावासंबंधानें माझ्या मनाला जी भीति वाटत आहे तिची निरवानिरव करून, पानिपतचें अपयश धुवून टाकीन म्हणून रावसाहेबांना दिलेलें वचन मला पुरतें करूं द्या.—सरकारच्या पायांच्या प्रतापानें ह्या गोष्टी वर्ष दोन वर्षांत मी तडीस नेईन.—मग गंगातटाकीं स्नान-संध्या व पूजा-अर्चा करीत कालक्रमणा करणारा नाना सरकारच्या इच्छेच्या आड जाण्यास पुण्यास केव्हांही येणार नाहीं.

य०:—मीं नवस केला नसता तर किती बरें झालें असतें !

मा०:—इतकें नको वाईट वाटून घ्यायला !—नाना, तुम्ही आतां ह्यांना पर्वतीवर घेऊन जा, पूजा-अर्चा काय करावयाची असेल ती यांच्याकडून करवा.—बाहेरच्या सोंगानें परमेश्वर कांहीं फसणार नाहीं, तेव्हां आम्ही पुजेच्या वेळीं येत नाहीं.—थाटमाटानें, नाना, तुमचें राजकाज साधेल, आम्ही दीपोत्सवाच्या वेळीं अंधारींत बसून मिरवत पर्वतीला येऊं. [ पडदा ]

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—पर्वतीचा रस्ता.

[ सदोबा, दगड्या, व गोंधळी पोवाडे म्हणत प्रवेश करितात. ]

स०:—दगड्या, आतां मी कसारे दिसतों ?–पोवाडे म्हणूं लागलों म्हणजे प्रत्यक्ष लढाई,–भिऊं नकोस,–ही गाण्यांतली लढाई आहे,–मी वीरासारखा नाहीं दिसत ?–शिवाजी महाराजांसारखा दिसतो,–नाहीं––हरीपंत फडक्यासारखा–नाहीं–जिवबादादासारखा–नाहीं–परशुरामभाऊसारखा नाहीं–महादजी शिंदे–नाहीं–मल्हारराव होळकर–नाहीं.–कायरे गध्या, मग मी काय मनुष्यच नाहीं कीं काय ?

द०:—धनीसाब आमच्या वयाच घरधनी दुसऱ्यावाणी कसे दिसत्याल ?

स०:—तसें नव्हेरे, हें तुणतुणें सुरू झालें–वाजीव गप्प काय बसतोस–हें सुरू झालें– वाजीव,–ह्या गोंधळ्यांच्या गळ्यांत अडकविलेल्या लोढण्यापेक्षां डफ किती तरी बरा,–आणि असा ऐटींत उभा राहून पोवाड्याचे फवारे माझ्या मुखांतून बाहेर पडूं लागले–"खूप शर्तीनें राज्य राखितो यशवंत फडनीस नाना. "–आतां मी तुला कसा भासतों बोल.

गों०:—"पुण्यावर तलवार धरून आला मोंगल चढाई करून "

स०:—थांब, थांब, मेंगें मिळमिळीत आणि आळणी म्हणतोस;–मीठ कधीं खाल्लें आहेस काय मीठ ?–ठसठसीत, जोरानें, ऐटबाज, म्हण. नाहींतर लोक म्हणतील ह्याची बायको पाहिजे त्यांनीं पळवून न्यावी !

द०:—धनीसाबाच्या वाणी म्हण लेका, म्हणजे तुझी घरधनीन घरच्या घरीं राहील.–आन तुलाबी चत्कोर भाकर गावल कशी म्हणून-शानी चाकरी धुंडायला बाहेर जायला नको.

स०:—आतां असें करूं, तूं म्हण आणि मी हावभाव करितों मग असा फक्कड जम बसेल !

गों०:—" ब्राह्मणी राज्य कैदवार एका परीस एक मसलती । वाद्यांत सुभ्यांची खलबत श्रीमंताची चढती रती ॥ रात्रीचा मनसुबा केला । हें वर्तमान अवघ्याला । कारखाने ज्याचे त्याला । जरिपटका हरिपंताला । नेमणूक हुजुरातीची । मराठी नेकनीतीची । तरवार विश्वासाची । त्या परशरामभाऊची । पानसे, पुरंदरे, रास्ते आणि ढमढेरे । दिली जागा पाहून मैदान पुण्याबाहेर । दिले गारपिरावर दलबादल डेरे । निघाले बाहेर रे निघाले बाहेर । पाहीना फिरून तलवार ।

[ पडद्यांत शिंगें वाजतात. ]

द०:—सरीमंताची स्वारी आलीया जणू !–नाहीं तर अशी बोंबाबोंब कशापायीं व्हणार ?–बामणानें दावलेल्या जागीं पोवाड म्हणत बसूया चला धनीसाब.

[ जातात ]

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**—पर्वतीचें देवालय.

[ नाना व आईसाहेब प्रवेश करतात. ]

**ना०:**—आईसाहेब ह्या गोष्टीचा आपण नीट विचार करावा.—मी शिरजोरपणानें वागलों असें बाबासाहेबांना व श्रीमंतांनाही वाटतें खरें, पण राजकारभाराचे सर्व डावपेंच सरकारला चांगलें समजूं लागेपर्यंत मला असें वागलेंच पाहिजे. दौलतीच्या पुढील कल्याणावर लक्ष देऊन प्रसंगीं निष्ठुरतेनें वागणें, हाच खऱ्या जिव्हाळ्याच्या प्रेमाचा मार्ग आहे.

**आ०:**—बाजीरावासंबंधानें तिकडून दौलतीच्या हिताकडे लक्षच देण्यांत आलें नाहीं. झाला हा प्रकार असा झाला नसता तर दौलत रसातळाला गेली असती.—खासगी संबंधानें आपल्या मसलतीच्या विरुद्ध मी कधींही जाणार नाहीं.—हें आनंदीबाईचें कारटें एकदां कायमचें नाहींसें केलें म्हणजे नाहीं का सगळी कटकट मिटायाची !

**ना०:**—मिटेल खरी, पण तसें करतां येत नाहीं.—आणि आतां तर—छे—वाईटच तें.

**आ०:**—शत्रूंच्या लाखों सैन्यास ज्यांना यमपुरीची वाट दाखवितां येते त्यांना हें बाजीरावाचें प्रकरण विल्हेस टाकतां येऊं नये, म्हणजे आश्चर्यच म्हणावयाचें !

**ना०:**—लवकरच कांहीं तरी तोड काढली पाहिजे.—बाकी आपण म्हणतां तो उपाय मला केव्हांही पसंत पडायाचा नाहीं.

आ०:—परवां निजामाला ज्याप्रमाणें दांतीं तृण धरावयाला लाविलें, तशी टिपूला तंबी देऊन दक्षिणेस रामेश्वराचे आसपास एखाद्या मुलखाचा तुकडा बाजीरावाचे अंगावर फेंकून द्यावा, आणि ह्या धिंडकेला एथून बाहेर काढून टाकावी.

ना०:—तसेंही जमत नाहीं.—मी त्याच विचारांत आहें.—उद्यां दरबारांत सर्वांची सल्लामसलत घेऊन काय तें ठरवूं.—मला आतां आईसाहेयांना अशी विनंति करायची आहे, सरकार स्वारी आणखी कांहीं दिवस माझ्या सल्लयावांचून वागणार नाहींत, अशी आईसाहेबांनीं होईल ती खटपट केली पाहिजे.

आ०:—मीं मगाशीं आपणाला वचन दिलेंच आहे.—शिवाय आपल्या मनाची खात्री करून देण्याकरितां परमेश्वरापुढें शपथ घेऊन बेलभंडार आपल्या हातावर उचलून देतें चला. [ जातात. ]

[ माधवराव व केशवशास्त्री येतात. ]

मा०:—नेहमीं हीं दोघें एकमेकांशीं काय कुजबुजत असतात.—शपथेबद्दल काय म्हणाले, ऐकलेंत का नीट ?

के०:—बाबासाहेबांना ह्याच गोष्टीची मोठी चीड होती, आणि नानांच्या विरुद्ध इतक्या त्वेषानें बोलत ह्याचें कारण तरी हेंच.—सरकार, बाबासाहेबांच्या अन्नानें मी वाढलों, त्यांच्याचमुळें सरकारच्या पायांचें मला दर्शन झालें,—मला ही गोष्ट बिलकुल सहन करवत नाहीं. बाबासाहेबांचें व आईसाहेबांचें प्रस्थ नानांनींच वाढविलें—

मा०:—बाबासाहेबांना हांकून दिल्याबद्दल आईसाहेबांनीं आतां पुण्यांत नाचरंग आरंभले आहेत हं !

के०:—सुग्रीव आणि तारा ह्यांच्यासारखीच ही हकीकत !

मा०:—संशय येतो, पण पुन्हापुन्हा मन माघार घेतें.

के०:—माझा देखील फार पूर्वीपासूनचा संशय होता. सरकारचें लग्न झालें नसेल तेव्हांपासून मला आपलें वाटत होतें—पण आम्ही आश्रित पडलों, लोक म्हणायाचे खाल्ल्या घरचे वासे मोजतो—म्हणून तोंडास कुलूप घालून ठेविलें होतें.—पण आज बाबासाहेबांचें पत्र आल्यापासून सर्व गोष्टींचा शहानिशा झाला !

मा०:—कोठें आहे तें पत्र मला दाखवा, माझ्याही संशयाचा शहानिशा होऊं द्या.

के०:—स्त्रीजातीसंबंधानें पुरुषांचीं मनें स्वभावतः संशयखोर असतात,—तेव्हां म्हणतों महाराजांना काय करावयाची ही उठाठेव करून ?

मा०:—दाखवा, तें मला अगोदर दाखवा.

के०:—नको सरकार, मी नाहीं दाखविणार.

मा०:—आमचा हुकूम आहे,—जर पत्र दाखविलेंत नाहीं तर नागनाथाची अवस्था झाली ती तुमची होईल.

के०:—आणि सरकारांना पत्र दाखविलें व नानांना कळलें, तर पत्र दाखविल्याबद्दल मला देहांत शिक्षा भोगावी लागेल.

मा०:—पेशव्यांच्या गादीवर मी आहें नाना नाहींत.—माझा हुकूम पाळल्याबद्दल जर तुम्हांला नाना शिक्षा करूं लागले, तर प्रथम ह्या माधवाला हत्तीच्या पायांत चिरडून मारणें नानांना भाग पडेल, मग तुमच्या केंसाला ते धक्का लावतील.—दाखवा तें पत्र.

के०:—पण मी म्हणतों रागाच्या लहरींत बाबासाहेबांच्या मनाची झालेली खात्री वस्तुतः खोटीही असूं शकेल !—अशी म्हण आहे चोर



मा०--बाबासाहेबांनी सर्व गोष्टी उघड उघड लिहिल्या आहेत. [पृ० ५३

पकडावा मोटे जार पकडावा खाटे.—असें बाबासाहेबांनीं तरी कोठें केलें आहे ?

मा०:—तसें कशाला करायला पाहिजे ?—मी नानांच्या विरुद्ध,—बाबासाहेब नानांच्या विरुद्ध—आणि आईसाहेब बसल्या उठल्या नानांचा शब्द झेलतात !—बाबासाहेब एथून निघून गेले म्हणून उत्सव करीत मिरवतात !—ह्याहून आणखी काय पाहिजे ?—द्या तें पत्र मजकडे.

के०:—मोठमोठ्या महात्म्यांचींही मनें क्षुल्लक कारणावरून उगीच बिघडून जातात.—एका क्षुल्लक धोब्याचें बोलणें मनावर घेऊन जानकी-देवीचा त्याग करण्याचें साहस प्रभु रामचंद्रानें केलें !—असला अविचार परिणामीं घातक होतो, म्हणून म्हणतों सरकाराला बाबासाहेबांचें पत्र पाहून काय करावयाचें आहे ?

मा०:—काय करावयाचें आणि काय नाहीं !—तुम्हांला कोणीं ही चौकशी करायला सांगितलें ?—आणा तें—माझी आज्ञा—

के०:—नाइलाज आहे.—परमेश्वराची साक्ष; ही गोष्ट मी वाईट करतों आहें, असें मला वाटतें. [ पत्र देतो. ]

मा०:—( पत्र घेऊन ) जा, तुम्ही जा, ते चोर देवापुढें काय ढंग करीत आहेत, तें पाहून या. [ के० जातो. ]

मा०:—( पत्र वाचून ) बाबासाहेबांनीं सर्व गोष्टी उघड उघड लिहिल्या आहेत !—आतां कसला संशय !—केशवशास्त्री त्यांच्या विश्वासांतला मनुष्य, सर्व अंतःकरण उघडें केलें आहे.—ह्या मावशीची इतकेंच नव्हे तर माझ्या खऱ्या सासूची आणि नानांची दोस्ती फार पूर्वीपासून एकूण !—बाबासाहेब पुण्यांत नकोत, बाबासाहेब पुण्यांत नकोत,—आईसाहेबांना द्या खासगी कारभार,—नाना, आतां तुमची

हीं बोलणीं मला चांगलीं समजलीं !—बाबासाहेबांना हांकून देऊन आपल्या पापी चैनीच्या मार्गांतला कांटा काढून टाकला म्हणून चोरांनीं काय हें मंदीर शृंगारलें आहे !—केवढा हा दीपोत्सव केला आहे !—काय जगाची विपरीत स्थिति ही !—हें धर्मस्थान आणि ह्याच्यावर पापाचा शृंगार व लखलखाट !—मनुष्याच्या दुःखापासून देवांची व देवळांची उत्पत्ति, आणि मनुष्याच्या पापाचा मुलामा त्यांच्या थाटामाटाच्या शिखरांवर चढविलेला !—ज्या ठिकाणीं सर्वांत भव्य देवालयें व सर्वांत उंच शिखरें असतील तेथले लोक अधिक पापी असें समजावें ! —परमेश्वरा हा पापाचा चकचकणारा मुलामा तुझ्या मूर्तींवर व कळसावर नानांनीं चढविलेला तुला खपतोना ?—डामडौलाच्या पडद्याआड मोठे लोकांनीं छपवून ठेवावयाच्या गोष्टी असतात, असेंच नाना आज म्हणाले नव्हे !—माझ्या लग्नाचा सोहळा नानांनीं केवढ्या दिमाखाचा केला ?—व्यभिचार प्रेमांत उत्पन्न झालेली घाणीची घोरपड माझ्या गळ्यांत बांधण्याकरितां तो सोहळा होता !—तोरणें उभीं केलीं, रस्तोरस्तीं केशराचे सडे घातले, हिंदुस्थानांतील सर्व वैभव व शोभा पुण्यास एकवट केली —सोन्यानें व जवाहिरांनीं मढविलेल्या अंबारीचे शेंकडो हत्तीबरोबर झुलत चालले आहेत अशी आमची थाटाची वरात काढली !—माधवा, वरात ? नव्हे ती वरात, एखादा नीच मुत्सद्दी आपल्या पापाची घाण धन्याच्या अंगाला कशी सारवतो, ह्याचें प्रदर्शन करण्याकरितां ती धिंड काढली होती धिंड !—पेशव्यांच्या दरबारांत भयंकर अपराधी शिक्षेवांचून कसा निसटतो, तें पाहून घेतल्यावांचून मी राहणार नाहीं.

( पडदा पडतो. )

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

### स्थळ—शनिवार वाडा.

[ केशवशास्त्री प्रवेश करितो. ]

के०:—( पडद्याकडे पहारेकऱ्यास उद्देशून ) सरकार स्वारी अजारी असून खुद्द नाना किंवा आईसाहेब यांच्या परवानगीशिवाय रावता बंद झाला आहे असें म्हणतोस ?—बरें, कांहीं हरकत नाहीं.—आईसाहेबांचा हुकूम झाल्यावरच सरकारचें दर्शनाला येईन. ( स्वगत ) पर्वतीवर जो मंत्र अम्हीं श्रीमंतांच्या कानांत फुंकला त्यावर नानाचा व ह्या बयेचा हा उतारा दिसतो.—आतां जपून चाचपटत चाललें पाहिजे, नाहीं तर नानानें लपवून चोहींकडे पसरून ठेवलेल्या एखाद्या फांसांत पाय चुकून अडकून पडायचा ! [ बजाबा व आईसाहेब येतात. ] आतां आपोआप समजेल मंत्रापैकीं कोणचा भाग सरकारच्या तोंडून रागाच्या भरांत बाहेर पडून ह्या जोडीच्या कानावर पडला.

आ०:—बजाबा, सांगितली ही व्यवस्था अक्षरशः अमलांत आली पाहिजे. ज्या लोकांना आंत सोडण्याविषयीं नानांचा किंवा माझा प्रत्यक्ष हुकूम तुम्हांला होईल तितक्याच लोकांना श्रीमंतांकडे दर्शनास जाऊं द्या, इतर कोणीही आंत जातां कामा नये.—आणि असें पहा लेखी हुकूम म्हणून कोणीं कागद चिठी आणली तरी मानावयाची नाहीं.

व०:—आपला किंवा नानांचा प्रत्यक्ष हुकूम असल्याशिवाय चिटपाखरूंही हा वजावा जिवंत असे तों श्रीमंतांच्या महालांत जाऊं शकणार नाहीं.—ह्या बाबींत आईसाहेबांनीं कोणच्याही प्रकारें काळजी करूं नये.

के०:—श्रीरामचंद्राला जसा हनुमान त्याप्रमाणें नानांना बजाबा, अशी सर्वतोमुखीं बजाबांची ख्याति आहे, ती कांहीं उगीच नव्हे !—त्या आनंदीबाईच्या पोरट्याच्या हेरांची बाधा सरकार स्वारीला होऊं नये म्हणून आईसाहेबांनीं जो कडेकोट बंदोबस्त सांप्रत बाह्यांत ठेवला आहे, त्याच्या सहस्रांश व्यवस्था जरी बाबासाहेबांनीं ठेविली असती—असें झालें असतें, तसें झालें असतें, आतां काय उपयोग !—मुत्सद्दीपणा शिकवून येत नाहीं.—आईसाहेबाप्रमाणें तो अंगचाच असावा लागतो. बजाबा, मी उगीच तोंडावर प्रशंसा करीत नाहीं, तुम्हांला जसा नानांच्या शहाणपणाचा अभिमान, तसें मला आपलें खरोखर वाटतें, अक्कलहुषारींत नानापेक्षांही आईसाहेब कांकणभर चढच !

आ०:—आमच्या शहाणपणाची परीक्षा घेण्याला जग बसलें आहे, तुमच्या अभिप्रायाची फारशी जरूरी नाहीं.—बरें, मी काय म्हणत होतें शास्त्रीबोवा, श्रीमंतांचे ग्रह नीट पाहिलेत का ?

के०:—पत्रिकेचा मीं नीट विचार केला. सरकार स्वारीचें मन असें उदासीन, तिरसट, व रागीट व्हायला पत्रिकेंत मला कांहीं कारण सांपडलें नाहीं.— मंगळ आणि शनि थोडे मागेंपुढें हालविल्याशिवाय सांप्रतचा योगायोग जुळतच नाहीं.—कुंडलींत तसा थोडकासा फेरफार करण्यापूर्वी हातापायाच्या रेघा तपासून तसें करायाला कांहीं आधार मिळतो का म्हणून सरकारच्या दर्शनाला चाललों होतों, इतक्यांत बंदी आहे म्हणून पहारे-

कऱ्यांनीं सांगितलें.—काय करावें म्हणून विचारांत पडलों होतों, इतक्यांत आपलें दर्शन झालें.—जशी मर्जी होईल त्याप्रमाणें वागण्यास हुकुमाचा ताबेदार तयार आहे.

य०:—आई बजाबांना जवळ असूं दे.—मी एकटी जवळ असलें म्हणजे तिकडचा संताप अधिकच वाढतो!—तुला पाहिलें म्हणजे नुसते दांत ओंठ खाऊन स्वस्थ बसणें होतें, पण तूं गेलीस आणि मी एकटीच असलें म्हणजे तुझ्यावर आणि नानांवर असें कांहीं रागवावयाचें मला बाई भीतिच वाटते!—बजाबा तुम्ही तेथून हालूंच नका, चला तिकडे.—आई, ह्यांना तूं कांहीं दुसरें काम सांगूं नकोस.

आ०:—बजाबा, जा तुम्ही.—आणि हें पहा शास्त्रीबोवांना बंदी नका करूं.

ब०:—आज्ञा. [ यशोदा व बजाबा जातात. ]

आ०:—शास्त्रीबोवा, बजाबा जसे नानांच्या विश्वासांतले, तसे तुम्ही आमच्या विश्वासांतले आहां.—तुम्हांला केव्हांही बंदी व्हावयाची नाहीं.—श्रीमंतांचाही तुमच्यावर लोभ आहे, तुमचा जपजाप आटपला म्हणजे श्रीमंतांच्या मनांत आम्हांबद्दल भलतेंसलतें कोणीं कसें भरवून दिलें, ह्याचा बारीक शोध काढा.

के०:—हें काम माझें.—आईसाहेबांनीं आतां ह्या कामीं निर्धास्त असावें.—आतां आईसाहेबांच्या देखतच श्रीमंतांची पत्रिका व हातावरील चिन्हें ताडून पहातों ग्रह कसे पालटावयाचे हें ठरून त्यांच्या जपाची आणि दानाची व्यवस्था लागली; म्हणजे हळूहळू श्रीमंतांच्या स्वच्छ मनांत कोणीं विष कालविलें ह्याचा तलास लावण्याच्या उद्योगाला लागतों.

आ०:—चला तर श्रीमंतांच्याच दर्शनाला अगोदर जाऊं.

[ जातात. ]

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—शनवारवाडा--गणेशमहाल.

[ जाधवराव, रास्ते, मेहेंदळे व नाना वगैरे दरबारांत बसले आहेत; पेशव्यांची गादी रिकामी आहे, अशा स्थितींत पडदा वर जातो. ]

ना०:—जाधवराव, रास्ते, मेहेंदळे, आजच्या दरबारचें काम सर्वांत महत्त्वाचें आहे, आणि तुम्ही जी मसलत आज मुक्रर ठरवाल, त्यावर मराठ्यांच्या साम्राज्याची भावी स्थिति सर्वस्वीं अवलंबून आहे. परशत्रूपासून व घरच्या तंटेबखेड्यांपासून तुम्हीं सर्वांनीं मिळून मोठ्या शर्तीनें आजपर्यंत ह्या साम्राज्याचा संभाळ केला; पण आतां रोजची नवीन स्थिति अशी पालटती आहे कीं, आतांपर्यंत ज्या मार्गानें गाडा पुढें चालला त्याच मार्गानें तसाच चालविल्यास, हा राजशकट खड्ड्यांत पडल्यावांचून राहणार नाहीं.

जा०:—इंग्रजांच्या मागणीबद्दल जर आपणाला एवढा बाऊ वाटत असेल.—

ना०:—इंग्रजांचा मला आज कांहीं एवढा मोठा बाऊ वाटत नाहीं.—पण आज नाहीं उद्यां त्या संकटाशीं आम्हांला टक्कर दिली पाहिजे.—इंग्रजी सत्ता रोजच्यारोज वाढत आहे ह्या गोष्टीकडे लक्ष पुरविलेंच पाहिजे.—राघोबादादाचा पक्ष कंपनी सरकारनें पूर्वीपासून घेतला आहे, आणि ह्या बाजीरावाच्या कारस्थानामुळें त्यांना योग्य संधी मिळाली तर रोज जड होणारें हें तराजूचें पारडें आपल्या भाराखालीं आम्हांला चिरडून टाकल्याशिवाय राहणार नाहीं.

रा०:—शिंदे, होळकर, भोसले, पटवर्धन वगैरे सर्व सरदार व मुत्सद्दी ह्या गादीशीं इमानानें व एक दिलानें वागत असल्यावर, बाजीरावानें आमच्या साम्राज्याला कितीही छिद्रें पाडलीं व परक्यांना आंत घुसण्याला संधी दिली, तरी आमच्या केंसासही धक्का लागणार नाहीं.—खर्ड्याची लढाई फत्ते करून आम्हांला थोडकेही दिवस झाले नाहींत; आमचें अफाट व यशस्वी सैन्य आपआपल्या ठिकाणावर पोंहचून जयोत्सवाच्या नाचरंगांत मग्न असण्याची ही वेळ; आणि अशा वेळेला फडणविसांना साम्राज्यावर मोठें संकट आलेसें वाटावें, हें मोठें आश्चर्य आहे !

मे०:—सांप्रत संकट कसलें आलें आहे !—जाधवराव, तुम्ही मॅलेटला साफ सांगा, व्यापाराची परवानगी कंपनीला मिळत नाहीं, इतकेंच नाहीं तर तुमची एक चिंधीही घाटावर आम्ही चढूं देणार नाहीं.—अहो, त्यांना जोरानें दरडावलें म्हणजे अपोआप गप्प बसतात. साम्राज्यावर संकट कसलें आणि काय कसलें !

ना०:—रास्ते, खर्ड्याच्या विजयामुळें आमचा दरारा चोंहोकडे बसला आहे व सरदारांचीही पुन्हां जूट झाली आहे, ही गोष्ट खरी; पण ह्या वेळीं सरदारांची ही जूट कायमची टिकण्याची व्यवस्था जर आजच आम्हीं केली नाहीं, तर आपण होऊनच आपल्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखें होणार नाहीं काय ?—आपली सत्ता वाढवावयाला जागा नाहीं म्हणून शिंद्यांनीं मनांतल्या मनांत झुरावें, भोसल्यांनीं त्याच कारणाकरितां इतरांवर धुसपुसावें, गायकवाडांना गुजराथेंत यथेच्छ चरावयास सांपडतें म्हणून होळकरांनीं त्यांना पाण्यांत पहावें, सातारच्या महाराजांचें तेज ह्या गादीपुढें फिकें पडतें म्हणून आमच्यामागें गायकवाडांनीं लकडा लावावा,

अशी स्थिति किती दिवस तुम्ही पुढें चालविणार ? आपआपसांतल्या तंट्यांमुळें उत्पन्न होऊं पाहणाऱ्या ह्या वैराग्नींत तेल ओतण्यास राघोबा-दादाचा पक्ष व त्यांचे पाठीराखे इंग्रज तयार आहेतच.—आमच्या साम्राज्या-वरचें हें संकट कांहीं लहानसहान नव्हे !—शिवाजीमहाराजांनीं स्थापलेलें स्वराज्य औरंगजेब बादशहाशीं वीस वर्षे टक्कर मारून तावून सुलाखून उत्तम कसास उतरलें तरी साताऱ्च्या गादीबद्दल ताराबाईनें जेव्हां तंटा आरंभला आणि एकीची बेकी करून कोल्हापुरास नवीन गादी स्थापिली, तेव्हां त्या भाऊबंदकीमुळें साताऱ्च्या पंचक्रोशीपलीकडे छत्रपतींची सत्ता नाहींशी होऊन शिवाजीमहाराजांचें स्वराज्य संपुष्टांत येतें कीं काय अशी भीति सर्वांना नाहीं का वाटली ? आनंदीबाईच्या पक्षाच्या दुहीमुळें मराठी साम्राज्यावर सांप्रत तसाच प्रसंग येऊं पहात आहे व त्या वेळीं बाळाजी विश्वनाथ यांनीं स्वराज्याचा विस्तार करून ज्या युक्तीनें संकटांतून सर्वांस पार पाडलें तशाच प्रकारची युक्ति आपण आतांही योजिली पाहिजे.

जा०:—आपण काय ती मसलत ठरवावी. आपल्या मसलतीच्या बाहेर कोणीही सरदार जाणार नाहीं, ह्याची हमी आम्ही तिघेजण घेतों.

में०:—ब—रा०:—( मिळून ) नानांच्या मसलतीच्या बाहेर कोण जाणार ?

ना०:—आतां श्रीमंतांची स्वारी आली म्हणजे ह्या गादीपाशीं मी विनंती करितों.— आपल्या सर्वांचें पाठबळ असल्यावर श्रीमंतांचा रुकार पडल्यासारखाच आहे. ( पडद्यांत भालदार चोपदारांचें ललकारणें होऊन माधवराव प्रवेश करितात. खडी ताजीम व मुजरे होऊन माधवराव गादीवर बसल्यावर सर्व बसतात. )

मा०:—माझी तब्येत आजकाल बरोबर नाहीं.—मी जाऊं का

आपल्या महालांत; जाऊन स्वस्थ पडतों.—येथें आलों तेव्हां बरें वाटेलसें वाटलें होतें.—नाहीं, डोकें फार दुःखूं लागलें.

**रा०**:—सरकार स्वारीची तब्येत बिघडायला झालें तरी काय ?

**मा०**:—कारणाविरण कांहीं नाहीं.—उगीचच्या उगीच पित्त फार झालें आहे !—पित्ताचे झटके वरच्यावर येतात.

**ना०**:—श्रीमंतांनीं बाजीरावासंबंधानें व नागनाथासंबंधानें उगीच मनाला दुःख करून घेऊं नये.—बाजीरावसाहेबांची व्यवस्था काय लावायाची हें नक्की ठरविण्याकरतांच आजचा हा दरबार आहे.

**मा०**:—व्यवस्था तुम्ही काय लावणार ? प्रत्येकाच्या मृत्यूची व्यवस्था त्याच्या जन्माचे वेळींच लागलेली असते.—बाजीरावाचा किंवा माझा किंवा आणखी कोणाचाही मृत्यु फार झालें तर आणखी दोन दिवस अगोदर ओढून घ्याल,ह्याहून निराळी व्यवस्था सर्व सरदारांची जूट करून तुम्ही काय लावणार?

**ना०**:—सरकार,माझी विनंती ऐकून घ्यावी आणि मग मला दोष द्यावा.

**मा०**:—मागाहून दोष काय, प्रारंभीं दोष काय, सर्व एकच.—मला विनंती कसली करतां ?—सरदारहो, तुम्ही मला पेशवा समजूं नका,. बाजीराव ज्याप्रमाणें शिवनेरीस कैदेंत आहेत त्याप्रमाणें—मी जिवावर उदार आहें.—उघड उघड तुमच्या तोंडावर बोलतों—शनवारवाड्यांत मी नानांचा कैदी आहें, आणि माझ्यावर पहारेकरी कोण म्हणाल तर आमच्या त्या मानलेल्या सासूबाई ?—त्या बाईची परवानगी घेतल्याशिवाय मला कोठें जातां येत नाहीं, येतां येत नाहीं, माझी कोणाची गांठ पडत नाहीं !—मी दरबारला येणार नव्हतों, पण माझ्या सरदारांना माझ्या कैदखान्याची गोष्ट सांगण्यास पुन्हां संधी आईसाहेब व नाना देणार नाहींत म्हणून मुद्दाम आलों.

**ना०:**—सरकारनीं आमची मसलत ऐकली म्हणजे सरकारच्या मनाला खात्रीनें बरें वाटेल.

**मा०:**—मला आतां बरें कसचें वाटणार !—ह्या कैदखान्यांत माझें दुखणें रोजच्या रोज वाढतच जाणार !—माझ्या मस्तकाला शांति केव्हांही मिळायाची नाहीं, तें एकसारखें दुखायचेंच !—माझ्या डोळ्यांला कावीळ झाली आहे, पण जग पिवळें न दिसतां काळें कुळकुळीत दिसूं लागलें आहे !—माझ्या कानांतील यंत्र बिघडलें असून दरबारांतील कर्कश भेसूर अवाज तेवढे ऐकूं येतात !—माझ्या नाकाला सुवासच येत नाहीं, आणि जवळच्या मनुष्याची तर अशी घाण येते—( उठून जाऊं लागतो ) छे ! माझ्यानें नाहीं येथें बसवत.—मी जाणार—

**ना०:**—सरकारांनीं थोडा वेळ—

**सर्व सरदार:**—सरकारच्या पायांपाशीं आमची विनंती—

**मा०:**—मी जाणार.—दरबारचा आणि गादीचा हा दिवाणखाना निदान ह्या दुर्दैवी कैद्याची कोंडून ठेवायाची कोठडी करूं नका.

[ जातो, बरोबरची सर्व मंडळी निघून जातात. ]

**ना०:**—सरदारहो, आमच्या साम्राज्यावर मोठें संकट येऊं पहात आहे म्हणून मी म्हणत होतों तें हेंच.—नागनाथाला शिक्षा झाल्यानंतर सरकारचे मनाला बाजीरावाचें वेड अधिकच लागलें आणि पर्वतीच्या दीपोत्सवानंतर तर सरकारचें मन कांहीं विलक्षणच झालें.—अशा स्थितींत श्रीमंतांवर देखरेख आईसाहेबांनीं जरा सक्तीनें ठेवावी व श्रीमंतांकडे दरबारी लोकांचा असलेला राबता बंद करावा, म्हणून आईसाहेबांना मीं विनंति केली. श्रीमंत फार रागावले आहेत; पण त्याला इलाज नाहीं.—



मा०—या कैदखान्यांत माझें दुखणे रोजच्यारोज वाढतच जाणार [ पृ० ६२

बाजीरावासंबंधानें जी व्यवस्था मी आपणांस सुचविणार आहें ती व्यवस्था सर्व सरदारांना मान्य झाल्यास व तसें घडून आल्यास श्रीमंतांचें मन पुन्हां स्वस्थ होऊन, ते आनंदी आनंदांत आहेत, असें आपल्या दृष्टीस पडेल.

**सर्व सरदारः**—कोणती ती व्यवस्था सांगा.

**ना०ः**—आपणांस पानिपतचें अपयश धुवून टाकावयाचें आहे, सरदार मंडळींतील आपआपसांतला हेवा व मत्सर नाहींसा करावयाचा आहे, आणि परशत्रूपासून भाऊबंदकीमुळें मराठी साम्राज्यास केव्हांही धक्का बसूं नये अशा भक्कम पायावर आमच्या साम्राज्याची ही टोलेजंग इमारत नेऊन ठेवावयाची आहे. ह्या सर्व गोष्टी घडवून आणायाला एकच युक्ति आहे, आणि ती हीच कीं पानिपतच्या वेळीं भाऊसाहेबांनीं दिल्लीचें मोंगलाचें तक्त फोडलें त्या ठिकाणीं नवीन तक्त जडवून सर्व सरदारांनीं मिळून सातारचे छत्रपतींना त्या तक्तावर बसवावें.—भाऊसाहेबांनीं मोंगलांचें तक्त फोडलें त्या वेळीं मी जवळ होतों. सुराजमल्ल जाटानें भाऊसाहेबांना हरकत केली कीं, ज्याच्या मनगटांत ताकद असेल त्यानें पाहिजे तर ह्या तक्तावर बसावें, पण हें पुरातन तक्त फोडूं नये. त्या वेळीं भाऊसाहेबांनीं उत्तर दिलें, शिवाजीचे वंशज, आमचे सातारचे छत्रपति, मोंगलांनीं भ्रष्ट केलेल्या सिंव्हासनावर बसणार नाहींत.—सरदार हो, पानिपतच्या युद्धांत अपयश आल्यामुळें भाऊसाहेबाचे बेत जागच्या जागींच राहिले!—सांप्रत खर्ड्यांच्या विजयानें मराठी साम्राज्याला पुन्हा टवटवी आली आहे. ह्या वेळीं शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पुण्याचे सरदार, श्रीमंत पेशवे व सातारचे छत्रपति, ह्या सर्वांची एक जूट करून दिल्लीस मराठ्यांचें तक्त स्थापूं या.—दिल्लीच्या तक्तावर स्थाप-

लेल्या छत्रपतींना दिल्लीप्रांत व रोहिलखंड इतका प्रदेश बादशाही थाटा-माटाचे खर्चास पुरेसा होईल, लखनौच्या नबाबाचे सुपीक प्रांत शिंद्यांचे महत्त्वाकांक्षेस पुरून उरतील, बुंदेले व नागपूरकर यांना बंगाल्याकडे हातपाय पसरण्याची मोकळीक दिली असतां तेही खूष होऊन इंग्रजांना तंबी बसेल, होळकर व रजपूत सरदार यांनीं पंजाब व पश्चिम प्रदेश घेरावा म्हणजे इराणी दुराणींची वाट कायमची बंद होईल, आणि आमच्या बाजीरावाला दिल्लीच्या छत्रपतींचे उत्तरेचे पेशवे म्हणून काश्मिरांत नांदू दिलें असतां छत्रपतींचाही बोज राहून दक्खन ह्या गादीला व तुम्हां सरदारांना मोकळी राहील.—श्रीमंतांच्या मनाला ह्या मसलतीनें खात्रीनें बरें वाटेल, आणि सरदारहो, श्रीमंतांच्या ह्या यशस्वी गादीवर हात मारून शपथ घेऊन ही मसलत शेवटास न्यावयाचें जर तुम्हीं मनांत आणलें तर ह्या कामीं खात्रीनें आम्हांस यश येईल.

**सर्व सरदार०:**—आम्ही शपथ घ्यावयाला तयार आहों.—

( "गादीवर हात ठेऊन गादीची शपथ घेतों कीं नानांच्या मसलती-बाहेर मी कधींही वागणार नाहीं."—अशी शपथ सर्व घेतात. )

**ना०:**—ह्या दरबारचें आजचें काम शेवटास गेलें; आतां आमच्या वाड्याकडे जाऊन पुढील उद्योगाची वाटाघाट करूं.

[ पडदा पडतो. ]



सवाई माधवराव यांचा गणेश दरबार.

# प्रवेश तिसरा.

**स्थळ**— नानांच्या वाड्याच्या दरवाज्यापुढील रस्ता.

[ चोपदार व दोन नोकर प्रवेश करतात. ]

चो०:—स्वारी यावयाची वेळ झाली आणि अद्याप तुम्हीं गर्दी मोडली नाहीं. ( लोकांच्या गर्दीला उद्देशून ) हटा मागें.—दूर उभे रहा. —लांबून मुजरा केला तरी महाराजांना पोंचतो.—काय चेंगट लोक हे ! —आतां तोबे बसतील तोबे !—बेलाशक तोबे मारा.—येथें दर्जाविर्जा कांहीं नाहीं.—हाटो, हाटो, और पिछे हाटो, और पिछे हाटो.—लगाव तोबे, एरव्हीं भागायाचें नाहीं. ( नोकर तोबे मारून गर्दी साफ करतात.— गर्दीतून दोन गृहस्थ पुढें येतात. )

प०:—चोपदारसाहेब, असें पहा—

दु०:—आज जरा मजकडे नजर होईल अशा जागीं आम्हांला उभें कराल—

चो०:—सर्वांच्याकडे नजर होते.—महाराज कांहीं डोळे मिटून नाहीं वाड्यांत शिरत !

प०—दु०:—( मिळून ) आम्ही आज नजरेस पडलोंच पाहिजे.— फडांत आमचे महत्त्वाच्या कामाचे अर्ज पडले आहेत.—एवढी मेहेरबानी —तुमची खटपट फुकट नाहीं. ( चोपदाराच्या हातांत रुपये ठेवतात. )

चो०:—( रुपये घेऊन ) ह्या येथें असे उभे रहा !—( दरवाज्याच्या

दोहों बाजूंनीं उभे करतो. ) खबरदार हाललां तर तोबे खाल.–काय लोकांची ही कटकट !

प०:—आतां मजवर भानूंच्या नेत्रांतला एक तरी किरण पडेल !

दु०:—ह्या बाजूला नजर होईल आणि भानूंच्या दोनही नेत्रांतील किरणांनीं माझें आज स्नान होईल ! ( केशवशास्त्री व सदोबा येतात. )

चो०:—( सलाम करून ) अजून स्वारी आली नाहीं.–वेळ झाली आहे.–आंत जावयाचें होतें

के०:—आंत नाहीं जात, एथेंच उभा राहतों.–ह्यांना घेऊन या म्हणून हुकूम झाला होता.

[ नाना, रास्ते, मेहेंदळे, जाधवराव प्र० करतात. ]

चो०:—स्वारी आलीच !

के०:—“ अखंडितलक्ष्मीचिरायु भव ” ( इतर सरदार वाड्यांत शिरल्यावर, नाना जाऊं लागतांना त्यांच्याजवळ जाऊन ) परवां जी मीं विनंति केली होती,–तेच हे माझ्या गांवचे पाटील.–बाजीरावसाहेबांनीं ह्यांच्या बायकोला–

स०:— हो सरकार माझ्याच बायकोला—

ना०:—हें जरा नाजूक काम आहे, विचार ( के. सदोबास दूर उभा राहण्यास खुणावतो. सदोबा दूर होतो. ) मागाहून—

के०:—( कानाशीं ) नागनाथाचीं पत्रें ह्यांनींच आपल्या बायकोपासून चोरून आणलीं.–सध्यां त्यांचा असा अर्ज आहे, श्रीमंतांच्या कानावर स्वत: अर्ज घालीन म्हणून—

ना०:—त्याला कांहीं हरकत नाहीं.—बाजीरावाचीं हीं दुष्कृत्यें श्रीमंतांच्या व लोकांच्या कानावर जातील तितकीं चांगलीं.

के०:—हुकूम झाला तर ह्यांना श्रीमंतांकडे घेऊन जातों.

ना०:—कांहीं तरी मिषानें घेऊन चला.—आईसाहेबांना माझी हरकत नाहीं म्हणून सांगा—

के०:— पोवाडे चांगले म्हणतो,—श्रीमंत खूष झाले म्हणजे आस्ते आस्ते विनंति करील—

ना०:—बरें. ( वाड्यांत जातात ).

के०:—चला पाटीलबुवा.—कसें झालें काम ?

स०:—तुम्ही एकमेकांचे कान चघळत चघळत बोलत होतां तेव्हां नानांनीं चारदां मजकडे पाहिलें !—चारदां नाहीं,—तीनदां,—दोनदां—

के०:—दोनदां कां ?—एकसारखे तुमच्याचकडे पहात होते !

स०:—मी दोनदांच पाहिलें !—एकसारखा खालीं मान घालून उभा होतों !—एकदां गालांतल्या गालांत हांसले नाहीं ? आंत जातांना वळून देखील पाहिलें नाहीं ?

के०:—चलाहो, काम फत्ते झालें.

[ जातात. ]

## प्रवेश चवथा.

स्थळ—शनवार वाड्यांतील बाग.

[ बागेंत फिरत माधवराव प्रवेश करतात. ]

मा०:—( स्वगत ) ह्या बागेंतल्या झाडांप्रमाणें निश्चळ व स्थिर असा मी जन्माला आलों असतों,–कैदखान्यांत असतांनाही ह्या वेलीप्रमाणें मीं हात हलविले असते; ह्या फुलांप्रमाणें आनंदानें हंसलों असतों!–मनुष्याचा जीव माझ्या शरीरांत परमेश्वरानें घातला त्यापेक्षां ह्या झाडाझुडपांचा जीव जर माझ्या शरिरांत ओतला असता, ह्यांना काटणाऱ्या, कापणाऱ्या, तोडणाऱ्या माळ्याकडे पाहून हीं फुलझाडें जशीं डोलतात, वागडतात, हंसतात, तसें मींही नानांना, आईसाहेबांना खूष केलें असतें!–पुरंधरला मला जाऊं देत नाहींत!–नाशिक पंचवटींत कांहीं दिवस राहीन म्हटलें तर तें नानांना पसंत नाहीं!–बाजीरावसाहेबांची गांठ घेऊन त्यांच्या सहाय्यानें ह्या नानाचा सूड उगवावा–दोन कैद्यांची कशी गांठ पडणार? ( आईसाहेब व दासी हातांत तसबिरा घेऊन येतात. ) आले आमच्यावरचे पहारेकरी.–येथें स्वस्थ पडून राहूं.–दर्शन नकोसें वाटतें ह्या पाप्यांचें!

आ०:—वेटावरून इंग्रजी वकिलाकडून भेट म्हणून फिरंगी कारागिरानें काढलेल्या तसबिरी आल्या आहेत.

मा०:—मग त्या नानांच्याकडे पाठवून द्या.

आ०:—ह्या तसबिरा खरोखरच चांगल्या काढलेल्या आहेत, आणि त्या पाहून महाराजांना आनंदच वाटेल.–ही नानांची तसबीर पहावी–ही मुलीची, ही महाराजांची.

मा०:—( स्वत:ची तसबीर हातांत घेऊन ) ह्या तसबिरींतल्या माधवाला जसें बोलतां येत नाहीं, चालतां येत नाहीं, विचार करण्याचें सामर्थ्य नाहीं,—वस्त्रालंकारांनीं सजविलेल्या व पेशव्यांच्या गादीवर भारवाहक होऊन बसलेल्या तसबिरींतील ह्या बाहुल्याला पाहिजे त्या रुमालांत गुंडाळून ठेवलें तरी जसें चालतें,—पाहिजे त्या पेटींत कोंडून ठेविलें तरी जसें हें बाहुलें हूं का चूं करीत नाहीं,—पाहिजे त्या खुंटीला लटकावून ठेविलें तरी हव्या त्या भिंतीला चिकटून बिनबोभाट जसें हें चित्र राहतें,—तशांतलाच हा जिवंत, धटिंगण माधव आहे असें तुम्ही समजतां काय ?—जा, ह्या तसबिरी तुमच्या नानाला अर्पण करा, म्हणजे ते खूष होऊन पर्वतीवर आणखी एखादा दीपोत्सव करून तुमची हौस पुरवतील.

आ०:—महाराज, श्रीमंतांच्या ह्या पायांखेरीज आम्हांला दुसरा कोणचा तरी आश्रय आहे काय ?—श्रीमंतांचें कल्याण व्हावें—

मा०:—मग बाजीरावसाहेबांना मीं काल लिहिलेलीं पत्रें तुम्हीं कां फाडून टाकलीं ?—पुरंधरला रहावयाला जातों म्हटलें तर नानांना आवडणार नाहीं म्हणून कां उत्तर दिलेंत ?—माझ्याशिवाय आस्रा नाहीं म्हणे !—नानांचा आस्रा आहेना ?—जा त्यांच्या वाड्यांतच रहावयाला जा. ( माधवराव तोंड फिरवून तोंड झांकून बसतो.—केशवशास्त्री येतो. )

आ०:—( केशवशास्त्र्यास एकीकडे ) काय शास्त्रीबोवा, तुमचा जप आटोपला काय ?—राहु-केतूंच्या दानांची काय व्यवस्था केली ?

के०:—शनीचा जप मींच चालविला आहे.—एक दोन दिवसांत तो माझा जप संपेल.—राहु-केतूही महाराजांना सध्यां वाईटच आहेत. आणि ज्वर, अपस्मार अशासारखी पीडा सरकारला होण्याचा संभव

आहे.–शनि–राहु–केतु ह्या पापग्रहांची तनुस्थानावर सध्यां फारच वाईट दृष्टि आहे.

आ०:—म्हणून म्हणतें, त्यांच्या दानांची व्यवस्था केली पाहिजे.

के०:—शनीचा मी बंदोबस्त करतोंच.–राहु-केतूंच्या मंत्राला ब्राह्मण बसविले आहेत. थोडेच दिवसांत गुण येईल.–आईसाहेबांनीं काळजी करायाचें कारण नाहीं.–आमच्या मंत्रापुढें ह्या ग्रहांचें काय चालणार आहे?–सरकार स्वारी अशी कां बसली आहे ?

आ०:—महाराजांच्या मनाला स्वस्थता नाहीं.–तुमचें जपाचें काम आटोपलें म्हणजे तुम्ही स्वारीपाशीं असत जा नेहमीं.

के०:—ह्या तसबिरा आहेत वाटतें !–पाहिल्या नाहींत महाराजांनीं ?

आ०:—नाहीं.

के०:—मी दाखवितों.–सरकारच्या मनाची कांहीं करमणूक होईल.–एक माझी विनंति आहे, होतां होईल तों सरकारशीं कमी बोलण्याचें आईसाहेबांनीं केलें पाहिजे.

आ०:—मी आतां तसेंच करितें.

के०:—आणखी एक विनंती, नानांनीं सांगितलें आहे, त्या पोवाडेवाल्यांना सरकारकडे नेण्याला कांहीं हरकत नाहीं म्हणून—

आ०:—माझी ना नाहीं.–मी त्यांना पाठवून देतें.–महाराजांची करमणूक करून त्यांच्या मनाला बरें वाटेल असें करा.–असें तुम्हीं केलें तर तुमचे उपकार जन्मोजन्मीं आम्ही विसरणार नाहीं. ( केशवशास्त्री दासीकडून तसबीर घेतो ) ( स्वगत ) श्रीमंत पोवाडे ऐकूं लागले म्हणजे सरकार कशानें खूष होतात, काय बोलतात, तें नीट ऐकलें पाहिजे.

मातां असें करावें, पोवाडे म्हणणारांना पाठवून दिल्यावर आपणही त्यांच्या पाठोपाठ येऊन येथें आड उभें रहावें. [ दासी व आई० जातात. ]

के०:—( माधवरावाजवळ जाऊन तसवीर पहात ) मला वाटतें ह्या फेरंगी कारागिरासारखा कारागीर आमच्या लोकांत नाहीं मिळायाचा !— काय गुलामांची रंगाची खुमारी ! चित्रांत वाळसें तरी किती !

मा०:—( तोंड फिरवून चोहोंकडे पाहून ) गेली एकदांची सासूबाईची धिंडका एथून—

के०:—सरकार पहावें, कसा अगदीं नानांचा हुबेहूब चेहरा निघाला आहे !—मनुष्याचा स्वभाव चित्रांत दाखविण्याची हातोटी !

मा०:—नानांच्या स्वभावाची सर्व घाण ह्या तसविरींत दिसते ?

के०:—ह्या चित्रांत तिघांचेही चेहेरे त्यानें काढलेले आहेत.—ही नानांची उंच मान पहा.—ते तीक्ष्ण डोळे, तो वर चढलेला भालप्रदेश, अधिकाराची हौस, करडा अंमल, आणि विलक्षण बुद्धिमत्ता दाखवीत आहे.—सर्वांच्या वर आपण असावें ह्या नीच महत्त्वाकांक्षेमुळें, आपण सर्वांत उंच व्हावें ह्या प्रबल इच्छेमुळें, शरीराच्या उंचीला भर घालण्याकरितां चेहरा लंबोत्तर झाला आहे !—सरकार, धन्याला राज्यावरून झुगारून देणाऱ्या हैदरचा चेहरा देखील असाच लंबोत्तर होता !

मा०:—माझा चेहरा देखील लंबोत्तर आहे.

के०:—ती पहा, ती नानांची तिरकस नजर ती सर्वांत भयंकर !— सद्‌गुणांचा सरळ मार्ग सोडून वांकडे गेलेले जगांतील कुचके नासके दुर्गुण ह्या वांकड्या प्रवाहांतून वाहत आहेत !—प्रत्येक पाऊल वांकडें, प्रत्येक कृत्य वांकडें !

मा०:—माझी नजर जरा वांकडीच आहे नाहीं ?

के०:—राजे लोकांचे अंगीं थोडकासा गुप्तपणा आणि कावेबाजपणा असलाच पाहिजे.—नानांच्या व महाराजांच्या चेहऱ्यांत कांहीं बाबींत साम्य आहे हें खरें !—पण नानांच्या ठिकाणीं जे दुर्गुण तेच सरकारच्या चेहऱ्यांत सद्गुण होतात. गुण होणें किंवा दुर्गुण होणें हें स्थानावर अवलंबून असतें.—दोघांच्या चेहऱ्यांत साम्य असलेंच पाहिजे.—सृष्टिकर्त्यानें अलौकिक बुद्धिमत्तेचे दोन पुरुष उत्पन्न करून एकानें दुसऱ्याची प्रधानकी सांभाळावी व राज्याचें संरक्षण करावें, हा दोघांचा संबंध दाखविण्याकरितां शारीरिक साम्यतेच्या रज्जूंनीं दोघांना जखडून टाकलें तर त्यांत काय नवल ?

मा०:—आमच्या दोघांच्या चेहऱ्यांत हा सारखेपणा कोठून आला ?

के०:—हा वयनींसाहेबांचा चेहरा पहा.—ती किंचितशी उंच मान, लंबोत्तर चेहरा—

मा०:—खरेंच !

के०:—महाराज, जे प्रेमरज्जूंनीं जखडले आहेत, ज्यांनीं एक मिलाफ होऊन सर्व आयुष्यभर जणूं एक रूपानेंच राहिलें पाहिजे, ज्यांचें पापपुण्य सुखदु:ख कायमचीं सांगडलीं आहेत, त्यांच्या बाह्यरूपांत सारखेपणा नकोका असावयाला ?

मा०:—नानांच्या आणि हिच्या चेहऱ्यांत सारखेपणा असणें जुळतें एक वेळ. बाबासाहेबांनीं मला लिहिलेल्या पत्रांत ह्या सारखेपणाचा उलगडा केला आहे.—पण माझ्या चेहऱ्यांत—कसें म्हणतां ? काय कारण बरें ?

के०:—कारण कसलें आणि बिरण कसलें ! ( सदोबा व गोंधळी

येतात. ) वा ! हे बरे आले पोवाडे म्हणणारे.–या.–सरकारपाशीं परवां ह्यांच्या पोवाड्यासंबंधानें विनंति केलीच होती.–फारच उत्तम म्हणतात. ( सदोबा व पोवाडे म्हणणारा गोंधळी मुजरा करतात ). हे पाटील पूर्वीं बाजीरावसाहेबांपाशीं होते.

मा०:—या पाटील या, बाजीरावांच्या मनुष्याला पाहिलें म्हणजे आनंद होतो.–बाजीरावसाहेब खुशाल आहेत ना ?–माझी त्यांना आठवण होते ना ?–नागनाथासंबंधानें—

स०:—नागनाथ कधींच मेला—

के०:—हे हल्लीं पुण्यासच असतात.–बाजीरावसाहेबांकडे पूर्वीं होते.

मा०:—धन्य तुम्ही, बाजीरावसाहेब तुम्हांला डोळ्यांनीं पहायाला मिळाले !–काय हो माझी व त्यांची भेट केव्हां होईल ?

स०:—भेट कोठून होणार सरकार ?

मा०:—तें कां बरें ?

स०:—बाजीरावसाहेब मला नेहमीं रागें भरत, पेशव्यांच्या कुळांत जन्मलों म्हणून मला पेशवाईची गादी अंतरली !–दुसरे कोठें ते जन्मले असते तर खालीनें पेशवेच व्हावयाचे !

के०:—नको तुमचें हें चऱ्हाट.–म्हणा तुम्हा सुरू करा.—सरकार, कोणचा म्हणूं देत ?–खर्ड्याच्या स्वारीचा ?–म्हण एखादें कडवें म्हण.– फार चांगलें म्हणतो.

गों०:—‘ तलवार पुण्यावर धरून आला मोंगल चढाई करुन— कुचावर कूच पाहीना मागें फिरून ॥ ’ ‘ बावन पागा हुजरात छबीना

डेऱ्याभोंवता उभा । शिंद्यांची सातशें तोफ, बरोबर कंपू सवता उभा । आल्या नागपुराहून फौजा भोंसल्यांच्या बाणांची तवां । पेंढार वासडेवाला होळकर शत्रूला दबदबा । तीन लाख मिळाली जेलन पेशवेशाही । प्रतिनिधी बरोबर माधवराव सवाई । ही कृपा शाहु राजाची ब्रह्म बाच्छाई । लढाई मारूरे लढाई मारूरे एकदां ठरून । तलवार ॥ होते वकील मोंगलांकडील पत्र पाठविलें तपशील लिहून । नानाचा अवघा खेळ बरोबर श्रीमंताला घेऊन । तीन लाख सैन्य हिंदुचें उतरलें सीमेवर तळ देऊन । हे शाणव कुळींचे भूपाळ, चढले भगव्या ढाला घेऊन । पठाणांनीं गर्दी केली । मग चढला निजाम अल्ली । सांडणी बातमी आली । लष्करांत गलबल झाली । हुकूम नानांनीं केला । त्या दवलतराव शिंद्याला । भोंसला नागपुरवाला । मग होळकर तयार झाला । बावन पागा हुजरात खासगीवाले । डंक्यावर टिपरी पडतां हुषार झाले । पेंढार घांट रोखून उभे भोंवताले । उठा नानांच्यारे उठा नानांच्या हुकमा—

मा०:—जेथें तेथें नानांचा हुकूम, आणि मी कोणीच नव्हे ?—जावें तेथें नाना, दरबारांत जा नाना आहेतच,—पर्वतीला दर्शनाला जा नाना आहेतच,—पोवाडे ऐका त्यांत नाना आहेतच !

स०:—नाना तसेच आहेत सरकार.—म्हणरे म्हण बाजीरावसाहेबांच्या पुढें म्हणायाचा नानावरचा पोवाडा.—बाजीरावसाहेबांनीं केलेला—तो नवा म्हण.

मा०:—बाजीरावसाहेबांनीं केलेला !—म्हण, अगोदर म्हण, माझे कान पवित्र होऊं देत !

गों०:—श्रीमंत सवाईरावसाहेब वशिल्याचा मोती दाणा । धुर्त कपटें राज्यभोगितो यशवंत फडणीस नाना ॥ दुष्ट बुद्धीचे सागर नाना ऐसे

नाहीं होणार । पापी म्हणोनि राज्य भोगितो मनसोबिची तलवार । पेशवे कुळांतले राघोभरारी गेले देशोधडीला । वशिल्याचा धनी आणला गादी ही माधवाला । लक्ष नारायणरावाचे पायीं हा वर भाव । स्वकुळाचे मूळ बसविले वाढविले माधवराव । नागनाथा मरण आलें पेशवे कुळास कैदखाना । पर्वतीवर विलास करतो जैसा गोकुळीं हा कहाना ॥ श्रीमंत सवाई—

के०:—हा कोणचारे हेंगाडा पोवाडा काढलास ?–हा पोवाडा बाजी रावसाहेबांच्या पुढें पाहिजे तर म्हण.–शनवार वाड्यांत म्हणण्याची तुला लाज कशी नाहीं वाटत ?

मा०:—म्हणूं दे, कांहीं हरकत नाहीं.–माझें मन घट्ट झालें आहे.–दरबारांत नागनाथाला मीं शिक्षा सांगितली, त्या वेळचे त्याच्या तोंडचे शब्द मला आठवूं लागले आहेत.–म्हण, मला वशिल्याचा म्हण.–दुसऱ्या कोणाचा म्हण.–तुझें बोलणें खोटेंही नसेल.–( उठून ) बाजी-रावसाहेबांना मीं किती प्रेमाचीं पत्रें पाठविलीं, कितींदा पत्रांतून वचन दिलें, आणि त्यांचा मनुष्य नागनाथ हत्तीच्या पायांत माझ्या डोळ्यांदेखत मारला जातो तेव्हां बाजीरावसाहेबांनीं, पुण्याच्या लोकांनीं, ह्या गोंध-ळ्यानें, कां मला ‘ कोणाचा कोण तरी, नानांच्या वशिल्याचा ’ असें म्हणूं नये ?–पेशव्यांचें रक्त जर माझ्या अंगांत खेळत असतें तर ह्या नानानें माझा असा बंदीवास कां केला असता ?–म्हणा, मला दुसऱ्याच्या वशिल्याचा म्हणा.–चालूं दे तुमचे पोवाडे.–नाहीं तर असें करा, आई-साहेबांना हा पोवाडा म्हणून दाखवा.–त्यांच्या नानांची कर्तबगारी ऐकून त्यांना आनंद होईल.–या, माझ्या मागोमाग या.

[ जातो. ]

के०:—चला आतां एथून.—लवकर या माझ्या मागोमाग.——तुम्हांला चटदिशीं शनवार वाड्यांतून पळ काढला पाहिजे.—(मोठ्यानें) मूर्खांनों, भलत्या ठिकाणीं भलता पोवाडा म्हटलात,—महाराज फार रागावल्यासारखे दिसतात.—चला लवकर.

( जातात. )

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**—रस्ता.

[ गोंधळी व केशवशास्त्री प्रवेश करतात. )

के०:—गड्या, तूं तर आपली कामगिरी चांगली वजावलीस.—हें घे तुला बक्षीस. ( त्यांच्या हातांत सोन्याचें कडें घालतो ). बाजीरावसाहेबापाशीं गेलास, आणि सर्व त्यांना हकीगत सांगितलीस म्हणजे तेहीं तुला बक्षीस.—हीं आवडीनें दिलेलीं पत्रें घे.—सरकारच्या स्वाधीन नीट कर, आणि असें सांग, केशवशास्त्र्यानें बहुतेक काम केल्यासारखेंच आहे.—जा तूं आतां.

गों०:—येतों तर मी आतां, राम राम.

के०:—आणि हें पहा, पुण्यास तूं इतक्यांत परत येऊं नको.—महाराजांना माझी विनंति सांग, पत्राचें उत्तर दुसऱ्या कोणाबरोबर पाठविण्याची मर्जी व्हावी.

गों०:—एकदों बाईसाहेबांचें दर्शन घेऊन जाईन म्हणतों.—

के०:——आवडीकडे जाण्याची जरूरी नाहीं.—तूं आतां येथें एक क्षणही राहूं नको.—तिच्याच हातचीं सर्व पत्रें आहेत. पुन्हा भेटण्याचें कारण नाहीं.—बाजीरावसाहेबाकडचा एकदम मार्ग धर'—ये बरें, जपून जा. ( गोंधळी जातो ) आतां आमचा मंत्र पुरा सिद्ध झाला.—नानाच्या वाड्यावरून गाढवाचे नांगर फिरतात कीं शनवारवाडा ढांसळून पडतो, एवढेंच काय तें पहावयाचें उरलें आहे.—बाबासाहेबांच्या नांवचें म्हणून बनावट केलेल्या पत्रानें फार बहार केली !—आनंदीबाईनें मुद्दाम म्हणून नाना व गंगाबाई याजसंबंधानें पिकविलेल्या खोट्या कंड्या त्या बनावट पत्रामुळें ह्या कोंवळ्या माधवाच्या मनावर चांगल्या बिंबल्या !--तें पत्र मला अगोदर जगांतून नाहींसें करूं दे.—रामाच्या भात्यांत एक बाण असे, शत्रूवर तो सोडला म्हणजे शत्रूचा नाश करून तो बाण आपला भात्यांत परत ! तसें हें पत्र आपली कामगिरी बजावून पुन्हां आमच्या-पाशीं परत आलें आहे !—चला, पत्रराज नाहींसें व्हा.—दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस चुकून पडायला जगांत रहावयास नको. ( पत्र फाडून फेंकून देतो. ) मी साव नाहीं, असें जगांत आतां कोण म्हणणार ?

( जातो पडदा पडतो. )

# प्रवेश सहावा.

**स्थळ**—शनवारवाडा, चित्रांचा दिवाणखाना.

[ माधवराव प्रवेश करतो. ]

मा०:—लोक मला नानाच्या वशिल्याचा म्हणतात हं !—माझ्या बायकोचा आणि नानांचा चेहरा सारखा आहे;—मला हा कदाचित् खोटा भास होत नसेल कशावरून?—आजच हे चेहरे मला सारखे कां दिसूं लागले ?—सारखे तरी कसले ?—नाहीं, तसें नाहीं. बाबासाहेबांनीं ह्या गोष्टीचा आपल्या पत्रांत सर्व खुलासा केला आहे ?—ह्या बाबतींत संशयाला जागाच नाहीं. पण माझा आणि तिचा चेहरा सारखा असल्यासारखा दिसतो, असें केशवशास्त्र्यानें कां म्हणावें ? माझी जशी बायको नानांच्या वशिल्याची—तसा मी—तसा मी—नको पुढचे विचार नकोत.—तें कसेंही असलें तरी मी नानांच्या वशिल्याचा नाहीं असें सर्व जगाला कृतीनें दाखविणार.—नानांच्या वशिल्याचा !—सासूबाईच्या पंक्तीला माझ्या आईला लोक बसवितात काय ?—मी ही गोष्ट कधींही नाहीं कबूल करणार.—पण हा नीच पापी नाना काय करील आणि काय नाहीं ह्याचा नेम नाहीं !—ह्या दुष्ट नानाचा मला इतका तिटकारा आला आहे कीं, ह्याच्या पापी हातांनीं पूजिलेली प्रत्यक्ष देवाची मूर्तिही मला पापमय वाटते !—माझी आई खरोखर सती असो, सरदार लोक तिला पतिव्रता समजोत, ती नानांच्या विरुद्ध वागत नव्हती.—माझ्या सासूप्रमाणें तीही भ्रष्टच असली पाहिजे.—हा पापी शनवारवाडा सोडून—हें घाणेरडें पुणें शहर सोडून—मला लांब कोठें तरी गेलें पाहिजे.—ही पापी जागा जाळून राख-रांगोळी केली तर—छे—कोठून हा वाडा स्वच्छ व्हावयाला ?—जाळल्यावर

राहणारी ती राख, ते कोळसे, त्यांच्या काळ्याकुट्ट पापाचा तो अस्सल गाळ अजीबात नाहींसा कसा करतां येईल ?–गंगेसारख्या महानदींत ती राख टाकली, तर तो पवित्र ओघ पापमय होऊन जाईल, जमिनींत त्या राखेला गाडून टाकलें तर वसुंधरेच्या पोटांत असलेले सर्व हिरे काळे कुळकुळीत कोळसे बनतील, आकाशांत ती राख जर फुंकली तर तेजोमय सर्व तारे काळे ठिक्कर पडतील ! ( यशोदा तसबीर घेऊन येते. ) हें काय धाडस ! आईचे दिवाण नाना होते, एवढ्याचकरितां माझ्या आईला मी नरकांत फेंकून देण्यास तयार झालों असतां आणि नानांनीं स्पर्श केलेली चिंधी देखील मला खपत नसतांना नानाची तसबीर मजपुढें आणण्याला लाज नाहीं वाटत ?—( तसबीर घेऊन फेकून देतो ) प्रत्यक्ष हाडामांसाचा नाना जिवंत असतांना त्याच्या तसबीरीवर सूड उगवून कसा मी स्वस्थ बसूं ?–( पलंगावर मूर्च्छा येऊन पडतो )

य०:—अरे देवारे ! इकडे कशानें बाई घेरी आली ! ( माधवरावाचें मस्तक मांडीवर घेऊन ) महाराज सावध व्हावयाचें, आपली दासी यशोदा मी ?–डोळे उघडून तरी बघायचें होतें ?

[ वारा घालते. ]

मा०:—( उठून ) कोण माझी बायको यशोदा ? तूं माझी बायको–खास माझी बायको ?

य०:—महाराज, असें काय विचारावयाचें ? आपली गरीब दासी यशोदा नव्हे का मी ? ह्या येथें जरा बसावयाचें होतें, मी जरा मस्तक चेपतें, महाराजांना बरें वाटेल.—मीं आतां हात लावला किती तरी बाई तापलें आहे !

मा०:—तुझे मऊ हात लागण्याबरोबर तापलेलें माझें मस्तक शांत

होत असे—पण ते दिवस गेले.—माझ्या मस्तकांतील संतापाचा लोट इतका प्रचंड झाला आहे कीं, हिमालयावरील सर्व गार पदार्थ येथें रचले तरी हा ताप तिळभर कमी व्हावयाचा नाहीं.——माझ्या एकट्याच्या मस्तकावर युगानुयुग मेघराज जरी पाणी ओतत राहिला तरी ही आग काडीभरही विझणार नाहीं.

य०:——पण महाराज, प्रेम, निष्कपट प्रीति ह्यांना असाध्य——

मा०:——कसलें प्रेम आणि कसली प्रीति ! माझ्या हृदयांत जळत असलेला एखादा विचार तुला समजूं दे—छे, तुझ्या हातून कसें माझें शांतवन होणार ? ज्यास्ती मात्र भडका होतो आहे.


[ जाऊं लागतो. ]

य०:——महाराज, मजशीं आजपर्यंत असें कधींही बोलायाचें नाहीं,—मी नाहीं जाऊं द्यायची.—इथें बसायचें जरा.—हातापायांची आग होत असेल तर पाय चोळतें,—मला सर्व कांहीं सांगावयाचें होतें —बसायचें होतें.

[ माधवराव बसतो. ]

मा०:——काय सांगायाचें आहे तुला ?——मी जिवंत असून चांगला धट्टाकट्टा असून चितेवर ठेविल्यासारखें सर्व शरीर पेटलें आहे !——तुला सांगायचें म्हणजे संतापाच्या डोहांत बुडत असतांना तुझ्या गळ्याला मिठी मारून तुलाही बुडवायाचें !——नाहीं माझ्या हातून असें नाहीं होणार.

य०:——महाराज, आपण दुःखांत असल्यावर मला सुखांत राहून तरी काय करायाचें आहे ? आपण नुसतें सांगितल्याबरोबर आगीच्या मंडपांतून चालत जाण्यास मी तयार नाहीं का व्हावयाची ?—माझ्या मनाला, माझ्या देहाला कितीही कष्ट होवोत, ह्या पायांची सेवा करण्याचा



शनवार वाडा ( दिल्ली दरवाजा. )

प्रसंग मी केव्हांही वाया जाऊं द्यावयाची नाहीं.—ह्या पायांवांचून दुसरें दैवत मला नाहीं.

मा०:—( स्वगत ) असल्या ह्या प्रेमळ जीवाची व्यभिचारापासून उत्पत्ति !—नको त्या गोष्टीचा विचार नको. ( उघड ) तुला एक विचारावयाचें आहे. ( स्वगत ) काय हिच्याशीं बोलूं आतां ?—कसें-बसें एथून निसटून गेलें पाहिजे.

य०:—आज्ञा व्हावी, दासी सेवेला तत्पर आहे.

मा०:—मी आपलें सहज विचारतों, तुझ्या वाडवडिलांनीं लढाईंत तलवार कोठें गाजविली नाहीं, इहलोकचे कुबेर म्हणून तुझ्या वडिलांची श्रीमंतीबद्दलही ख्याति नाहीं.—पंतप्रधान पेशवे म्हणून म्हणतात तो मीच ना !—मग मला—खुद्द पेशव्याला—तुझ्यासारखी एका अप्रसिद्ध आणि गरीब कुळांतील मुलगी कां केली ?

य०:—महाराजांनीं माझी तसवीर कां पसंत केली, हें मला काय बाई ठाऊक ?

मा०:—नानांनीं मुद्दाम म्हणून तुझ्या तसबिरीची स्तुति काय म्हणून केली ?—लग्न होण्यापूर्वी नाना वारंवार तुमच्याकडे येत असत नव्हे ?

य०:—हें काय बाई विचारावयाचें ?—मला आठवण आहे तेव्हां-पासून नाना आमच्या घरीं येत.—शिवाय सासूबाई माझ्या आईला वहिणीप्रमाणें मानीत असत.

मा०:—जा तूं आतां,—आपल्या आईकडे जा.—माझ्यावर तुझें प्रेम असेल तर माझ्या नजरेस न पडशील तितकें बरें.

[ उठून जाऊं लागतो. ]

य०:—( माधवरावास धरून ) महाराज, आज मीं असा अपराध तरी कोणचा केला ? ह्या जिभेनें आपणाला न आवडणारा शब्द उच्चारला असेल तर तिला कापून टाकण्याची पाहिजे तर शिक्षा करा.—पण तुमच्या शिवाय मी राहूं तरी कशी ?

मा०:—मी दुर्भागी आहें. माझ्याबरोबर तूंही दुःखी होऊं नको.—जा, मला सोडून दे.—आपल्या आईकडे जा.—आणि पुन्हां माझ्या दृष्टीस पडूं नको. माझ्यासारखी तूं दुःखी व्हावेंस अशी माझी इच्छा नाहीं.

य०:—महाराज, आपल्याकरितां मी पाहिजे तितकें दुःख भोगीन.—माझी पाहिजे तर परीक्षा पहा.—आपली ती तलवार, तिनें पाहिजे तर माझी मान तोडण्याचा हुकूम करा; आपली आज्ञा म्हणून मोठ्या प्रेमानें मी होऊन धारेवर गळा ठेवीन.—आपल्या कंबरेला लटकणारी ती माझी सवत, तिनें मला मारूं नका, एवढेच काय ते काकुळतीचे शब्द बोलेन.

मा०:—माझ्या मनांत एकदां तुझ्याविषयीं अतिशय प्रेम होतें—पण—आतां कसचें तें प्रेम ! तुझ्या हाताचा हा स्पर्श म्हणजे हजारों विंचवांनीं एका ठिकाणीं नांगी मारल्यासारखा आहे ! माझ्या मनांतला एक विचार जर तुला समजला तर माझ्या हाताचा स्पर्श होतांच तुझ्याही अंगाला सर्पदंशासारख्या वेदना होतील.—चल हो दूर.—( सोडवून घेऊन. ) माझ्यावर जर तुझें प्रेम असेल तर मला एखाद्या रक्तपित्याप्रमाणें समजून मजपासून दूर पळून जा. [ जातो. ]

य०:—ह्या बोलण्याचा अर्थ तरी काय ? इतकें संतापण्यास कारण तरी काय झालें ?—आई जगदंबे, तिकडचें मन शांत कर; आणि त्यांचा राग कमी करून त्यांना सुखी करण्याचें ह्या गरीब अबलेला सामर्थ्य दे.

[ पडदा पडतो. ]

## अंक तिसरा समाप्त.

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**--नानांचा वाडा.

[ आईसाहेब, यशोदा, नाना व बजाबा बसले आहेत. ]

**ब०**:—उद्यां सीमोल्लंघनाला स्वारी निघण्याइतकी श्रीमंतांची तब्येत दुरुस्त झाली आहे, असें मला वाटतें.

**य०**:—स्वारी नाहीं निघाली तर नाहीं का चालायाचें ?—दसऱ्याचा दिवस खरा, पण मस्तकशूल पुन्हां चढला तर कसें ?—हा दसरा नाहीं तर पुढचा दसरा.—दसऱ्यांना काय ?—मी म्हणतें बाबासाहेब येऊन तिकडच्या मनाची पुरी खात्री होऊन पुन्हां पहिल्यासारखी प्रकृति झाल्यावर दसरा आणि दिवाळी साजरा करीत बसूं, तोंपर्यंत कांहीं नको.

**आ०**:—पर्वतीवर दीपोत्सवाकरितां स्वारी झाली पाहिजे, म्हणून मीं आग्रह केला, त्याचा हा असा भलताच परिणाम झाला.—आतां मीं कानाला खडा घातला आहे.—दसऱ्याची स्वारी निघालीच पाहिजे, असें मी कधीं म्हणायाची नाहीं.

**ब०**:—सरकार, राघोबादादाच्या पक्षास अनुकूल असलेल्या सरदारांनीं पुन्हां उचल करण्याचें मनांत आणलें असल्याविषयीं बातमी आली

असून, मुंबईच्या टोपीकरांनीं कांहीं खजिना बाजीरावाकडे पोंचता केला असल्याविषयीं मुंबईच्या आमच्या वकिलाकडून लिहून आलें आहे. तेव्हां अशा वेळीं, धड ह्याही पक्षाचे नव्हेत, आणि त्याही पक्षाचे नव्हेत, अशा लोकांचीं मनें डळमळतील असें कोणचेंही कृत्य पुण्यास होतां कामा नये.

ना०:—आईसाहेब, सरकार, दसऱ्याची स्वारी निघाली नाहीं तरीं चालेल असें मला कालपर्यंत वाटत होतें; पण बजाबांनीं आतां सांगितलेल्या गुप्त खटपटीची बातमी चांगली खुलासेवार जेव्हां समजली, तेव्हां सीमोल्लंघनाचा समारंभ झालाच पाहिजे, असें मीं ठरविलें.—मुंबईचे टोपीकर व आमच्याचपैकीं कांहीं सरदार यांना बाजीरावानें असें कळविलें आहे कीं श्रीमंतांना नानांनीं शनिवारवाड्यांत कैदेंत ठेवलें असून नारायणरावसाहेबांच्या वेळीं गारद्यांनीं केलें त्याप्रमाणें जर शनिवारवाडा थोडके लोकांनीं गर्दी करून अकस्मात् ताब्यांत घेतला तर नानांच्या छळांतून सुटण्याकरितां श्रीमंत आपखुषीनें बंडखोरांच्या ताब्यांत जातील; व श्रीमंत एकदां हातीं लागल्यावर पुढील कार्य सहज घडवून आणतां येईल.—बाजीच्या ह्या बोलण्यावर इंग्रजांचा विश्वास बसला असावा असें दिसतें; कारण तसें नसतें तर खजिना मुंबईहून रवाना झाला नसता.

आ०:—श्रीमंतांच्या मनाची स्थिति आज तशी नाहीं, असें कोण म्हणेल ?—बजाबा, तो पोवाडा मीं ऐकिला, त्या वेळीं शत्रूंचा डावपेंच एकदम माझ्या ध्यानांत आला नाहीं, व ही गोष्ट चुकून झाली असें केशवशास्त्र्यानें दिलेलें आश्वासन मला खरेंही वाटलें. पण अलीकडे अलीकडे श्रीमंतांच्या तोंडून जे उद्गार निघाले, आणि बजाबा, तिकडच्या पत्राबद्दल तुम्हीं जे शब्द काल श्रीमंतांच्या तोंडचे ऐकिलेत,—

य०:—पण बाबांचें पत्र तिकडे आलें तरी केव्हां आणि कोणाचे मार्फत ?

ब०:—पत्र कोणीं आणलें व श्रीमंतांना कसें पोंचलें हें कांहींच समजत नाहीं.—एखादे वेळेला बोलण्याचा झटका आला म्हणजे आज कित्येक दिवस आईसाहेब व नाना ह्यांच्यासंबंधानें श्रीमंत भलतेंसलतें बोलत असतात, हें सरकारनीं ऐकलेंच आहे. श्रीमंतांच्या मनाचा हा भलता ग्रह नाहींसा करण्याची खटपट मी रोज करीतच असतों. त्या खटपटीमुळें म्हणा अगर दुसऱ्या कोणच्याही कारणामुळें म्हणा, काल अशाच एका झटक्याच्या वेळीं स्वतःशीं पुटपुटत असतां ' केशवशास्त्र्यांनीं दिलेल्या पत्रांत बाबासाहेब जर स्वतः हे शब्द लिहितात तर हा खोटा आरोप आहे असें तुम्ही कसें म्हणतां, ' असा श्रीमंतांनीं मला प्रश्न विचारिला. नंतर मीं पत्राविषयीं श्रीमंतांना पुष्कळ विनंति केली पण दुसऱ्या विषयाकडेच श्रीमंतांची लहर लागल्यामुळें कांहींच उपयोग झाला नाहीं.—तें पत्र खोटें असलें पाहिजे, कोणीं तरी दुष्मानानें बनावट केलें असलें पाहिजे, अशी मीं निरनिराळ्या रीतीनें श्रीमंतांची समजूत घालण्यचा प्रयत्न केला, पण श्रीमंत पत्रासंबंधानें हूं का चूं पुन्हा बोलले नाहींत. आज सकाळीं मात्र श्रीमंत नेहमींपेक्षां जरा कमी रागावल्यासारखे दिसले, म्हणून म्हणतों उदईक सीमोल्लंघनाकरितां स्वारी निघण्यास हरकत नाहीं.

ना०:—बजाबांनीं काल ही हकीकत जेव्हां मला सांगितली, त्या वेळींच मीं आईसाहेबांना व सरकारला विनंति केली कीं ह्या कामीं केशवशास्त्र्याचें कांहीं तरी कपट असलें पाहिजे.—आईसाहेब, सरकार, पेशव्यांच्या कुळांतल्या सर्व स्त्रिया मला मातोश्रीप्रमाणें आहेत, ह्याबद्दल बाबासाहेबांना कधींही संशय येणार नाहीं, हें मी खात्रीनें सांगतों.

बाबासाहेबांचा व माझा फार दिवसांचा स्नेह असून आम्ही एकमेकांचे स्वभाव पुरे ओळखतों.—बाबासाहेब रागीट व तापट असले तरी थोर मनाचे आहेत. बाजीरावाशिवाय जवळचे नातेवाईक श्रीमंतांना कोणी नाहीं हें जरी खरें असलें, बाजीरावाला जवळ ठेऊन खूप राखून गृह-कलह मिटविण्यांत अधिक पुण्य आहे असें जरी त्यांना वाटत असलें, तरी नारायणरावसाहेबांच्या खुनामुळें संतत झालेल्या बारभाईच्या कारस्थानास यशस्वी करण्याकरितां ज्यानें रात्रंदिवस खस्त खाल्ली, राघोबाच्या मूर्खपणा-मुळें हजारों जवानांचें रक्त रणांगणावर पाण्याप्रमाणें ज्याला ओतावें लागलें, त्या नानाला बाजीराव नकोसा वाटत असला तर तो श्रीमंतांच्या हिता-करितांच नकोसा वाटत असला पाहिजे, हें शांत विचारांतीं बाबासाहेबांना समजल्याशिवाय राहणार नाहीं.—आईसाहेब, माझी खात्री आहे कीं येथील सविस्तर हकीकतीसंबंधानें मीं व सरकारांनीं लिहिलेलीं पत्रें बाबा-साहेबांनीं वाचलीं म्हणजे, त्यांच्या तापटपणाच्या स्वभावाचा फायदा घेऊन, व बाजीरावामुळें श्रीमंतांचें नुकसान झाल्याशिवाय राहणार नाहीं असें पक्कें वाटत होतें म्हणून आईसाहेब येथें एकट्याच राहिल्या. ह्या गोष्टीवर व्यूह रचून, कपटी सर्पांनीं श्रीमंतांच्या कानाचा कसा चावा घेतला हें त्यांच्या तावडतोब लक्षांत येईल, व मीं पत्रीं विनंति केल्याप्रमाणें श्रीमंतांच्या नांवाचें पत्र जासुदाबरोबर ते उलट पाठवतील व आपणही लगेच निघून येतील.—आईसाहेब, सरकार, आपणास माहीतच आहे कीं आपणां सर्वांच्या सल्ल्याप्रमाणें मी बरेच दिवसांत श्रीमंतांच्या नजरेस पडलों नाहीं.—बजावा म्हणतात त्याप्रमाणें श्रीमंतांचा राग किंचित् जरी कमी झाला असला तरी सीमोल्लंघनाचा समारंभ उरकून घेण्यास हरकत नाहीं. तसें केल्यानें श्रीमंतांच्या कैदेसंबंधानें व तब्येतीसंबंधानें बाजीरावाच्या पक्षाकडून ज्या बातम्या मुद्दाम पसरविण्यांत आल्या आहेत त्यांना आयतें

परस्पर उत्तर दिल्यासारिखें होईल, व शमीपूजनाचे वेळीं नवीन कोणच्या कामाचा श्रीमंतांनीं दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रारंभ करावयाचा आहे त्याविषयीं मी श्रीमंतांना विनंति करून राजकाजाकडे श्रीमंतांचें मन ओढून घेईन.

य०:—बाबा केव्हां येऊन पोंचतील ?

ना०:—जासूद रवाना झाले असून तीन चार दिवसांत त्यांचें पत्र येईल व लगेच तेही येऊन पोंचतील, सरकार.

य०:—असें आहे तर सीमोल्लंघनाचा समारंभ साजरा करून घ्यावा.

आ०:—माझ्या मनांत येतें तिकडचें येणें होई तों वाट न पाहतां केशवशास्त्र्याला एकदम कैद करून तुरुंगांत ठेवावें हें चांगलें.

ना०:—दोन दिवस वाट पाहिल्यानें अधिक फायदा होणार आहे. त्याच्या नायकिणीच्या घरावर गुप्त पहारा ठेऊन नवा मनुष्य कोण येतो कोण जातो ह्यावर नजर ठेवण्यास मीं कोतवालास सांगितलें आहे. तो नाहींसा झालेला गोंधळी उद्यांच्या समारंभांत कोठें तरी सांपडला पाहिजे, अशी माझी समजूत आहे.

य०:—संशय आहे असें केशवशास्त्र्याला दोन तीन दिवस समजूंच न देणें हें चांगलें. बाबा आल्यावर हा सूर्य हा जयद्रथ असें करून त्या मेल्याला शिक्षा केली तर तिकडच्या मनावर ह्या गोष्टीचा अधिक चांगला परिणाम होईल.

ना०:—सीमोल्लंघनाचा उद्याचा दिवस नीट पार पडला, व तीन चार दिवसांत बाबासाहेब येऊन पोंचून श्रीमंतांच्या डोक्यांत भ्रमणारें वेड नाहींसें झालें म्हणजे पुन्हा आपण जिंकली असें म्हणण्यास हरकत नाहीं. [ पडदा ]

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—रस्ता.

[ कोतवाल व त्याचे दोन नोकर येतात. ]

**नो०:**—( दोघे मिळून ) राम राम कोतवालसाहेब.

**को०:**—कायरे गुलामांनो, कालपासून कोठें होतां ?–काल रात्रींही तोंड दाखविलें नाहींत, आज सकाळींही दृष्टीस पडलां नाहीं, आणि आतां दसऱ्याचा छबिना इतक्यांत निघेल तेव्हां मजपुढें येऊन उभे राहता काय ?

**प०:**—काल रात्रीं आणि आज सकाळीं सगळ्या गोंधळ्यांच्या घरीं मी गोंधळ घातला; पण त्या गोंधळ्याचा कोठेंच पत्ता नाहीं.

**को०:**—आणि तूंरे, तूं कोठें झोंप काढीत होतास.

**दु०:**—झोंप कोठली सरकार, डोळ्यांत तेल घालून, त्या आवडीच्या घरावर नजर ठेऊन रात्र सगळी रस्त्यांत उभ्यानें काढली.–कोण गाढव, कुत्रें, चिटपाखरूं देखील तिच्या घरांत गेलें नाहीं आलें नाहीं. तो बेटावरचा कारकून गोमाजीपंत तेवढाच काय तो पट्टी खाऊन लगेच बाहेर पडला.

**को०:**—तो केव्हां केव्हां जात येत असतो. आणखी कोण नाहीं आलें-गेलें ?

**दुसरा०:**—कोण नाहीं.

**को०:**—बरें तर, तूं असें कर, आतां शहरांतून छबिना चालला म्हणजे कोठें तुला तो गोंधळी दृष्टीस पडतो का तें पहा, आणि शमी-

पूजनाचे वेळीं मला वर्दी दे.–तूं असें कर, ते आवडीचे नोकर बाहेर पडले म्हणजे त्यांच्या पाठोपाठ असत जा आणि मग छबिना संपल्यावर ते कोणाला भेटतात, कोणाशीं बोलतात, ह्यांची मला वर्दी दे.–जा तुम्ही आपल्या कामाला.

**नो०:**—( दोघे मिळून ) राम राम.

[ जातात. ]

**को०:**—तो गोंधळी पाताळांत गेला असला तरी तेथून त्याला शोधून आणला पाहिजे, नाहींतर नाना मला खाऊं का गिळूं करून सोडतील. [ गोमाजीपंत येतो. ] हा बरा भेटला. ह्याला एकदां चांचपटून पाहिलें पाहिजे.

**गो०:**—( स्वगत ) ह्या छबिन्यांत केशवशास्त्र्याची कोठून गांठ पडणार ?–तो बड्या मंडळींत असणार, आणि मला कोण विचारतो आहे ह्या समारंभांत !–पुणें शहरांत ह्या गोम्याला कोणींच विचारूं नये हं ! एक दिवस असाही येईल, कीं थोर थोर म्हणविणाऱ्या सरदारानांही माझ्याच पायां पडावें लागेल.–आज मला फडांत कारकुनीही करूं देत नाहींत.–बेटावर मॅलेटला हिकडची तिकडची बातमी सांगून त्याच्या टोपीला आतां जरा प्रसन्न करून घेतलें आहे, त्यामुळें दोन पैसे मिळून गांवांतले भटभिक्षुक जरा मानूं लागले आहेत, पण अजून ह्या केशव-शास्त्र्याइतकीही मला योग्यता आली नाहीं.–( उघड ) अरे, हे आमच्या शहरचे कोतवाल !–राम राम, कोतवालसाहेब.

**को०:**—अरे तूं त्या आवडीनायकिणीच्या माडीवर नेहमीं जातोसना ?

**गो०:**—मी कशाला कोतवालसाहेब, मी कशाला कोतवालसाहेब,–मी गरीब कारकून,–असल्या फंदाला मी कोठून पैसे आणूं ?

को०:—काल रात्रीं गेला नव्हतास ?

गो०:—ह्ये ! ह्ये ! ह्ये ! एकदां चुकून, एकदां चुकून,—आपला हुकूम असला तर पुन्हा नाहीं जाणार, पुन्हा कधीं नाहीं जाणार.

को०:—आणखी दहा माड्या चढलास म्हणून माझें काय जातें ?—पण उद्यां चावडीवर ये, आणि तेथली सगळी हकीकत मला सांग.

गो०:—बेटावरची नेहमीं सांगतोंच, उद्यां पाहिजे तर आवडीच्या माडीवरची सांगेन.

को०:—बरें उद्यां न चुकतां कोतवालचावडींत हजर रहा.—अरे ! छबिना निघाला !—चला जाऊं या.—उद्यां ये हं.

[ पडदा. ]

गो०:—आतां ह्या उप्पर केशवशास्त्र्याचें दर्शन नको.—रस्त्यांत कोठें गांठ पडून त्याच्यापासून कांहीं लभ्यांश झाला तर पाहूं—पण त्या आवडीच्या माडीचा जिना चढणें नाहीं.

[ जातो. ]

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**—गारपीर.

[ शमीची पूजा झालेली आहे, लुटावयाचें सोनें मध्यें पडलेलें आहे,हत्तीवर अंबारींत सवाई माधवराव व मागें त्रजावा, खालीं नाना फडणवीस, रास्ते, जाधवराव, मेहेंदळे, इत्यादि सरदार, केशवशास्त्री, भालदार, चोपदार उभे आहेत. ]

**ना०:**—शमीची पूजा आटोपली ना ?

**जा०:**—शास्त्रीबोवा, जरा घाई करा.

**रा०:**—ह्या गारपीरावर श्रीमंतांची स्वारी किती वेळ ताटकळत उभी रहावयाची ?

**मे०:**—पूजा संपली, सोनें लुटलें कीं स्वारी परतण्यास हरकत नाहीं.

**के०:**—जगदंबा श्रीदुर्गादेवी व सर्व ग्रामदेवता ह्यांच्या प्रसादानें श्रीमंतांच्या तब्येतीस आराम पडून आजच्या सीमोल्लंघनाच्या प्रसंगीं सरकारस्वारीस येतां आलें, हीं सर्व देवतांची आम्हां आश्रितांवर मोठी कृपाच समजायाची.—पूजाविधि सर्व आटोपला आहे, शमीदेवता प्रसन्न झाल्यासारखी दिसत आहे, व आतां फडणविसांचा हुकूम झाला म्हणजे सोनें लुटायाचें एवढेंच काम बाकी आहे.

**जा०:**—आजच्या दसऱ्याच्या मुहूर्तावर सुरू करावयाच्या पुढील कामांत सर्व वेदमूर्तींचा व दुर्गादेवीचा श्रीमंतांना आशीर्वाद पाहिजे.—

बजावा, सरकारास आतां जरा अधिक बरें वाटत असल्यास खालीं स्वारी होईल तर—

ब०:—त्याची कांहीं जरूरी नाहीं.—मस्तकशूल अजून त्रास देतो आहेसें दिसतें.—खालीं उतरण्याचा त्रास—

के०:—कांहीं जरूरी नाहीं.—आम्हां वेदमूर्तींच्या चारही वेदांचे कोटीन्कोटी आशीर्वाद श्रीमंतांच्या पदरांत आहेतच, व सरकारच्या पुण्य-प्रतापानें पूजाविधिही उत्तम प्रकारें झाला आहे.—ह्या नवरात्राच्या उत्साहानें संतुष्ट झालेली दुर्गादेवी श्रीमंतांच्या शत्रूची दाणादाण करील, ह्यांत तिळमात्र संशय नाहीं.

मा०:—माझा शत्रु माझ्या डोळ्यांपुढें उभा आहे—

[ बजावा दावतो. ]

ना०:—सरदारहो, श्रीमंतांच्या शत्रूंचें निर्मूलन करण्याचा मुहूर्त करण्याकरितां आज दसऱ्याचें सीमोल्लंघन आपण केलें आहे.—गेल्या सालीं आजच्या मुहूर्तानें तुम्हीं म्यानांतून बाहेर काढलेल्या तरवारींना खर्ड्यांच्या रणांगणावर दुर्गामातेनें यश दिलें व त्या जयाच्या उत्सहानें पुढील महत्कार्यास आज तुम्ही प्रारंभ करीत आहां.—समरांगणदेवता महाराष्ट्रास सांप्रत प्रसन्न आहेत, व हा आमचा भगवा झेंडा, हे आमचे जरीपटके, व गारपिरावर दिलेल्या ह्या आमच्या ढाली, काय हुकूम फर्मावीत आहेत, तें पहा.—वायुरूपानें पृथ्वीतलावर संचार करणारी रुद्र-देवता सर्व ढालींचा कल उत्तर दिशेकडे दाखवीत आहे !— खर्ड्यांच्या मैदानावर विजयश्रीनें नाचलेला हा भगवा झेंडा, तुमच्या हातांतील भाला उत्तरेस फेंका, दिल्लीच्या रोखानें गिलच्यांवर तलवार धरून पुढें सरसावा,

असें तुम्हांस प्रोत्साहन देत आहे !—सरकार, पानिपतच्या लढाईच्यापूर्वी महाराष्ट्राचा दरारा सर्व राष्ट्रांना कसा होता, हें मीं पाहिलें आहे. नानासाहेबांच्या वेळीं महाराष्ट्राच्या साम्राज्याची जी भरभराट होती ती भरभराट पानिपतच्या अपयशास न जुमानतां सरकारनें आज पुन्हां आपल्या मर्दुमकीनें मिळविली आहे.—सर्व सरदारांची एकी करून, रजपुतांचीं मनें आपल्याकडे आकर्षण करून दिल्लीस मराठ्यांच्या साम्राज्याचें तक्त स्थापण्याचा हुकूम सरकार आम्हां आश्रितांस करूं देत म्हणजे थोडक्याच वर्षांत मोंगलांच्या अकबर बादशहाप्रमाणें छत्रपतींचे सुभे म्हणून राजपुताना काबूल कंदाहार येथेंच केवळ नव्हे तर इस्तंबूल किल्ल्यावरही राज्य करण्यास सरकार पाठवतील.—सरदार हो, सांप्रत महाराष्ट्रास अनुकूल दिवस असून अपयशाची भीति बाळगावयास नको. महाराष्ट्राच्या साम्राज्यावर पानिपतच्या लढाईनें पहिला दुर्दैवाचा घाला पडला. ह्या घाल्याला न जुमानतां रावसाहेबांनीं दिल्लीस आमचें वर्चस्व पुन्हां स्थापित केलें. माझ्या किंबहुना सर्व महाराष्ट्राच्या गुरुस्थानीं असलेल्या त्या प्रतापशाली व मुत्सद्दी श्रीमंतांच्या अकालीं मृत्यूनें आमच्या साम्राज्यावर दुसरें भयंकर संकट ओढवलें; व नंतर लवकरच नारायणरावसाहेबांचा खून करणाऱ्या घरभेदी राघोबाच्या फितुरीमुळें महाराष्ट्रास दुर्दैवाची तिसरी ठेंच लागली ! दुर्दैवाच्या ह्या तीनही फेऱ्यांतून बचावून नानासाहेबांच्या वेळेप्रमाणें सरकारचें साम्राज्य पुन्हां तेजस्वी झालें आहे.—सरदार हो, दुर्दैवाशीं तीन वेळां टक्कर देऊन आम्हीं दुर्दैवाला पुरून उरलों आहों; आतां आमचा जय खात्रीनें होणार.—इजा—बिजा—तिजा—होऊन गेलेली असून आतां चवथ्यांदा—

मा०:—मी सूड उगविणार.—माझा खंजीर शत्रूच्या पोटांत खुपसून पापाचीं आंतडीं चव्हाट्यावर आणल्याशिवाय मी रहाणार नाहीं. ( अंबा-

रींतून उडी टाकावयास पाहतो. बजाबा खंजीर काढून घेऊन माधवरावास धरून ठेवतो.—हां—हां अशी गडबड होते. )

रा०:—हें काय सरकार ? भलत्या वेळीं भलतेंच !

जा०:—सरकारची प्रकृति फारच बिघडल्यासारखी दिसते !

मे०:—गारपीरावर भुताटकी फार आहे. कोणीं दुष्टानें चेटूक केलेलें दिसतें !

के०:—इडापिडा टळो व श्रीमंतांना लवकर आराम वाटो !

जा०:—सरकारस्वारी वाड्याकडे लवकर फिरली पाहिजे.—सीमोल्लंघनाचा समारंभ आटोपलाच आहे.—बजाबा, हत्ती वाड्याकडे फिरवा.

ना०:—रास्ते, मेहेंदळे, तुम्ही सरकारस्वारीबरोबर असा.

के०:—भूत-पिशाचांना दूर पळविणाऱ्या रौद्र मंत्राचा पाठ ह्या शमी वृक्षाखालीं मी करीत बसतों.

ना०:—सर्व मंडळीसह छत्रिना शहराकडे जाऊं दे. ( नाना व जाधवराव शिवाय सर्व जातात. )

ना०:—जाधवराव, माझें मन अगदीं उदास झालें आहे व सर्व विश्व कोसळून अंगावर पडतें आहेसें मला वाटतें !

जा०:—कांहीं काळानें हळू हळू श्रीमंतांची बुद्धि बदलेल; आपण उगीच काळजी करण्याचें कारण नाहीं.—नाना, तुम्हीच जर असे उदास झाला तर आम्हीं सर्वांनीं काय करावें ?

ना०:—पानिपतच्या लढाईनंतर पळत सुटलेल्या आमच्या सैन्यास

गांटून हजारों लोकांची अहंमदशाहानें कत्तल केलेली मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिली आहे. पण त्या वेळींही आतांच्यासारखें माझ्या मनाला विपरीत वाटलें नव्हतें.

जा०:—आतांच्या वेळांत इतकें भिण्यासारखें काय आहे ? ही वेळ दोन दिवसांनीं आपोआप बदलून जाईल. [ कोतवाल येतो. ]

ना०:—काय बातमी आहे ?

को०:—आजच्या समारंभांत तो गोंधळी कोठेंही दृष्टीस पडला नाहीं.—सर्व शहरभर मीं बारकाईनें तपास केला आहे, व तो पुण्यांत खात्रीनें नाहीं असें मला वाटतें.

ना०:—तुम्ही केशवशास्त्र्यावर बारीक नजर ठेवा. त्यांची व गोंधळ्याची कोठें तरी गांठ पडलीच पाहिजे.

को०:—आज्ञा सरकार. [ जातो. ]

जा०:—कोण गोंधळी ?

ना०:—बाजीरावाचा हेर आम्हां सर्वांना फसवून श्रीमंतांना भेटला. —पोवाडे म्हणणारे कांहीं लोक श्रीमंतांची करमणूक करण्याकरितां केशवशास्त्र्यानें वाड्यांत नेले होते; त्यांत हा हेर होता.—आईसाहेब न कळत पोवाडे ऐकत होत्या— [ मेहेंदळे येतो. ]

मे०:—स्वारी बरीच पुढें गेली. आपण बरोबर असल्याशिवाय सर्व गोष्टी नीट व्हावयाच्या नाहींत. तेव्हां रास्त्यांनीं आपणास विनंति करण्याकरितां मला पाठविलें.

ना०:—चला जाधवराव, वाटेनें तुम्हांला आईसाहेबांनीं सांगितलेली सर्व हकीकत सांगतों. [ जातात. ]

## प्रवेश चवथा.

**स्थळ**—गारपीराचा रस्ता.

[ केशवशास्त्री येतो. ]

के०:—मंत्र तर उत्तम लागू पडला आणि आज माझ्या डोळ्यांचेंही पारणें फिटलें !—आतां पुण्यास राहून आपणाला काय करावयाचें ?—मीं आपल्याकडून गवताच्या गंजीवर विस्तव ठेवला आहे, आतां वारा कसा सुटावयाचा, ज्वाळा कशा भडकावयाच्या, हें परमेश्वरा, तुझें काम आहे.—कोणच्याही देवाला केलेला नमस्कार जसा अखेरीस 'केशवं प्रति गच्छति' तसें आतां नाना कांहींही करोत,—आईसाहेब कसाही बंदोबस्त ठेवोत—माधवराव चाहील तें वरळोत—सर्व ह्या केशवशास्त्र्याच्या पथ्यावरच पडणार !—कंपनीच्या गुमास्त्याकडचें जवाहीर हातीं पडलें कीं येथून पोबारा आम्हीं केलाच.—आणि ह्या कपटनाटकाचा शेवट होऊन बाजीरावसाहेब पेशवे झाल्याशिवाय पुण्यास कांहीं तोंड दाखवावयाचें नाहीं.

[ सदोबा, दगड्या, सोनें घेऊन प्रवेश करितात. ]

स०:—सोनें, घ्या शास्त्रीबोवा, सोनें !

द०:—स्वान, शास्त्र, पाया पडतुया !

के०:—वा ! वा ! खूप भाराभर सोनें आणलें ? आज काय अगदीं लूट केली !—हें घ्या तुम्हांला अगदीं बावनकशी !—सदोबा, ह्या तुम्हांला पुतळ्या घ्या, आवडीला दिल्यात म्हणजे आज तुमच्यावर खूप होईल !

स०:—आज पुतळ्यांनीं मढवून टाकतों तिला ! रागावली तरी सोनें, हसली तरी सोनें, फुगली तरी सोनें !

द०:—ह्यो भारा पाहुनश्यानी खूस होयाला बया गाय म्हैस कवा झाल्याती धनीसाब ?—हें स्वान लई लुसलुशीत नरम रेशमवाणी, पिवळबी हाय.—धनीसाब, सोन्या म्हसोबाची अक्शी शपथ खाऊन म्हणतुया, ह्यो दगड्या मनुख्य कशापाई झालाया, इथल्लच्या इथल्ल वंडराच ढोर झाला तरीबी स्वोन्याहून पिवळ अक्शी.—संमदा भारा म्यां एकल्यानच खावा नव का ? शास्त्रर बामणाच स्वोन पाहूनश्यानी मुक्सांत लई लाळ येती है धनीसाब !

स०:—हा दगड्या शुद्ध जनावर आहे.— मी मनुष्य आहें कीं नाहीं शास्त्रीबोवा ! [ वैदु प्रवेश करतो. ]

वै०:—वाईला ओखद—गरमीला ओखद—नळाला ओखद—बहिऱ्या कानावर—आंधळ्या डोळ्यावर—वाहत्या नाकावर—पडत्या दांतावर—ढेर पोटावर—तुटक्या हातावर—मोडक्या पायावर—ओखद.—नाकातोंडाचा, डोळ्याकानाचा, हातापायाचा वैद—

स०:—ए वैदू इदर आव, इदर आव.

द०:—धनीसाब आज लई जोरांत आल्याती अक्शी.

स०:—अरे वैदू, असें पहा, एखाद्याची बायको—माझी नव्हे—जर त्याला टाकून गेली तर कांहीं ओखद आहे ?

द०:—मनुख्याला ढोर करायच ओखद हाय,—समदीं माणसं ढोर झाल्यावर ह्यो भारा रंवथ करायला लई ग्वाड.

वै०:—गांजाचें, भांगेचें, चरसाचें, अफूचें, दारूचें, ओखद—मनुख्यावर ओखद—ढोराच ओखद.—नाकातोंडचा—डोळ्याकानाचा—हातापायाचा—वैद.

के०:—सदोबा, ह्या वैदूला घरीं बरोबर घेऊन जा.—हा फार हुषार दिसतो.—ए वैदू, जा तूं त्यांच्या बरोबर, मला तुझ्यां जवळचीं बरींच औषधें घ्यावयाचीं आहेत.

( स० द० व वै० जातात. )

के०:—ह्या बेरड गोंधळ्यानें वैदूचें सोंग तर चांगलें आणलें आहे!—पण ह्या गद्धयाला पुण्यास पुन्हां येऊं नको म्हणून ताकीद दिली असतांना परत कां आला ?—बाजीराव अल्लड उल्लू आहे, कांहीं तरी भलतेंच करून ठेवलें असेल !—आईसाहेब ह्या गोंधळ्याची फार चौकशी करीत होत्या.—त्यांनीं त्याचा पोवाडा ऐकला कीं काय न कळे !—थापाथापीनें त्यांचा संशय तर दूर केलाच, पण हा गाढव पुन्हां कशाला परत आला !—विश्वांतली सर्व घडामोड करून ब्रह्म जसें अलिप्त तसें आपण तर ह्या नाटकांत नामानिराळे आहोंच, पण पाताळयंत्री नान्याची जरा भीति वाटते. [ गोम्या येतो. ]

के०:—नमस्कार सरदारसाहेब—सोनें घ्या.—नमस्कार.

गो०:—सोनें घ्या, नमस्कार.

के०:—बरेच दिवसांत दर्शन, नाहीं. हालहवाल काय आहे ?—तुमचा टोपडा म्हणतो तरी काय ?

गो०:—आतां बरी गांठ पडली.—मी मुद्दाम तुमच्या दर्शनालाच येणार होतों.

के०:—असें, कांहीं चांगली बातमी आहे तर मग ?

गो०:—मी तुमचा निरोप— ( चोहोंकडे पाहतो. )

के०:—ऐकण्याइतकें जवळ कोण नाहीं.—खुशाल बोला.

गो०:—निरोप अगदीं हडसून खडसून कळविला.–कामही झालें.–सर्व खजिना दोन दिवसापूर्वीच बाजीरावसाहेबांकडे परस्पर पाठविण्यांत आला आहे !

के०:—फार चांगलें झालें !

गो०:—चांगलें तर खरें, पण—

के०:—कां, पण कां ?

गो०:—माझ्या हातून तुमच्या पदरांत जवाहीर पडलें असतें तर दोन चार हिरे ह्या बोटांना चिकटले असते,–हो काय नेम–एखादें कडें ह्या मनगटांत अडकून रुतून बसलें असतें !

के०:—सरदारसाहेब, त्यांची नको काळजी करावयाला.–मी आहेंना?

गो०:—म्हणून म्हटलें गरीबाची आठवण असली पाहिजे.–मॅलेटला असा खडसून बोललों कीं ज्याचें नांव तें !–एक दोन दिवसांनीं गांठ घ्यायाला येईन म्हणतों.–आज दसरा होता खरोखरीचें सोनें मिळालें असतें तर मुहूर्त आजचा बरा—

के०:—आज नाहीं, दोन तीन दिवसांनीं या.–खूष करीन.–नमस्कार.–पुन्हां एकवार हें आजचें सोनें.–नमस्कार.

[ गोम्या जातो. ]

के०:—हा गोंधळी असा परत कां आला, आतां उलगडा झाला.–माशानें गिळलेलें माणीक तर बाहेर पडलें, पण तें जवाहीर बाज्याकडे परस्पर गेलें हें कांहीं चांगलें झालें नाहीं.–तें आचरट कारटें पाहिजे तसें उधळून टाकील !–आतां एकदां दरबारांत जावें, माधवाचे शेवटचे बोल ऐकावेत,–आणि मग रात्रीच्या रात्रीं एथचा गाशा गुंडाळावयाचा.

[ जातो ].

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**—शनिवार वाड्याचा दिल्ली दरवाजा.

[ आईसाहेब, यशोदा, केशवशास्त्री, दास, दासी वगैरे. ]

**आ०:**—आजचा सणाचा दिवस आणि येथें सर्व वाडा शून्य व उदासीन झाला आहे !

**य०:**—दरबारच्या वेचक लोकांशिवाय इतरांना वाड्याकडे फिरकूंही न देण्याचा नानांनीं हुकूम केला !—गारपीरावर तिकडची प्रकृति फारच बिघडली कीं काय शास्त्रीबोवा ?

**के०:**—गारपीर म्हणजे भूतपिशाच्चयांची जागा !—श्रीमंतांच्या अंगांत कायसेंसेंच वारें भरल्यासारखें होऊन खंजीर उपसून सरकार नानांच्या अंगावर चालून गेले !—वजाबानें चलाखी केली म्हणून बरें झालें !—आतां ओंवाळून दृष्ट काढली म्हणजे श्रीमंतांना बरें वाटेल.

**य०:**—स्वारी कोठपर्यंत आली आहे ?

**के०:**—नानांच्या वाड्यापर्यंत स्वारी आली, आणि मी असा गणेश दरवाज्यांतून आंतून पुढें आलों.—ही अंबारी दिसूं लागली पहा !

**य०:**—जोगेश्वरी जगदंबे, स्वारीच्या मनाला स्वस्थता येऊं दे. ह्या-सारखीच दुसरी सोन्याची अंबारी घालून सोन्याच्या झुलीचा हत्ती तुला अर्पण करीन.

**आ०:**—ज्या मेल्यांनीं श्रीमंतांच्या मनांत भलतेंसलतें भरवून दिलें त्यांचें निसंतान परमेश्वर करो.

के०:—चेटूक करणारे मांत्रिक पुण्यांत फार आहेत.–त्यांचें चेटूक त्यांच्यावरच उलटविलें पाहिजे.

आ०:—त्या गोंधळ्याचा पत्ता लावलात का ?

के०:—माझ्या डोळ्यांत त्या गोंधळ्यानें काय धूळ टाकिली !–प्रथम मला मोठा साव वाटला ! दिवऱ्या बाज्याच्या पक्षाचा असेलसें वाटलें देखील नाहीं !–पण जेव्हां त्याचा पत्ता लागेना तेव्हां मात्र खात्री झाली.–माझ्यापाशीं देखील तो खोटें बोलला हं !–देवा, राजकारस्थानाच्या गुंतागुंतींत मला केव्हांही गोवूं नकोस; नाहीं तर पदोपदीं खोटें बोलण्याचा प्रसंग येऊन सर्व जपजापावर पाणी पडावयाचें !

य०:—ही हत्तीवरून स्वारी उतरली ! कशी कावरीबावरी मुद्रा दिसते आहे !–जगदंबे, काय ही अवस्था केलीस ! ( माधवराव, बजाबा, रास्ते, मेहेंदळे, जाधवराव, भालदार, चोपदार, वगैरे येतात. )

ब०:—सरकारचे हातांत ही तलवार–ही कट्यार–मी देईन, पण हिचा उपयोग सरकारच्या पदरच्या नोकरांवर करावयाचा नसून इरणीबुराणीसारख्या शत्रूंवर करावयाचा आहे.

मा०:—बाहेरच्या शत्रूंची कोण परवा करतो !–मला जेथें तेथें अडथळा !–नाहीं देत तो खंजीर, नाहीं ?–नाहीं ?–काय करूं ?–नुसत्या शापानें ठार करून टाकण्याची पूर्वीच्या तपस्व्यांची शक्ति मला पाहिजे होती, तुम्हां सर्वांवर शापांचा वर्षाव माझ्या जिभेनें एकसारखा केला असता.–इच्छेनें सर्व विश्व उत्पन्न करून इच्छेनें सर्व जगाचा पुन्हा संहार करण्याची परमेश्वरी शक्ति मला पाहिजे होती, एकदां ह्या बजाला मारून माझी तृप्ति झाली नसती, हजारों वेळां जिवंत केला असता आणि

प्रत्येक वेळेला निरनिराळ्या प्रकारानें हालहाल करून मारलें असतें !–बाहेर शत्रु आणि घरचे शत्रु–इराणी–दुराणी वजावा सर्व एकाच माळेचे मणि !–'पानिपत' 'पानिपत' म्हणून प्राण सोडणारे नानासाहेब–धारातिर्थी पडलेले विश्वासराव आणि भाऊसाहेब–पानिपतचा सूड उगवावयाला मिळाला नाहीं म्हणून इळहळत मेलेले काका–ते पहा–सगळे–ए वजरबट्ट –मला खंजीर देत नाहींस म्हणून तुझ्यावर कसे डोळे वटारत आहेत !

आ०:—महाराज, असें काय करावयाचें ?–मन जरा स्वस्थ करून आजचा हा दसऱ्याचा समारंभ—

मा०:—कोण बाई आपण ? कोणाच्या कोण ?–आपल्या व्यभिचारानें कोणच्या नवऱ्यास रात्रंदिवस तळमळत पाडलेत ?–कोणच्या घराण्यांत जन्मास येऊन आपल्या आईच्या व्यभिचाराचें प्रदर्शन केलेंत !--बोला बाई, बोला.


आ०:—परमेश्वरा, काय हा प्रसंग आणलास !

ब०:—महाराज, आतां वाड्यांत प्रवेश केला पाहिजे.

मा०:—सर्व स्त्रीजातीला कलंक लावणारी तुझी वर्तणूक असूं दे,–पाप आणि व्यभिचार ह्यांबद्दल तुझ्या नांवाचा उपयोग होण्याइतकें तुझें वर्तन भयंकर असूं दे,–ह्या नानाच्या वजरबट्टूच्या विषयवासनेला बळी पडून पेशव्यांच्या नांवाला काळिमा लावणारी होऊं नको.

रा०:—सरकार, वयनीसाहेब ओवाळणी घेऊन उभ्या आहेत,–आतां वाड्यांत प्रवेश नाहीं का करावयाचा ?

मे०:—ह्या आईसाहेब आहेत.–सरकारांनीं ओळखलें नाहीं वाटतें !–आईसाहेब—



**मा०—** ही निरांजनें म्हणजे तुम्ही काय समजतां. [ पृ० १०३

मा०:—आई आणि लेक, जेथें जावें हीं नांवें ऐकायला येतात.— आईशिवाय मनुष्यप्राणी उत्पन्न झाला असता तर किती तरी उत्तम झालें असतें !—माझी आई व्यभिचारी असेल, माझी सासू छिनाल असेल, म्हणून त्रास करीत बसण्याची पाळी पुरुषांवर आली नसती !— झाडालाच कां मनुष्य लागत नाहीं ?असें झालें असतें पण विश्वामित्राला अडथळा करून देवांनीं सगळी चूक केली !—विश्वामित्रा, तूं आपल्या सृष्टींत झाडांपासून पुरुषांबरोबर बायका उत्पन्न करणार होतास काय ?— मग आई व्यभिचारी नाहीं तर बायको व्यभिचारी असेल असें वाटून पुरुष दुःखीकष्टी होतील.—नुसते पुरुष उत्पन्न करणार असलास तरी ह्या बजाला तुझ्या सृष्टींत जन्मास घालूं नकोस.—एकटा तुझ्या सृष्टीची घाण करील !

मे०—:रा०:—( माधवरावास धरून )सरकार, आंत चलायाचें आतां— दरबारांत सर्व लोक वाट पहात असतील.—वयनीसाहेब, ओंवाळणी पुढें करायाची होती. ( यशोदा ओंवाळूं लागते, स्वतःस सोडवून घेऊन माधवराव मध्येंच तिचा हात धरतो. )

मा०:—हें काय आहे ?—हीं निराजनें म्हणजे तुम्ही काय समजतां ?— जगांतील सर्व स्वच्छ, शुभ्र, व पुण्यकारक पदार्थांचें सत्व काढून ह्या तेजस्वी ज्योती बनविल्या असतात ! वाईट, घाण, व पापमय पदार्थांपासून निर्माण झालेल्या स्त्रीजातीनें हीं यशाचीं चिन्हें हातांत धरणें म्हणजे निष्कलंक सत्याची व धर्माची थट्टा करण्यासारखें आहे.

[ निरांजनें जमीनीवर फेंकून देतो. ]

य०:—महाराज, हें काय !—गृहदेवता अशानें क्षुब्ध नाहीं का

व्हावयाच्या ?-परमेश्वरा, तूं आमच्यावर रागावूं नकोस.-मोठी शांत करीन.-दुसरीं निरांजनें आणाग चटदिशीं.

मा०:—तूं अशी रडतेस कां ?-तुला काय कमी आहे ?-पुरुषांना फसवून सर्व जगावर राज्य करण्याचा मक्ता परमेश्वरानें बायकांना दिला आहे—

रा०:—सरकार, आंत चलायाचें आतां.

[ माधवरावास धरून आंत नेतात. ]

## अंक चवथा समाप्त.



स०—रडायला मी काय भित्रा आहें ? [ पृ० १०५

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—रस्ता.

[ खंड्या, दगड्या, व सदोबा प्र. क. ]

स०:—ए खंड्या, ए दगड्या, रस्त्यांत असे रेंगाळत काय राहता ? —चला घरांत लवकर.—श्रीमंतांचा दरबार आतां संपला असेल आणि सर्व सरदारांचा मुजराही झाला असेल.

खं०:—मग, आमी कशापायीं घरांत घुसावं व्हय धनीसाब ?

द०:—कशापायीं ? ठाव नाहीं ? आतां धनीसाबाचा घरभार ह्राय ? आमासनी मंजुरा नको कराथाला ?

स०:—अरे, तसें नव्हे. आतां सलामीच्या तोफांची सरबत्ती होईल. ( पडद्यांत तोफांचे आवाज. ) चला घरांत लवकर—तोफा उडत असतांना रस्त्यांत उभें राहूं नये; मी कांहीं भित्रा नाहीं. ( पडद्यांत पुन्हा आवाज.) आवाज ऐकला कीं—माझी—छाती—ही—तोफेसारखी उडूं लागते.—चला घरांत.—गुडुप निजूं या.—खंड्या, तूं माझ्या एका कानांत बोटें घाल.—दगड्या, तूं एका कानांत बोटें घाल,—मग कांहीं ऐकायाला येणार नाहीं. वीरासारखे पुढें या.—भिऊं नका.—माझ्या दोन हातांनीं माझी छाती आवरत नाहीं.—तुम्ही ही दाबून धरा. ( कांपत उभा राहतो. )

द०:—तोफाचं आवाज कानांत घुसलं कीं धनीसाबांच्या अंगांत लढायचं वारंच शिरताय जणू !

खं०:—धनीसाब, घोंगडं पांघरायाला घ्याव नव्हं !–मर्दाचं वारं बाहर फुटूं देऊं नका अक्शी !–घालूं का घोंगड ?

स०:—लढाईचें वारें आलें आहे, लढाईचें !

खं०:—रडायच कांपर हाय धनीसाब रडायच कांपर !–दाबून धरा.–बाहेर उमटल मग नव्ह बगा.–डोळ मिटा, धनीसाब.–डोळ्यांतून धरार लागूनश्यानी बाहेर निसटल हां.

स०:—( कांपत )रडायला मी काय भित्रा आहें ?–मी काय नानांच्या सारखा अर्धा शहाणा आहें तोफेला भ्यायला ?

द०:—धनीसाब जसल लेकुणकीच वीर, तसलच तरवारीचबी मर्द हायती !

स०:—पुण्याचा सखारामबापु, हैद्राबादचा विठ्ठल सुंदर, आणि दिल्लीचा आमचा वकील देवराव हिंगणे, या तीन सगळ्या शहाण्यांत मी चौथा सगळा शहाणा !–माझ्या अंगांत वीरश्री चढली आहे ! ( पडद्यांत तोफेचा आवाज. ) मला धरून घरांत न्या–पुन्हा जर आवाज झाला—माझी वाचा बंद–( पडद्यांत पुन्हा आवाज. ) हो–ई–ल–उ–च–लू–न–न्या–घ–रां–त– [ उचलून नेतात. ]

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**—आवडीची माडी.

[ केशवशास्त्री, आवडी व गोंधळी बसले आहेत. ]

के०:—हें पहा, गोंधळीमहाराज ऊर्फ वैदूबाबा, बाजीरावसाहेबांना त्यांचीं सर्व पत्रें परत देणें हें कांहीं मला पसंत नाहीं.—उद्यां बाजीराव श्रीमंत पंतप्रधान पेशवे झाल्यावर आमच्यावर जर उलटले—हो वेळ आहे, काय नियम—आपल्या हातांत वेसणीची दोरी पाहिजे.—सुमेरसिंगास दिलेलें पत्र राघोबास जसें बाधलें, तसा धाक दाखवायाला आपल्यापाशीं कांहीं पाहिजे.—तें असो, पण अगोदर हें सांगा, मॅलेटनें पाठविलेल्या खजिन्यापैकीं आम्हांला काय त्यांनीं पाठविलें आहे ?—नाहीं तर कामाची गोणी मात्र आमच्या पाठीवर—

गों०:—तशांतला कांहीं प्रकार नाहीं.—बाजीरावसाहेब म्हणजे कर्णाचा आवतार !—पेशवाईच्या गादीला खरे तेच योग्य !

के०:—आणि त्यांचे फडणवीस व्हावयाला तुमच्यासारखा—एखादा गोंधळी किंवा एखादा हरदासच योग्य !—म्हणजे देशभर कथाकीर्तनांच्या आणि गोंधळांचा सुळसुळाट !

गों०:—बरें येऊं द्यात तर खरे ते दिवस, म्हणजे कळेल आमच्या तुणतुण्याच्या, तंबोऱ्याच्या, किंवा भजनी टाळांच्या आवाजावर राज्य कसें झुलत राहील तें !

आ०:—हें असूं दे मेलें—तुमच्या पदरांत काय काय जवाहीर पडलें ते दाखवा प्रथम.

गों०:—खजिन्याचा बराच भाग श्रीमंतांनीं आपल्या जवळच ठेऊन घेतला.—पण कांहीं निवडक दागिने मात्र बक्षीस म्हणून पाठविले आहेत.

आ०:—तो कंठा कोणचा म्हणत होता तो काढा पाहूं.

गों०:—( कंठा बाहेर काढून ) सुमेरसिंगाला गजाऊनें भुलवून वश करून घेतलें, व सुमेरसिंगानें नारायणरावांना मारण्याची प्रतिज्ञा करून बेलभंडार उचलून आनंदीबाईसाहेबांच्या हातीं दिला; त्या वेळीं हा मोत्यांचा कंठा आनंदीबाईसाहेबांनीं आपल्या गळ्यांतून काढून गजाऊच्या गळ्यांत घातला.—त्याची किंमत कमींत कमी पांच लाख रुपये तरी होईल !

के०:—आनंदीबाईसाहेब म्हणजे आमच्या गुरूंच्या गुरु.—नाना-साहेबांच्या वंशाला श्रीमंतांच्या गादीवरून काढून टाकून आपल्या वंशाची स्थापना करण्याच्या कामास वीस पंचवीस वर्षांपूर्वीं त्यांनीं प्रारंभ केला.—नानांच्या विरुद्ध सर्व जगाच्या मनांत भलते भलते कुतर्क उत्पन्न करण्याची युक्ति त्यांनींच प्रथम काढिली.—नानांची त्या वेळीं सद्दी होती म्हणून गंगाबाई आणि नाना यांच्या संबंधानें त्यांनीं पिकविलेल्या कंड्यांचा त्यांच्या हयातींत फारसा उपयोग झाला नाहीं.—पण ह्या केशवशास्त्र्यानें योग्य हंगामाची वाट पाहून त्याच बीजापासून प्रचंड विषवृक्ष निर्माण केला आहे.—आमच्या गुरूचा हा अमोल्य प्रसाद कोठें चांगला शोभेल बरें ?—नारायणरावाचा खून करण्याच्या कामांत आदिदेवता आनंदीबाईसाहेब,—सांप्रतच्या उद्योगांत आदिशक्ति आपण !—तेव्हां कंठा ह्या गळ्यांतच चांगला शोभेल. ( आवडीचे गळ्यांत कंठा घालतो. )

आ०:—हें काय बाई !—मला काहीं नको होता इतका मान द्यायाला.

गों०:—नारायणरावाच्या रक्ताचा टिळा लावून सुमेरसिंगानें राघोबा

दादाला मुजरा केल्यावर आपल्या हातांतील ही हिऱ्याची पोंची राघोबादादांनीं सुमेरसिंगाच्या हातांत बांधली.

के०:—जडावाचें काम तर फारच विलक्षण आहे !

आ०:—आनंदीबाईसाहेबांचा कंठा जर माझ्या गळ्यांत तर काकासाहेबांची ही पोंची आपल्याच हातांत असली पाहिजे.

के०:—वा, अगदीं जोडप्यास जोडपें !—काकासाहेब आनंदीबाईच्या आधीन होते—आणि ह्या देहावर आपलेंच राज्य आहे.—बांधा तर मग ह्या हातांत ती पोंची.

आ०:—पण नको गडे.—सुमेरसिंगाच्या हातांतला हा दागिना !—आपणाला विटाळ देखील त्याचा होऊं द्यायाला नको.—सुमेरसिंगाला हाल हाल करून मारलें आहे आठवतें का कांहीं ?

के०:—हा वेडे ! अग तो दांडगा धटिंगण हुण्या, मार म्हटलें त्यानें मारलें ?—अक्कल, बुद्धि, डांवपेंच, ह्यांतलें कांहीं त्यांच्यांत होतें काय ? अशा पशूंचा शेवट तसाच व्हावयाचा.—माझे गारदी लोक,—माझें सैन्य,—सर्व कांहीं येथें आहे.—माझें भयंकर शस्त्र—माझी ही नंगी तलवार—ह्या गाईच्या वाणाच्या म्यानांत लपवून ठेविली आहे.—सुमेरसिंग मारला गेला—राघोबा भरारी देशोधडीस गेले—पण ह्या केशवशास्त्र्यास यशच यावयाचें !—हं बांधा हातांत ती पोंची. ( आवडी पोंची बांधते.)

गों०:—ही एक आंगठी आहे.—अजब हिरा आहे.—त्याच्या चमकेवर नजर ठरत नाहीं.—सुमेरसिंगाचा साथीदार मेहदीखान ह्याच्या हातांत आनंदीबाईसाहेबांनीं स्वतः ही आंगठी घातली होती.

के०:—तर ही आंगठी गोंधळीमहाराजांच्याच हातांत चांगली शोभेल.—आनंदीबाईसाहेब, घालायाची मेहदीखानाच्या हातांत ती आंगठी.

[ आवडी गोंधळ्याच्या हातांत आंगठी घालते. ]

के०:—दगड्या, खंड्या,—असे आंत या लवकर गुलामांनो.—आज दसऱ्याचें खरोखरीचें सोनें सगळ्यांना मी वाटणार आहें.

[ दगड्या, खंड्या, दसऱ्याच्या सोन्याचा भारा घेऊन प्रवेश करतात. ]

द०:—बाईसाबासनी स्वान द्यायाला हो खंड्या अगाडी.

खं०:—सरकारच्या पायार्शी सोनं ठेवतूया मावाप !

द०:—हा दगड्या आज लई खूस हाय !—ह्यो भारा स्वान नव्हं सरकार, दगड्याचा पराण आहे धनीसाब.—बाच्या घरधनिनींची म्हस ह्यो भारा खाऊनश्यानी लई खूस होईल धनीसाब, ती म्हस गवसली तर तिला मात्र ह्यो भारा देणार बघा,—पण सरकारच्या पायार्शी ठेवतूया मावाप !

के०:—संपलें एकदाचें तुझें चऱ्हाट ! आज तुझे सरकारही खूप आहेत.—आपल्या नोकरांना आज खरोखरीचें सोनें वाटावयाचें.—दे त्यांना एक एक सल्लेजोडी दे.

आ०:—आज लूट आहे !—हें घ्या तुम्हांला. ( सल्ले जोडी देते. )

द०:—धनीसाब—पितळच तर नव्ह !—आमच्या म्हाताऱ्यानंबी असलं पाहिलं नव्हतं—बानबी पाहिलं नव्हतं—दगड्यानंबी पायलं नव्हत—तवां आतांच कोठूनश्यानी आलया, म्हणूनश्यानी विचारतूया धनीसाब पितळ तर नव्हं !

आ०:—जा गुलामांनो आतां.—त्यांना बोलावलें म्हणून सांग.

के०:—सदोबाला लवकर पाठवून दे आंत.

द०:—ए खंड्या, मर्द सरकारास्नी म्हणाव वया सरकार बोलावत्याती.

के०:—चाकराला पडचाकर कशाला—जा लवकर. ( खंड्या, दगड्या जातात. ) आज घरधनिनींकडून कारभाऱ्यांची मोठी संभावना होणार म्हणायाची !—पण जडावाच्या पेट्यांशिवाय कोणचाच दागिना शिल्लक राहिला नाहीं !—पुरुषांनें—सदोबानें—कसा हा दागिना घालावा, मोठी पंचाईत आहे.

आ०:—त्यांना बायकांचे दागिने घालण्याची हौस आहे हो ! ( सदोबा येऊन कांपत कांपत उभा राहतो. ) कां ?—अजून कांपरें गेलें नाहीं वाटतें ?—तोफा बंद होऊन घटका दोन घटका झाल्या तरी अजून तुम्ही भ्यालेलेच !

स०:—तोफांना भिणारा हा मर्द नव्हे, सांगून ठेवतों.—पुढच्या दसऱ्याला बंघ,—रस्त्यावर असा उभा राहीन—बजावून सांगतों.—पण हा कोतवाल—

के०:—कोण कोतवाल—येथें कोठून कोतवाल ?

स०:—ए कोतवाल, पुढें ये, आतां कां भितोस ?—एक घटकाभर तो आणि मी ह्या खोलींत होतों.—आतां भितोस, ये असा पुढें—हां—

के०:—कोठचा कोतवाल, सांगा लवकर.

स०:—आमच्या पुण्याचा नव्हे का ?—त्याला नारू झाला आहे.—वैदूचें औषध घ्यायाला आला आहे.—वैदू पाय कापेल म्हणून भितो आहे.—तो मला—मी त्याला धरून बसलों होतों घटकाभर—आणि त्याच्या उराच्या धडकीच्या भितीचा मला विटाळ झाला—म्हणून जरा मी कांपल्या-सारखा—हा आला पहा. ( कोतवाल आपल्या जवानांसह प्रवेश करितो. )

को०:—सर्वांना पकडून अगोदर त्यांच्या मुसक्या बांधा.

( जवान तसें करतात. )

के०:—ही काय घाशीरामी पुन्हा आरंभिलीत वाटतें पुण्यांत ?–गरीब भिक्षुकांना पकडून–( त्यांच्या मुसक्या बांधतात. ) मी श्रीमंतांच्या जवळ नेहमीं असतों, तुम्हांला शिक्षा होईल.

को०:—चूप रहा शास्त्र्या,–नानांच्या हुकमानें मीं तुम्हांला सर्वांना कैद केलें आहे.–ते दागिने काढून घ्या सर्वांच्या आंगावरचे.

स०:—कोतवालसाहेब, मला कांहीं मिळालें नाहीं.–त्या दगड्या-खंड्यानें सल्लेजोड्या उपटल्या–त्या घ्यायाला विसरूं नका हं !

को०:—( आवडीच्या मानगुटीला धरून खंजीर उपसून ) बाजी-रावाचा पत्रव्यवहार दाखीव नाहींतर प्राणास मुकलीस म्हणून समज.

आ०:—मला मारूं नका, मला मारूं नका, सर्व कागद दाखवितें.

को०:—हवलदार, हिला बरोबर घेऊन सर्व कागद धुंडाळून काढा.

[ हवलदार आवडीला घेऊन जातो. ]

के०:—ब्रायकांवर तुम्ही शस्त्र उचलतां—ह्याचा जाब द्यावा लागेल.

को०:—तुम्हां सर्वांना भिंतींत पुरून जिवंत गाढतांना जाब देईन.

[ सर्वांस कैद करून कोतवाल जातो. ]

[ पडदा पडतो. ]

# प्रवेश तिसरा.

**स्थळ**—शनवारवाडा.

[ सवाई माधवराव निजले आहेत. यशोदा, बजाबा जवळ आहेत. ]

ब०:—श्रीमंतांना झोंप लागली वाटतें!

य०:—कसली झोंप आणि कसलें काय?—थकल्यामुळें किंचित् डोळा लागल्यासारखा झाला इतकेंच!

ब०:—श्रीमंतांनीं औषध घेतलें का?

य०:—कसलें हो घेतलें?—एक घोट पोटांत गेला असेल नसेल!—किती आर्जवें केलीं!—मजकडे लक्षच नाहीं.—अखेरीला रडत रडत घट्ट पाय धरून बसलें—मला वऱ्यावर मारायाला कितीदां धावतात—

ब०:—मी आणि आईसाहेब पलीकडेच जवळ असतों.—आम्ही श्रीमंतांच्या नजरेस पडलों कीं त्यांचें पित्त पुन्हा खवळेल!—सरकारला माहीत आहेच कीं सीमोल्लंघनाच्या वेळीं मी खंजीर काढून घेतला म्हणून श्रीमंतांचा मजवर फार राग झाला आहे.—बाबासाहेबांचें पत्र प्रथम हातांत घेऊन मग श्रीमंतांच्या पुढें जा; नाहींतर दृष्टीस पडूं नका, असा नानांचा मला हुकूम झाला आहे.—म्हणून म्हणतों आईसाहेबांप्रमाणें मलाही पलीकडेच बसलें पाहिजे;—सरकारला सर्व त्रास सोसावा लागणार आहे.— आम्ही सर्व नोकर सेवेस तत्पर असून ह्या वेळीं निरुपयोगी आहों.—बाकी तसें कांहीं वाटलें कीं आंत येण्यास सरकारची आज्ञा व्हावी.

य०:—छे हो, मी त्यांच्या माराला भीत नाहीं.—माझें का॰ पाहिजे तें होऊं दे, तिकडे जरा समाधान वाटलें म्हणजे मी सर्व भरू॰ पावलें. बजावा, त्या औषधानें गूण खास येईल ना ?—आणि बाबासाहे॰ केव्हां येऊन पोंचतील ?

व०:—औषध फार उत्तम आहे.—सरकारच्या पोटांत मात्र जाऊं दे, एक दोन दिवसांत उतार पडला पाहिजे. शिवाय बाबासाहेबही आज उद्यां येऊन पोंचावेत, असा अंदाज आहे.

य०:—जगदंबे, देव, धर्म, व ब्राह्मण, ह्यांची आजपर्यंत जी सेवा झाली असेल त्या सर्व सेवेचें पुण्य, ज्या व्रतापासून पराङ्मुख व्हावें अशी चुकून देखील इच्छा मनाला कधींही शिवली नाहीं त्या पातिव्रत्याचें पुण्य ह्या औषधाला गुणकारी करण्याकडे खर्च होऊं दे.—ह्या अभागीच्या कपाळीं ह्यापुढें जें आयुष्य लिहिलें असेल तें सर्व जगदंबे तिकडे दे आणि माझ्या आयुष्याची समाप्ति आतांच कर.

व०:—सरकार, श्रीमंतांची स्वारी जागी झालीशी दिसते,—मी पलीकडे जातों. [ जातो. ]

[ यशोदा पलंगाच्या बाजूस उभी राहते. ]

मा०:—( उठून बसून ) मला नवें आयुष्य कोणीं दिलें काय ?—मला असें वाटतें, मी असाच युगानुयुगें जिवंत राहणार !—पण ह्या पापी जगांत पवित्र भूमि—पुण्यस्थान—कोठचें मिळायाला !—आकाशांत पार उडून गेलें पाहिजे !—बर्फ नुकतें वितळून गेलें असतां हिमालयाच्या शिखरावर पृथ्वीवरचा वारा येईपर्यंत थोडका वेळ पवित्र जागा सांपडेल;—समुद्राला ओहटी लागली असतां महोदधीच्या वाळवंटावर जरासा वेळ पुण्यात्म्याला थारा मिळेल.—पण एवढें भयंकर पाप पृथ्वी कशी सहन

करीत आहे ? बुडणार, ह्या क्षणीं पृथ्वी बुडणार.--अत्यानंद होणार.-बजरबट्टू, माझा खंजीर परत देत नाहींस ?-सर्व पापी माणसें बुडून मरणार !-पूर्वींच असें झालें असतें,- पण त्या मूर्ख परमेशानें वराहाचा अवतार घेऊन ह्या नीच वज्याला वांचविलें !-परमेशाला हुडकून काढून -क्यंवे शिलेदार, गुलामा पिढ्यानपिढ्या माझें अन्न खाऊन आतां मला खंजीर देत नाहीं म्हणतोस ? उरांत जपून ठेवण्याकरितां नानांच्या—

य०:—महाराज, मी आपली आवडती दासी यशोदा-

मा०:—( वेणीस धरून तोंड वर करून ) ज्या तोंडानं नाहीं म्हटलेंस तें तोंड उघड पाहूं ? ( तोंड बळानें उघडतो. ) अगदीं कुच-कामाचा आहेस.-तुझे सगळे दांत डाळिंबाच्या दाण्यासारखे बोथट आहेत.-बस्स चाललों मी आपल्या उद्योगाला—

य०:—गरीब दासीची विनंति—

मा०:—ईश्वराची चूक जर मला सुधरतां आली नाहीं तर मनुष्य-प्राणी हुषार कसला !-मला दोनच सुळे दांत आहेत-बाकीचे सगळे दांत कानसून कानसून सुळे करतों.-पाजळून पाजळून नखांना तीक्ष्ण धार आणतों !-बस्स, मग काय करायचा तुझा खंजीर ?-पशुपक्ष्यांच्या जवळ हत्यारें कोठें असतात ?-बजाबा, तूं माझा मित्र नाहींस ?-तुझीन माझी खूप दोस्ती:-( वेणीस धरून तोंड वर करून दांत पाहातो. ) कळीसारखे कोमळ दांत, कानसून काय उपयोग होणार ? तुझे केश मात्र गड्या फार लांब आहेत.-माझें तूं ऐकणार ना ?

य०:—महाराज, मला काय पाहिजे ती आज्ञा व्हावी.

मा०:—दे तर मग सगळे केस कापून-त्याचा चाबूक बनवून बजाच्या पाठीवर कोरडा ओढला पाहिजे.-केस तडातड उपटून काढूं

का ?–नको.–तूं माझ्यावरची पहारेकरीण नाहींस.–कायरे केसांनों, तुम्ही वजाबा आहां काय ?–उपटून कुरतडून तुकडे तुकडे करतो.–तूं वज्या आहेस ?

य०:—महाराज, मी आपली दासी यशोदा ना ?


मा०:—तर मग तुझे केंस तूं वस्तऱ्यानें काढूं नको.–काढ वस्तऱ्यानें.–अग आज किती दिवस ह्या चांडाळांचीं पापकर्में मला समजलीं असून अजून मीं सूड उगवला नाहीं, तेव्हां जिवंत काय मेलों काय सारखाच !

य०:—महाराज, असें काय विनाकारण मनाला वेड लावून घ्यावयाचें ?–सरकारच्या मनांत भलतेंसलतें आमच्या शत्रूंनीं भरविलें आहे. तो केश्याशास्त्री, मेला काळसर्प, त्याला पकडला आहे हो.–शिवाय बाबाही आज उद्यां येऊन पोंचतील.–बाबा आले म्हणजे त्यांच्यादेखत त्या हरामखोर शास्त्र्याला महाराजांच्या पुढें उभें करून आमच्या शत्रूंनीं–

मा०:—कोणचा शत्रु आला आहे ?–दुराणी राजा अबदुल्ला आला असेल, तर त्याला सांग, अटकेच्या पलीकडे गिलच्यांना पळावयास लावणाऱ्या राघो भरारीचा मुलगा लवकरच पेशव्यांच्या गादीवर बसणार आहे.–दुसऱ्याच्या वशिल्याच्या पोरक्याचे दिवस आतां उरले नाहींत.–टोपीकर जलचर आले असले तर म्हणावें माझ्या महादजीचे कंपू लढाई देण्याला जय्यत तयार आहेत,–पण हे घरचेच चोर, घरचेच शत्रु—कोण कोण आले आहेत ?– बोल.

य०:—प्रतापशाली महाराजांचा एवढा दरारा आहे कीं आपणाला आतां कोणीच शत्रु उरले नाहींत.–पानिपतची लढाई होऊन—

मा०:—पानिपतच्या लढाईचा खरा शेवट आतां इतक्यांत होणार



मा०—मी कोठें बसणार ठाऊक आहे काय ? [ पृ० १२६

—सरदारहो, असे भित्र्यासारखे पळून जाऊं नका.—शाबास इभ्राइम, माझ्या गारद्याची करामत पहा, त्यांना नांवें ठेवीत होतास नव्हे ?—वा ! वा ! रणशूर शिंद्यांना नजीब्याला कसा नतीजा दिला आहे बघ !—हा म्हातारा मल्हारी सुराजमल्ल जाठाच्या आणि सुजा उद्दवल्याच्या नादीं लागून फसेलसें मात्र वाटतें !—शाबास, पुणेंकरहो शाबास, हुजूरच्या बावन पागेचें नांव आज तुम्हीं राखलेंत.—त्या वजिराला घोड्याच्या टापाखालींच चिरडून मारा.—अरे रे रे ! दक्खन बुडाली, होळकरांनीं एकाएकीं पळ काढला ! विश्वासघात !—विश्वासघात !—हा नानाचा कर्मचांडाळ वजावा सर्व नाशास कारण !

य० :—असें काय तें एकसारखें बरळावयाचें !—मी पायां पडतें— पदर पसरतें—ह्या दासीची विनंति ऐकावयाची होती, आणि जरा घटकाभर स्वस्थ विश्रांति घ्यावयाची होती.—ह्या येथें थोडका वेळ बसून—

मा० :—मी कोठें बसणार ठाऊक आहे काय ?—यमुनेच्या ज्या उतारानें मराठ्यांचें सैन्य पानिपताहून पळून आलें तेथें टपून बसणार आणि नाना असा आला कीं, धरतों वज्या तुझ्या मानगुटीला—आणि देतों तुला यमुनेच्या डोहांत लोटून.

[ यशोदेला लोटून देतो; ती जमिनीवर पडते; माधवराव जातो. ]

# प्रवेश चवथा.

स्थळ—नानांचा वाडा.

[ नाना, जाधवराव, मेहेंदळे, रास्ते, वगैरे बसले आहेत ].

रा०:—बाबासाहेबांच्या पत्रावरून पहातां बाबासाहेब इतक्यांत येऊन पोंचावयास पाहिजे होते.

मे०:—बाबासाहेबांचें पत्र श्रीमंतांच्या हातीं पडलें काय ?

जा०:—वयनीसाहेबसरकारांनीं काल रात्रीं स्वतः वाचून दाखविलें, व त्यामुळें श्रीमंतांचें मन किंचित् स्वस्थही झालें, असें बजाबा म्हणत होते.

रा०:—आतां बाबासाहेब आल्यावर सर्व गोष्टींचा खुलासा परस्परच होणार आहे.—शिवाय हीं बाजीरावसाहेबांच्या हातचीं पत्रें आवडीच्या माडीवर सांपडलीं आहेत.—हीं वाचलीं म्हणजे श्रीमंतांच्या मनाची तेव्हांच खात्री होईल.

मे०:—प्रथम श्रीमंतांचें मन चांगलें शांत झाल्याशिवाय ह्या बाजीच्या पत्रांचा काय उपयोग होणार ?

ना०:—बाजीरावाचीं हीं दुष्ट पत्रें वाचलीं म्हणजे राज्यकारस्थानाची किळस आल्यावांचून रहात नाहीं.—राज्यकारस्थानासारखा दुःखानें भरलेला आणि पापानें ओथंबलेला दुसरा धंदा दुनियेंत असेल असें मला वाटत नाहीं.—सरदारहो, पानिपताहून बैराग्याच्या वेषांत परत येत असतांना यमुनेच्या वाळवंटावर बसून आमच्या घराण्याच्या ह्या पेशाचा मी विचार करूं लागलों, आणि मला ह्या धंद्याचा असा तिटकारा आला कीं वैरा-

ग्याच्या त्या सोंगांतून पुन्हां संसारांत जाण्याची, परमेश्वरा, मला इच्छा होऊं देऊं नको, म्हणून अनन्यभावें करून मीं लक्ष्मीनारायणाची प्रार्थना केली.—नाहीं, देवाजीच्या तें मनास आलें नाहीं, कारण आजचा प्रसंग मजवर यावयाचा होताना ?

जा०:—एवढे मोठमोठे प्रसंग निभून गेले, तसा हाही निभून जाईल. प्रहर दोन प्रहरांत बाबासाहेब आल्यावर पूर्वीप्रमाणें ठीकठाक घडी बसेल.

ना०:—पानिपतच्या युद्धाच्या वेळचे भाऊसाहेबांचे शब्द माझ्या कानांत एकसारखे घुमत आहेत.—सद्धेतूनें आपण महत्कार्य अंगावर घ्यावें. आणि भलताच वाईट आरोप करून आपल्याचपैकीं कांहीं स्वार्थसाधूंनीं त्या कार्यावर बिब्बा घालावा, ह्याहून खडतर दुर्दैव तें कोणचें, असा वारं-वार प्रश्न करितांना भाऊसाहेबांना मीं ऐकिलें आहे !—नर्मदापार आमचें सैन्य गेलें आणि चंबळेच्या खोऱ्यांत आम्हीं डेरे दिले—तेव्हां मल्हारबानें अशी शक्कल काढिली कीं खासा स्वारीनें मागें राहून किरकोळ सरदार अघाडी पाठवून गनिमी काव्यानें शत्रूस जेरीस आणावें. रांगा-वयाला शिकतांना ह्या पांगुळगाड्याला धरण्याच्या युक्त्या धष्ट पुष्ट तरुणांना काय उपयोगाच्या, असें म्हणून मल्हारीच्या अदूरदृष्टीबद्दल भाऊ-साहेबांनीं उसासे टाकले !—हिंदुस्थानी लोकांच्या मनावर कित्येक शतकें बसलेला मोंगल बादशाहांचा वचक पार नाहींसा व्हावा म्हणून दिल्लीचें तक्त फोडलें, त्या वेळीं लुटीसाठीं मराठे असें करतात म्हणून आफवा पिकविणाऱ्या रजपूतांचीं आकुंचित मनें पाहून, भाऊसाहेबांना वाईट वाटलें !—अर्ध्याहून अधिक हिंदुस्थान तुम्हांला देतों, पंजाब, काश्मीर, गिलच्यांना शिल्लक राहूं दे, अशा प्रकारचें अहमदशहानें तहाचें बोलणें लाविलें असतां गिलच्यांचें बिऱ्हाड हिंदुस्थानांतून कायमचें बाहेर पिटाळून

लावल्याचा विडा उचलणाऱ्या भाऊसाहेबांनीं तें मनावरच घेतलें नाहीं. त्या वेळीं भाऊसाहेब घमेंडखोर असून आपल्या ताठ्याच्या वागणुकीनें सर्वांचा नाश करणार म्हणून होळकरांनीं व रजपुतांनीं सर्व सैन्यांत केलेला पुकारा ऐकून भाऊसाहेबांच्या नेत्रांतून दुःखाचे अश्रु आले !— जाधवराव, पानिपतच्या मैदानावर भाऊसाहेबांची जशी तारांबळ आमच्याचपैकीं कांहीं अप्पलपोटे लोकांनीं केली, तशाच कचाटींत पानिपतचें उदाहरण पुढें असतांना, घरभेद्यांनीं मला आतां पकडलें आहे !--ह्या वेळेला मला तर पुढें आशा कांहीं दिसत नाहीं.

[ कोतवाल प्रवेश करतो. ]

को०:—तो शास्त्री व त्याचे साथीदार ह्यांना आणलें आहे, सरकार.

ना०:—सरदारहो, बाजीरावाचा पत्रव्यवहार तुम्ही आतां वाचलाच आहे—सर्व कपटनाटक तुमच्या डोळ्यांपुढें आहे.—जा त्या हरामखोराला घेऊन ये. ( कोतवाल जातो ) आतां अपराधी पुढें आले म्हणजे तुम्हांला योग्य वाटेल ती शिक्षा त्यांना करा. ( मुसक्या बांधलेले केशवशास्त्री आवडी व गोंधळी, यांना घेऊन कोतवाल व त्याचे लोक येतात. )

ना०:—( हातांत पत्रें घेऊन तीं दाखवून ) नीचा, हरामखोरा, हें भ्रष्ट कारस्थान करण्याचें तुला काय कारण होतें ? बाबासाहेबांनीं तुला चांगल्या स्थितीला आणला, आणि त्यांच्याशींच अशी दगलबाजी !— पाजी, चोर, बोल, आतां वाचा बंद कां ?

आ०:—सरकार मला कांहीं शिक्षा होऊं नये.—ह्याच मांगानें आणि त्याच्या ह्या साथीदार रामोशी गोंधळ्यानें मला प्रथम घरांतून बाहेर काढून, माझा कंटाळा आल्यावर बाजीरावाकडे मला पाठवून—

के०:—मग त्यांत काय तुझें वाईट झालें ?

आ०:—आणि नंतर ह्याच्याच हवालीं बाजीरावानें मला केलें.—त्याच्या नादीं लागून मी फसलें असल्यामुळें हा सांगेल त्याप्रमाणें बाजीरावांना पुण्याहून मी चिठीपत्र पाठवीत होतें.—ह्या पलीकडे मीं कांहीं अपराध केला नाहीं.—बाबासाहेबांचें म्हणून जें बनावट पत्र ह्यानें आपल्या हातांनीं तयार केलें त्यांत माझें अंग कांहीं नाहीं.—ह्या मांगानें एकट्यानें तें खोटें पत्र लिहिलें.—मला क्षमा करावी.

रा०:—कायरे, चांडाळा तोंड नाहीं उघडत?

के०:—ह्या कागदपत्रांत पुरें उघडलें आहे.

ना०:—सरदारहो, तुम्हांला जी योग्य शिक्षा वाटेल ती ह्या अपराध्यांना तुम्ही करा.

जा०:—सर्वांत जी अत्यंत कडक शिक्षा असेल ती ह्या अपराध्यांना दिली पाहिजे.

रा०:—हा मांग शास्त्री ब्राह्मण असो कीं कोणीही असो, सिंहगडच्या अंधार कोठडींत ह्याला उपाशी टाकून ह्याच्याच अंगाचे मासाचे लचके ह्याला तोडावयाला लावलें पाहिजे,—

मे०:—जमीनीवर पडलेले ह्याच्या अंगांतलें रक्त ह्याच्याच जिभेनें ह्याला चाटावयास लावून अंगांतून निघणाऱ्या रक्ताच्या चिरकांड्या ह्याला प्यावयाला लावलें पाहिजे.

ना०:—कोतवाल, रास्ते व मेहेंदळे ह्यांनीं सांगितल्याप्रमाणें अंधार कोठडींत कोंडून शिक्षा करण्याची तजवीज करा. ( कोतवाल अपराध्यांस घेऊन जातो. ) जाधवराव, रास्ते, मेहेंदळे, हीं पत्रें पाहिलीं आणि चोरांचे ते डावपेंच मनांत आणिले म्हणजे श्रीमंतांपाशीं अशा रीतीनें

माझ्या नांवास निष्कारण कलंक लागलेला पाहण्यापूर्वी मी मेलों कां नाहीं, असें मला होऊन जातें.

जा०:—नाना, श्रीमंतांना चांगलें वळण लागावें, बाजीरावाच्या जाळ्यांत सरकार सांपडूं नयेत, एवढ्याचकारितां आपण शनवार वाड्यांत जरा कडक अंमल ठेवलात,—ह्याबद्दल कोणीही सरदार किंवा मुत्सद्दी आपणांस नांवें ठेवील, असें आपणाला वाटतें तरी कसें ?

रा०:—कृत्या आनंदीनें आपल्या नांवावर कांहीं वर्षांपूर्वी जी आग पाखडली, त्याबद्दल सरदारांत त्याच वेळीं वाटाघाट होऊन, राघोबाच्याच पक्षाची छी:थू: सर्वांनीं त्या वेळीं केली नाहीं काय ?

मे०:—श्रीमंतांचे आप्तइष्ट सर्वांना बोलावून थोरले बाजीरावसाहेबांच्या श्राद्धाचे वेळीं सर्वांच्या देखत दिव्य करून सर्वांची आपण खात्री करून दिली आहे.—नाना, आतां आपणाला कोणीही नांवें ठेवणार नाहीं.

ना०:—दिव्य केलें, सर्वांची त्या वेळीं खात्री झाली, सर्व कांहीं झालें —पण आतां काय ?— "एतत्तत्पुनरपि दैवदुर्विपाकादालर्कं विषमिव सर्वतः प्रसृतम् ॥" अशी आतां स्थिति झाली आहे.—ज्या गोष्टीवर तुमचा किंवा दुसऱ्या कोणाचाही कधींही विश्वास बसावयाचा नाहीं त्याच कुतर्कानें श्रीमंतांना वेडें बनविलें आहे !—जाधवराव, दिल्लीवर आमचें भगवें निशाण लावूं, इराणी दुराणीवर छत्रपतीचे सरदार राज्य करण्यास पाठवूं, म्हणून इकडे आमचे बेत, आणि तिकडे श्रीमंतांना असें वेड लागलेलें !—मला वाटतें आमचे हे मानवी बेत दैवी संकल्पाच्या विरुद्ध असले पाहिजेत.—नाहीं तर असले भयंकर प्रसंग—

[ हुजऱ्या येतो. ]

हु०:—आले, महाराज.

रा०:—कोण आलेरे ?

हु०:—बाबासाहेब आले.

ना०:—कोठें आहेत.

हु०:—सरकार वाड्यांत कारंज्याजवळ आम्हीं त्यांना पाहिलें, एक हुजऱ्या तिमजल्यावर श्रीमंतांकडे वर्दी द्यावयास गेला, आणि मी इकडे धांवत आलों.

जा०:—चला तर आपण सर्वच श्रीमंतांच्या दर्शनाला जाऊं.

रा०:—ही आनंदाची बातमी आहे.

ना०:—आतां लवकरच श्रीमंतांचें मन साफ होईल ह्यांत संशय नाहीं.–महाराष्ट्राचा—( पडद्यांत—" घात झाला, नाना घात झाला " बजाबा येतो. )

सर्व०:—( उठून ) बजाबा, झालें तरी काय ?

ब०:—आम्हां सर्वांचें दुर्दैव ओढवलें !– श्रीमंतांनीं तिसऱ्या मजल्यावरून कारंज्यावर उडी घेतली !

सर्व०:—काय म्हणतां काय–हें झालें तरी कसें ?

ब०:—बाबासाहेबांचें पत्र वयनीसाहेब सरकार श्रीमंतांना पुन्हा वाचून दाखवीत होत्या, मी गच्चीच्या जवळ उभा होतों, श्रीमंत मधून मधून मला शिव्या देत होते, व मधून मधून आकाशाकडे शून्य दृष्टीनें पहात होते. वयनीसाहेबांचें पत्र वाचून संपल्यावर केशवशास्त्र्याला श्रीमंतांनीं शिवी दिली, व नंतर मला पाहिल्यावर खेजिराबद्दल पुन्हा तुजवर

संतापणार नाहीं, असें आकाशाकडे पहात आपल्याशींच श्रीमंत पुटपुटले. इतक्यांत बाबासाहेब कारंजापाशीं उभे असल्याविषयीं हुजऱ्यानें वर्दी दिली. मी व वयनीसाहेब गच्चीच्या कडेला जाऊन खालीं पाहूं लागतों तों श्रीमंतही आमच्याजवळ आले, आणि ' बाबासाहेब, ' ' बाबासाहेब ' अशा श्रीमंतांनीं हांका मारल्या; आणि श्रीमंत काय करतात इकडे आमचें लक्ष जाण्यापूर्वींच ' तुम्ही एकदम वर येत नाहीं तर मीच हा खालीं आलों ' असें म्हणून श्रीमंतांनीं कारंज्यावर उडी टाकली !

ना०:—श्रीमंतांबरोबरच महाराष्ट्राच्या साम्राज्याची इमारत ढांसळून पडली !

[ पडदा पडतो. ]

अंक पांचवा समाप्त.

समाप्त.

सचित्र रंगावृत्ति ! सचित्र रंगावृत्ति ! !

# कांचनगडची मोहना.

हें नाटक रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर बी. ए. यांनीं लिहिलेलें असून या नाटकांतील कथाभाग विजापूर व विजयानगर यांमधील १५६५ सालच्या तालिकोटच्या भयंकर रणसंग्रामानंतर घडून आलेला आहे. विजापूरला धुळीला मिळवून विजयानगरास पुनः गादी स्थापण्याची **प्रतापराव जाधवांची** घनघोर प्रतिज्ञा, **मोहनेचें** अपूर्व पतिप्रेम, पापी **हंबीररावाचा** अस्थानीं प्रेमातिशय, अपमतलबी व विश्वासघातकी **पिलाजीरावानें** गडावरील कोठाऱ्याचें घरांत नीचपणानें भेद करून दारूचे व धान्याचे कोठारास आग लावून कांचनगडची केलेली राखरांगोळी, शत्रूस शरण न जातां धारातीर्थी मरून जगास उदात्त कित्ता घालून देण्याचा प्रतापरावांचा निश्चय व पतिशेजारीं लढून मोहनेचें महाराष्ट्रभूंगा साजेसें धारातीर्थी सहगमन, यांपैकीं एखादाही प्रसंग वाचकांच्या मनोवृत्ति तल्लीन करून सोडण्यास पुरेसा आहे. किंमत ०।१२ आणे. टपाल खर्च ०।१आणा.

# नायकांचें बंड.

'प्रमिला–स्वयंवर' नांवाचें नाटक 'पौराणिक नाटक–मंडळ्या' पूर्वी करीत असत. त्या नाटकांतील अद्भुत भाग गाळून 'स्त्रीराज्या' विषयींच्या कल्पनांना व विचारांना ह्या नाटकांत नवीन स्वरूप देण्यांत आलें आहे, त्याप्रमाणें दिग्विजयास निघालेल्या **अर्जुनानें** हिमाचलांतील **प्रमिलाराणीचें** स्त्रीराज्य लढाई न करितां कसें मोडलें, ह्याचें बोधप्रद व **सर्वांगसुंदर** वर्णन यांत केलें असून, नाटकांतील निरनिराळ्या प्रसंगांचे महाराष्ट्र नाटक मंडळीचे ११ सुंदर फोटो पुस्तकांत दिलेले आहेत. किंमत ०।१२ आणे.

मुंबई,–चित्रशाळा दुकान, कालकादेवी रोड,

म्यानेजर,–चित्रशाळा, पुणें.